नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५५ * अंक २०० * | * नागपूर * | मंगळवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

खरीखरी..

## दीपा, दीपा दीपत्कार!

आपल्या देशात सर्वाधिक श्रद्धेचा, सर्वाधिक चर्चेचा, सर्वाधिक खाऊ गिरीचा, सर्वाधिक पर्यटनाचा, सर्वाधिक प्रेम-संदेशांचा तसेच सर्वाधिक शुभ संदेशांचा वगैरे वगैरे सर्वाधिक लोकप्रिय असलेला दीपावलीचा दिवस आज उगवला आहे. ज्या लोकांचे वय पन्नाशीच्या पुढे आहे. त्यांच्या मनात तेव्हाची दिवाळी आणि आत्ताची दिवाळी या मधला फरक पटकन लक्षात येतो कारण पूर्वी पोस्टाच्या माध्यमातून आपल्या जवळच्या नातलगांना, मित्र-मैत्रिणींना आणि आप्तेष्टांना नवसंदेश जात असत. त्यामध्ये प्रेमाचा ओलावा आणि नात्याची जवळीक दिसून येत असे. आता मोबाईल नावाचा हा प्राणी आपल्याकडे आला आणि आपसातील प्रेमाचा ओलावा गलितगात्र झाला. आपल्या मोबाईल मध्ये जेवढे काही क्रमांक सेव्ह असतील त्या सर्वांना एका झटक्यात कचकन दिवाळीच्या शुभेच्छा पोहोचतात. अनेक प्रियजन हे संदेश वाचण्याचे कष्टही घेत नाहीत, हा बहुधा सर्वांचाच अनुभव असावा. पूर्वी दुकानात जाऊन शुभेच्छा संदेशाची पत्रे घेणे किंवा प्रेमपत्र घेणे, लिफाफ्यावर पत्ता लिहिणे त्यावर तिकीट लावणे आणि पोस्टाच्या पेटीत टाकणे एवढी गोष्ट आता कोण करणार आहे. पूर्वीच्या काळी घरात दिवाळी करता जे पदार्थ बनायचे त्यामुळे दिवाळीच्या आधीच चार-आठ दिवस तेला, तुपाचा घमघमाट आणि त्याच्या स्वादाचा सुगंध आपल्या नाकाला प्रसन्न करून जात होता. आता सुगंध उडून गेला आणि अचानक हल्दीराम आणि जल्दीराम यांच्याकडे त्यांचे डबे विकत घेण्यासाठी रांगा लागू लागलेल्या आहेत. दिवाळी साजरी करण्याची जुनी कल्पना आणि आताची कल्पना यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. पूर्वी दिवाळी म्हटली की प्रत्येक मराठी माणसाच्या घरात किमान दोन ते चार वाचनासाठी दिवाळी अंक दिसायचेच. आताही दिवाळी अंक प्रकाशित होतात, अगदी शेकड्यांनी प्रकाशित होतात.? पण त्या दिवाळी अंकांमध्ये पूर्वीच्या दिवाळी अंकांचा तो दरारा आणि तसे लेखक का दिसत नाहीत, हा प्रश्न खरं तर कोणीच विचारू नये. खरे म्हणजे दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे कारण अमावस्येच्या रात्री दिव्यांची रोषणाई करून आपण लक्ष्मीला आमंत्रित करतो. ते पूर्वीचे स्वरूप आता विजेच्या दिव्यांच्या झगमगटामध्ये लोप पावत चाललेले आहे. बिचारा एकुलता एक दिवा विजेच्या त्या अनेक दिव्यांच्या लखलखाटामध्ये ओशाळल्यासारखा जळत असतो. त्याच्या आजूबाजूला विजेचा जो काही प्रकाश आणि इतका झगझगाट असतो की त्याला पाहून, मंद तेलगंध प्रसवणारा दिवा ओशाळला नाही तरच नवल! मग आता हे दिवे भविष्यात किती काळ जिवंत राहतील, हाही अभ्यासाचा विषय आहे. दिवाळीच्या सुट्टीमध्ये मामाच्या गावात जाऊन मस्त मजा करण्याचे दिवस बालकांच्या दहा ते पंधरा किलो दप्तराच्या नको असणाऱ्या ओज्याच्या वजनात विरून गेलेले आहेत. काही वर्ष मामा, काका, भाऊ व बहीण तरी आहेत. पुढच्या पिढीला ही नाती होती असे सांगावे लागेल. जाऊ द्या, दिवाळीच्या दिवशी मस्त मज्जा करा, विकत आणलेला फराळ आणि मिठाई खा आणि दिवाळी साजरी करा. असे सर्व काही असले तरी दिव्याचा दीपत्कार यापुढेही भावनाशील माणसाला निश्चितच दिव्यत्वाची जाणीव देऊन जाईल, यात शंका नाही त्यासाठीच सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा...!!!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## नौसैनिकांसोबत मोदींची दिवाळी

### ऑपरेशन सिंदूरमध्ये आपल्या सैन्याने पाकिस्तानला गुडघे टेकायला लावले

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गोव्यात आयएनएस विक्रांतवरील नौसैनिकांसोबत दिवाळी साजरी केली. पंतप्रधानांनी सैनिकांसोबत दिवाळी साजरी करण्याची ही १२ वी वेळ आहे.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, "मी कालपासून तुमच्यामध्ये आहे. तुमच्या प्रत्येकाकडून मी काहीतरी शिकलो आहे, मला काहीतरी कळले आहे. खोल समुद्रातील रात्र आणि सूर्योदयाने माझी दिवाळी अनेक प्रकारे खास बनवली आहे."

ते म्हणाले, "जेव्हा मी दिल्ली सोडली तेव्हा मला वाटले की मी हा क्षण जगला पाहिजे. तुमची तपस्या, तुमची भक्ती, तुमचे समर्पण इतके उच्च आहे की मी ते जगू शकलो नाही, पण मला ते नक्कीच कळले."



गेल्या वर्षी पंतप्रधानांनी गुजरातमधील कच्छला भेट दिली होती, जिथे त्यांनी बीएसएफ, लष्कर, नौदल आणि हवाई दलातील सैनिकांना मिठाई वाटली होती. गेल्या ११ वर्षांत, पंतप्रधानांनी दिवाळीसाठी जम्मू आणि काश्मीरला जास्त चार वेळा भेट दिली आहे. आज, देश नक्षलवादी दहशतीपासून मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. २०१४ पूर्वी, देशभरातील १२५ जिल्हे माओवादाच्या हिंसाचाराने प्रभावित होते. दहा वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर, ही संख्या कमी झाली आहे. आता, फक्त ११ जिल्हे माओवादमुक्त राहिले आहेत. १०० हून अधिक जिल्हे माओवादमुक्त दिवाळी साजरी करत आहेत.

ते पुढे म्हणाले की, ज्या भागात माओवादी रस्ते आणि शाळा अडवत असत, शाळांवर बॉम्बस्फोट करत असत आणि डॉक्टरांना गोळ्या घालत असत, तिथे आता नवीन उद्योग उभारले जात आहेत. महामार्ग आणि शाळा बांधल्या जात आहेत. हे सर्व सुरक्षा दलांच्या त्याग आणि समर्पणामुळे शक्य झाले आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये लोक अभिमानाने आणि सन्मानाने दिवाळी साजरी करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "आपल्या नौदलाने परदेशात अडकलेल्या लोकांना परत आणण्यासाठी मोहिमा सुरू केल्या. तुमच्या शौर्य आणि धाडसामुळे जगभरातील भारतीयांचा आत्मविश्वास बळकट झाला आहे.

मोदी पुढे म्हणाले, "आज मी भारतीय तटरक्षक दलाचेही कौतुक करतो. ते नौदलाशी समन्वय साधून दिवसरात्र तैनात राहतात. आपल्या सशस्त्र दलांच्या धाडसामुळे देशाने एक मोठी कामगिरी केली आहे." आपली शक्ती आणि सामर्थ्याची परंपरा आपल्या विज्ञानाच्या, आपल्या समृद्धीच्या आणि आपल्या मानवतेच्या सेवेसाठी आणि संरक्षणासाठी आहे. आज, एकमेकांशी जोडलेल्या जगात, जग समुद्री मार्गांवर अवलंबून आहे.

## आर्थिक मदत जाहीर

### महाराष्ट्र-कर्नाटकला केंद्रारकडून मदतीचा हात

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :

या वर्षीच्या अतिवृष्टी, पुर, ढगफुटी आणि भूस्खलनामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांना केंद्र सरकारकडून मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राज्य आपत्ती निवारण निधीच्या (एसडीआरएफ) केंद्रीय वाट्याच्या दुसऱ्या हप्त्यांतर्गत एकूण १,९५०.८० कोटी रुपयांच्या अग्रीम मदतीस मान्यता दिली आहे. ही मदत महाराष्ट्र व कर्नाटक सरकारच्या विनंतीवरून तत्काळ मंजूर करण्यात आली असून, यामुळे आपत्तीग्रस्त भागांतील पुनर्वसन कायार्ला गती मिळण्याची अपेक्षा आहे. यामध्ये महाराष्ट्रासाठी १,५६६.४० कोटी रुपये तर कर्नाटकसाठी ३८४.४० कोटी रुपये वितरित केले जाणार आहेत. केंद्र सरकारकडून ही रक्कम अग्रीम मदत म्हणून दिली जात असून, अंतिम मदतीसंदभार्तील मूल्यांकन आणि कार्यवाही अद्याप सुरू आहे.



गृह मंत्रालयाने यासंदर्भात दिलेल्या अधिकृत निवेदनात नमूद केले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र सरकार नैसर्गिक आपत्तीग्रस्त राज्यांना सर्वतोपरी मदत करण्यास वचनबद्ध आहे. अतिवृष्टी, पूर, भूस्खलन आणि ढगफुटीमुळे बाधित झालेल्या राज्यांमध्ये यंदा मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याने, केंद्राने या राज्यांना लवकरात लवकर मदत पोहोचवण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. केंद्र सरकारने जाहीर केलेली ही मदत ही केवळ आर्थिक मदत नसून, पुरग्रस्त नागरिकांच्या नवजीवनाची आशा आहे. अंतिम मदतीसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू आहे आणि ती लवकरच पूर्ण होईल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.यावर्षी केंद्र सरकारने आपत्ती निवारण निधीच्या विविध योजनांतर्गत देशभरातील अनेक राज्यांना मोठ्या प्रमाणावर मदत वितरित केली आहे. एसडीआरएफ अंतर्गत २७ राज्यांना एकूण १३,६०३.२० कोटी रुपये, तर एनडीआरएफ अंतर्गत १५ राज्यांना २,१८९.२८ कोटी रुपये देण्यात आले आहेत.

## माजी अर्थमंत्री महादेवराव शिवणकर यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. २० :



भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री प्रा. महादेव शिवणकर यांचे आज सकाळी ८ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे गोंदिया जिल्ह्यासह राज्याच्या राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे. महादेव शिवणकर हे संघाचे निष्ठावान स्वयंसेवक, अभ्यासू अर्थतज्ज्ञ, आणि अभ्यासपूर्ण भाषणासाठी प्रसिद्ध नेते म्हणून ओळखले जायचे. त्यांनी जलसंपदा, वित्त आणि नियोजन मंत्री, विधानसभा सदस्य, तसेच लोकसभेचे खासदार म्हणून प्रदीर्घ आणि प्रभावी राजकीय कारकीर्द गाजवली. गोंदिया जिल्हा निर्मितीमध्ये त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. महादेवराव शिवणकर यांचा जन्म ७ एप्रिल १९४० रोजी गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथे झाला. ते १९७८, १९८०, १९८५, १९९५ आणि १९९९ या निवडणुकांमध्ये आमदार म्हणून निवडून आले होते. १९९० च्या दशकात महाराष्ट्रात मनोहर जोशी मुख्यमंत्री असतानाच्या युती सरकारमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९९५ ते १९९७ मध्ये जलसंपदा मंत्री आणि १९९७ ते १९९९ मध्ये वित्तमंत्री म्हणून काम केले. महादेव शिवणकर यांनी भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री असताना गोंदिया जिल्ह्याची घोषणा केली.

### सुटीची सूचना

लक्ष्मीपुजननिमित्त मंगळवार दि. २१ ऑक्टोबर२०२५ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने बुधवार दि. २२ ऑक्टोबर २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही.सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

## महसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांच्या बढत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागातील अधिकाऱ्यांसाठी मोठी घोषणा करत तब्बल ४७ अधिकाऱ्यांना पदोन्नतीची 'दिवाळी भेट' दिली आहे. गेल्या १० वर्षांपासून रखडलेल्या बढत्यांचा मार्ग मोकळा झाल्यामुळे महाराष्ट्राला आता ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत. दिवाळीच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारने याबाबतचा शासन आदेश जारी केला.

सामान्य प्रशासन विभागाने १५ ऑक्टोबर रोजी दिलेल्या इतिवृत्तानुसार, आस्थापना मंडळ (क्रमांक २) ने अपर जिल्हाधिकारी संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांची निवडसूची वर्ष २०२५-२६ साठी तयार केली.

त्यानुसार, अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस २५-१ ७८,८००-२,०९,२००/) संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट-अ) (वेतनश्रेणी एस २७-११,२३,१००-२,१५,९००/-) या संवर्गात तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नती देण्याची शिफारस करण्यात आली होती.

## बिहारमध्ये राजदची १४३ उमेदवारांची यादी जाहीर

■ वृत्तसंस्था, पटना, दि. २० :

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राजदने १४३ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. महाआघाडीने १२ जागांवर एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केले आहेत. महाआघाडीने १२ जागांवर एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केले आहेत. राजदने २४ महिलांना तिकिटे दिली आहेत. तेजस्वी यादव राघोपूरमधून निवडणूक लढवतील. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राजेश राम यांच्या विरोधात आरजेडीने उमेदवार उभा केलेला नाही. कहलगाव आणि सुलतानगंजमध्ये काँग्रेसच्या विरोधात उमेदवार उभे केले आहेत. जेडीयू खासदार गिरधारी यादव यांच्या मुलाला बेलहारमधून तिकीट देण्यात आले आहे. रेणू कुशवाहा यांना बिहारीगंज मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. जमुई जिल्ह्यातील झझा येथून, आरजेडीने पाच वेळा आमदार, दोन वेळा खासदार आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री जय प्रकाश यादव यांना उमेदवारी दिली आहे.

## आगीत होरपळून युवकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :

कफ परेड येथील मच्छिमार नगर परिसरात आज पहाटे एका चाळीत भीषण आग लागल्याने एक गंभीर दुर्दैवी घटना घडली आहे. सुमारे पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास लागलेल्या आगीत १५ वर्षीय यश खोत या मुलाचा होरपळून मृत्यू झाला आहे, तर आणखी तीन जखमी झाल्याच्या वृत्तांनी परिसरात चिंता आणि खळबळ उडाली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, कॅप्टन प्रकाश पेठे मार्गावर असलेल्या मच्छिमार नगर येथील एका चाळीच्या पहिल्या मजल्यावर ही आग लागली. आग लग्नाला इलेक्ट्रिक वाहनांच्या तीन बॅटऱ्या, घरातील वायरिंग आणि विविध वस्तूंनी पेट घेतल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. आग इतकी तीव्र होती की, १०७१० फुटांच्या लहान जागेत ती भीषण तांडव घडवत होती.आगीची त्वरित माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाचे जवान, स्थानिक पोलीस आणि इएरळ कर्मचारी तत्परतेने घटनास्थळी दाखल झाले.

त्यांनी तातडीने बचावकार्य सुरू करून आगीतून चार जणांना बाहेर काढण्यात आले. यामध्ये १५ वर्षीय यश खोत या तरुणाला त्वरित सेंट जॉर्ज रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### अतिवृष्टी अनुदानातून वगळल्याने परभणीतील शेतकरी आक्रमक

## गोदावरी नदीपात्रात जलसमाधी आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
परभणी, दि. २० :

अतिवृष्टी अनुदानाच्या यादीतून वगळल्याच्या निषेधार्थ परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील कासापुरी मंडळातील शेतकऱ्यांनी आज गोदावरी नदीपात्रात उतरून जलसमाधी आंदोलन केले.

सप्टेंबर महिन्यात कासापुरी मंडळात झालेल्या अतिवृष्टीची आकडेवारी 'स्कायमेट' या संस्थेने कमी दाखवल्यामुळे हे मंडळ सरकारी अनुदानातून वगळले गेल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या निषेधार्थ, शेतकऱ्यांनी ढालेगाव बंधाऱ्यातून थेट गोदावरी पात्रात प्रवेश करत आंदोलन सुरू केले.

जवळपास दोन तास हे आंदोलन गोदावरीच्या नदीपात्रात सुरू होते.




आंदोलनाची माहिती मिळताच तहसीलदार, पोलीस अधिकारी आणि कृषी अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाने आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा करून, २७ ऑक्टोबर रोजी स्कायमेट कंपनीचे प्रतिनिधी, शेतकरी आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. या लेखी आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आपले जलसमाधी आंदोलन मागे घेतले.

राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले होते. नद्या-नाल्यांना आलेल्या पुरामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पूर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची उभी पिके आडवी झाली, काही ठिकाणी पिकासह जमीनही वाहून गेली होती. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांवर संकट ओढवले आहे.

### काय आहेत शासकीय मदतीचे निकष?

आपातग्रस्त मृत व्यक्तीच्या वारसांना ४ लाख अर्थसाहाय्य मिळेल. ६० टक्क्यांहून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख आणि जखमी व्यक्ती रुग्णालयात दाखल असल्यास ५,४०० ते १६,००० रुपयांपर्यंत मदत मिळणार आहे. पूर्णतः नष्ट झालेल्या घरांसाठी (पक्क्या/कच्च्या) सपाट भागात १.२० लाख, तर डोंगराळ भागात १.३० लाख आणि अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी ६,००० (पक्के) ते ४,००० (कच्चे) पर्यंत मदत दिली जाईल. झोपडीसाठी ८,००० आणि गोठ्यासाठी ३,००० रुपयांची मदत मिळणार आहे.



## पण त्याने नेतृत्व होत नाही..

### राज ठाकरेंवर आठवलेंचा निशाणा



■ **मुंबई:** मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईतील सभेत भाजपवर आणि गुजरातसंबंधी धोरणांवर तीव्र शब्दांत हल्ला चढवला. महाराष्ट्रातील प्रमुख शहरे अदानी, अंबानीला आंदण देण्यासाठी तयार केली जात आहेत. गुजरातचा वरचष्मा जेव्हा महाराष्ट्रावर फिरेल, तेव्हा भाजपला मतदान करणारा मराठी माणूससुद्धा त्यात भरडला जाईल, असे राज ठाकरे म्हणाले. यावरून केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी राज ठाकरेंवर थेट निशाणा साधला आहे. आठवले म्हणाले की, राज ठाकरे सध्या जे बोलत आहेत, त्यातून त्यांच्या राजकीय दृष्टिकोनातील मर्यादा दिसून येतात. मुंबईचा इतिहास आणि सामाजिक बांधणी समजून घेतल्याशिवाय अशी विधाने करणे योग्य नाही. मुंबई हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे, पण तिचा गुजराती एक ऐतिहासिक आणि आर्थिक संबंधही आहे. शतकानुशतके मराठी आणि गुजराती समुदायांनी एकत्र येऊन मुंबई उभारली आहे. या दोघांच्या मेहनतीमुळेच हे शहर आज आर्थिक राजधानी बनले आहे. मुंबई हे महाराष्ट्राचे हृदय आहे, पण त्याच वेळी ती भारताच्या सर्व भागांशी जोडलेली आहे. राज ठाकरेंनी हे समजून घेतले पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिली.

आठवले यांनी राज ठाकरेंच्या भाषणशैलीवर टीका करताना राज ठाकरे यांना व्यंग्यात्मक भाष्य करण्याची आणि लक्षवेधी भाषणे देण्याची कला अवगत आहे, पण यातून महाराष्ट्राला काही ठोस परिणाम मिळालेले नाहीत. जर त्यांना खरोखर महाराष्ट्राच्या भल्यासाठी काही करायचे असेल, तर त्यांनी बहुजन विकास, शिक्षण सुधारणा आणि सामाजिक न्याय अशा क्षेत्रांमध्ये काम करावं. केवळ घोषणा देऊन आणि वाद निर्माण करून महाराष्ट्राचे नेतृत्व करता येत नाही.

## आपण सरकार असल्याच्या थाटात वागू नये



**पुणे :** पुण्यातील ऐतिहासिक वास्तू शनिवार वाड्याच्या आवारातील नमाज पठणावरून झालेल्या वादात विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांना थेट लक्ष केले आहे. पुरातत्व विभागाने संरक्षित केलेल्या शनिवार वाड्याच्या नियमांचे उल्लंघन झाले असल्यास, तिथे स्थानिक प्रशासन आहे. त्यामुळे 'इतर कोणीही आपण सरकार आहोत, या थाटात वागू नये,' असा सणसणीत टोला गोऱ्हे यांनी मेधा कुलकर्णी यांना लगावला.

शनिवार वाड्यात काही मुस्लिम महिलांनी नमाज पठण केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. रविवारी याच पार्श्वभूमीवर खासदार मेधा कुलकर्णी आणि हिंदुत्ववादी संघटनांनी वाड्याबाहेर जोरदार निदर्शने केली. मेधा कुलकर्णींनी नमाज पठण झालेल्या ठिकाणी जाऊन शिववंदना करण्याचा आणि तिथे गोमूत्र शिंपडण्याचा आग्रह धरला होता. मात्र, पोलिसांनी त्यांना मज्जाव केल्याने त्या आक्रमक झाल्या. आता यावरून नीलम गोऱ्हे यांनी मेधा कुलकर्णींना सुनावले आहे.

शनिवार वाडा ही पुरातत्व विभागाने संरक्षित केलेली वास्तू आहे. त्याचे काही नियम आहे. या नियमांचे पालन झाले पाहिजे. काही नियम मोडले असतील तर राज्य सरकार, पोलिस आयुक्त, जिल्हाधिकारी अस्तित्वात आहेत. त्यामुळे कोणीही आपण सरकार आहोत, या थाटात वागू नये, असा टोला नीलम गोऱ्हे यांनी मेधा कुलकर्णी यांना लगावला.

# स्थानिक निवडणुकांपूर्वी महायुतीत खदखद

### मित्रपक्षांकडून अस्तित्व संपवण्याचे प्रयत्न : शिंदे गटाच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांची तक्रार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :** राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू होण्याआधीच महायुतीमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सत्ताधारी आघाडीतच आता कुरघोडी सुरू असून, विशेषतः भाजपकडून शिंदे गटावर दबाव टाकण्याचे प्रयत्न सुरू असून, आमचे अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची तक्रार शिवसेना शिंदे गटातील नेत्यांकडून करण्यात येत आहे.

शिवसेना नेते आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत नुकत्याच पार पडलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत पक्षांतर्गत नाराजीचा सूर ठळकपणे उमटला.

सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीत आगामी निवडणुकांमध्ये स्वबळावर लढण्याचा विचार पुढे आला. नाशिक, नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद या विभागातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी भाजपसोबत युतीच्या ऐवजी स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली.



या बैठकीत सहभागी झालेल्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस या मित्रपक्षांवर युतीधर्म न पाळण्याचा आरोप केला. काही ठिकाणी भाजपकडून शिंदे गटाच्या विरोधकांना प्रवेश दिला जात असल्याचे सांगितले गेले. नंदुरबारमधील शिवसेना आमदाराने तर शिवसेनेचाच माजी जिल्हाप्रमुख भाजपसाठी काम करत असल्याचे सांगत पक्षात असलेल्या झारीतील शुक्राचार्यांकडे नेत्यांचे लक्ष वेधले.

सध्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, भिवंडी, उल्हासनगर, वसई-विरार आणि मिरा-भाईंदर या महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये भाजप-शिवसेना युतीबाबत संभ्रम कायम आहे. दोन्ही पक्षांकडून स्वतंत्र मोर्चेबांधणी सुरू असल्याचे चित्र आहे. ठाण्याचे आमदार संजय केळकर, नवी मुंबईतील नेते गणेश नाईक यांच्यासारख्या भाजप नेत्यांच्या अलिकडच्या वक्तव्यांमधून स्वतंत्र निवडणुकीच्या तयारीचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे शिंदे गटातही स्वबळावर लढायचे हे ठरवून आवश्यक ती पावले उचलली जात आहेत. मात्र, महायुतीतील तणाव आणि स्थानिक स्तरावरील वाद हे संपूर्ण आघाडीच्या एकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर, महायुती टिकवायची असेल तर केवळ समन्वय समित्यांच्या बैठका उपयोगी पडणार नाहीत, असे स्पष्टपणे बैठकीत सांगण्यात आले. युतीतील तीनही प्रमुख पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी थेट संवाद साधून मार्ग काढावा, अन्यथा महायुतीच्या एकसंघपणावर गंडांतर येऊ शकते आणि त्याचा थेट फायदा विरोधकांना होईल, अशी भावनाही अनेक पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# इतिहासात पापाचे धनी होऊ नका!



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी भाजपच्या कार्यकर्त्यांना आपल्या कृत्याकडे नीट डोळे उघडून पाहण्याचे आवाहन केले. इतिहासात आपल्या नावाची पापाचे धनी म्हणून नोंद होऊ देऊ नका. त्यामुळे आपण काय करत आहात व कोणते विष पोसत आहात याकडे एकदा डोळे उघडून नीट पाहा, असे उद्धव भाजप कार्यकर्त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देताना म्हणालेत.

नाशिकमध्ये मागील काही महिन्यांपासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला जोरदार राजकीय धक्के बसत आहेत. ठाकरे गटाच्या अनेक माजी नगरसेवकांनी सत्ताधारी भाजपसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला.

या आऊटगोईंगच्या पार्श्वभूमीवर आज भाजपच्या माजी नगरसेविका संगीता गायकवाड यांनी ठाकरे गटात प्रवेश केला. स्वतः उद्धव ठाकरे यांनी त्यांना शिवबंधन बांधले. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपवर कडाडून हल्ला चढवला. ते म्हणाले, तुम्ही सर्वजण एका चांगल्या दिवशी आला आहेत. आज नरक चतुर्दशी आहे. आज नरकासुराचा वध झाला. आत्ता हा नरकासुर कोण हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्याचा वध करण्यासाठी आपण शिवसेनेत आलात. आता हा प्रवास सुरू झाला आहे.

आजपर्यंत जे मतचोरी करून तिकडे बसले होते, त्यांना वाटले होते की, त्यांची चोरी कुणी पकडू शकणार नाही. पण त्यांची चोरी चोरासकट आपण पकडली आहे. या चोरांना हद्दपार करण्यासाठी मराठी माणसांसोबत अमराठी माणसेही एकत्र आली आहेत. एकत्र येत आहेत. देशात कुणालाही हुकूमशाही नको आहे. आपला महाराष्ट्र नेहमी लढणारा आहे.

आज तुम्ही सगळेजण शिवसेनेत आलात. पण तुम्हाला काही खोकेबिके मिळालेत का? हे सांगा. काही धाकदपटशहा आहे का? तुमच्या मागे काही एजन्सी लागली आहे का? काही नाही. शेवटी लालुच दाखवून घेतलेली माणसे आणि घाबरून पक्षांतर करणाऱ्या नेभळट माणसांपेक्षा हे कट्टर निष्ठावंत लोक शिवसेनेत येत आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाजप कार्यकर्त्यांना पापाचे धनी होण्यापासून स्वतःला दूर ठेवण्याचाही सल्ला दिला. ते म्हणाले, मी भाजपच्या सर्वच कार्यकर्त्यांना एक विनंती करतो की, आपण काय करत आहात आणि कोणते विषय पोसत आहात याकडे एकदा नीट डोळे उघडून बघा. इतिहासात आपण या पापाचे धनी म्हणून आपली नोंद होऊ देऊ नका.

## ना केंद्राचे पथक ना एनडीआरएफचा निधी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एसडीआरएफचा निधी मुद्दाम एनडीआरएफचा दाखवल्याचा आरोप केला आहे. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना पत्र देऊन २०-२५ दिवस झालेत, तर पंतप्रधान मोदींना मुंबईत येऊन १० -१५ दिवस झालेत. पण एनडीआरएफचा एक रुपयाही महाराष्ट्राला मिळाला नाही, असे ते म्हणालेत.



महाराष्ट्रात यंदा भयंकर अतिवृष्टी झाली. यामुळे महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांतील विशेषतः मराठवाड्यातील सर्वच पीकपाणी वाहून गेले आहे. शेतकऱ्यांना सरकारकडून मदतीची आस आहे. पण सरकारने अद्यापही त्यांना हवी तशी मदत केली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केंद्राने एनडीआरएफचा दुसरा अग्रिम हप्ता म्हणून आणखी १५६६.४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याचे सांगितले होते.


तसेच या प्रकरणी पंतप्रधा नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभारही मानले होते. पण आता आमदार रोहित पवार यांनी हा एनडीआरएफचा नव्हे तर एसडीआरएफचा निधी असल्याचा दावा करत मुख्यमंत्र्यांनाच तोंडघशी पाडण्याचा प्रयत्न केला आहे.

रोहित पवार याविषयी म्हणाले की, फडणवीस साहेब, आपल्याला कोणीतरी चुकीची माहिती दिली असावी. केंद्र सरकारने दिलेली ही रक्कम ठऊ‍‍ची नसून रऊ‍‍ची आहे. रऊ‍‍मध्ये केंद्र सरकारचा जो हिस्सा असतो तो केंद्र सरकारने दिला आहे, तो केंद्र सरकारला द्यावाच लागतो, त्यात काही विशेष नाही.

एनडीआरएफच्या विशेष मदतीसाठी राज्याने प्रस्ताव दिल्यानंतर केंद्रीय पथक पाहणी करते. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अध्यक्ष असलेली कमिटी निर्णय घेते किंवा कधीकधी आपत्तीचे स्वरूप बघून सुद्धा पथक येण्याआधी अॅडव्हॉन्समध्ये एनडीआरएफमधून निधी दिला जातो. पण दुर्दैवाने महाराष्ट्रात ना केंद्राचे पथक आले ना अॅडव्हॉन्समध्ये एनडीआरएफचा निधी आला. ही धुळफेक असल्याचे ते म्हणाले.

## भटक्या कुत्र्यांनी तोडले परीचे लचके

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २० :** दीपावलीच्या सणाची लगबग, घराघरांत आनंदाचे वातावरण असताना जालना शहरात सोमवारी सकाळी एक हृदयद्रावक आणि मन सुन्न करणारी घटना घडली. यशवंत नगर परिसरात राहणाऱ्या तीन वर्षीय चिमुकली परी दीपक गोस्वामी हिचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.



ही घटना घडताच शहरभरात शोककळा पसरली असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जालना-अंबड राज्य महामार्गालगत असलेल्या यशवंत नगर परिसरात सकाळी नऊच्या सुमारास स्थानिक नागरिकांना एका लहान मुलीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. परीच्या शरीरावर सर्वत्र कुत्र्यांच्या चाव्याच्या खुणा होत्या.

घटनेची माहिती मिळताच परीचे आई-वडील घटनास्थळी पोहोचले. स्थानिकांनी तातडीने तालुका जालना पोलिस ठाण्याला याबाबत कळवले. माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संतोष साबळे यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपानी, तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी स्वतः तपासाची सूत्रे हाती घेतली.

त्यांनी फॉरेन्सिक तज्ज्ञांची टीम घटनास्थळी पाठवली असून, सर्व पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. पोलिसांनी सांगितलं की, प्रथमदर्शनी परीवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला करून तिचा मृत्यू झाल्याचे दिसते आहे.

# जैन बोर्डिंग भूखंड विक्री व्यवहाराला स्थगिती, धर्मादाय आयुक्तांचा निर्णय

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २० :** पुण्यातील शिवाजीनगरमधील ऐतिहासिक एचएनडी जैन बोर्डिंग हाऊसच्या जागा विक्रीविरोधात सुरू असलेल्या लढ्याला मोठे न्यायालयीन बळ मिळाले आहे.

मुंबई येथील धर्मादाय आयुक्तालयात आज, २० ऑक्टोबर रोजी या प्रकरणाची तातडीची सुनावणी पार पडली. धर्मादाय आयुक्त अमोघ कलोटी यांनी या प्रकरणात स्टेटस को म्हणजेच सद्यस्थिती कायम ठेवण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे संबंधित जागेची विक्री तत्काळ थांबवण्यात आली असून, जैन समाजाच्या संघर्षाला मोठा दिलासा मिळाला आहे.

शिवाजीनगर येथील जैन बोर्डिंग हॉस्टेलची स्थापना १९५८ साली हिराचंद नेमचंद दोशी यांनी केली होती. येथे श्वेतांबर व दिगंबर जैन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह आहेत. अलीकडे या जागेवर नव्याने विकास करण्याच्या हेतूने काही विश्वस्तांनी पुढाकार घेतला. मात्र, समाजातील अनेक सदस्यांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला.

त्यानंतर, ही जागा परस्पर विकली गेल्याचा आरोप समाजातून करण्यात आला आहे. या व्यवहारात नियम व कायद्यांचे उल्लंघन करून पुण्याच्या धर्मादाय आयुक्तांनी जागा विक्रीला मंजुरी दिल्याचा आरोप करण्यात आला. शिवाय, या विक्रीप्रकरणात गोखले कन्स्ट्रक्शन कंपनीचा समावेश असून, या कंपनीचे संबंध खासदार मुरलीधर मोहोळ यांच्याशी असल्याचेही आरोप केले जात आहेत.

जैन बोर्डिंगच्या जमीन विक्रीविरोधातील याचिकेवर आज मुंबईत धर्मादाय आयुक्तांसमोर सुनावणी पार पडली. याचिकाकर्त्यांच्या वतीने अॅड. योगेश पांडे यांनी कायदेशीर पुरावे आणि भक्कम युक्तिवादासह बाजू मांडली.

लक्ष्मीकांत खाबिया, अक्षय जैन यांच्यासह समाजाचे अनेक प्रतिनिधी या सुनावणीसाठी उपस्थित होते. संपूर्ण समाजाचे लक्ष लागलेल्या या सुनावणीत न्यायालयाने स्टेटस्को आदेश दिला आहे.



## दिपमालिका दारोदारी

दि-वाळीच्या दिवसात
दिवे लावू अंगणात ।

प-रसात झाडांवर
विद्युत काजवा बागेत ॥

मा-ळ फुलांची सजवू ।
लक्ष्मी श्रीहरी बसवू ॥

लि-न होऊ भक्ती भावे ।
लक्ष्मीकलशा सजवू ॥

का-जव्यांची झगमग ।
जिकडे तिकडे लगबग ॥

दा-री रांगोळी काढुया ।
अंगण रंगवुनिया ॥

रो-षणाई लाल निळी ।
हिरवे फुले पिवळी ॥

दा-री उधळू उल्हासे ।
प्रेमानंदे हर्षोल्हासे ॥

री-त चालवू फुलवू ।
फटाके छान उडवू ॥



: रचनाकार :
**स्वरचैतन्य डॉ. मिलिंद इंदूरकर (मनवा)**
**नागपूर.**
**९५५२६०७६४६**



# दिवाळी गावाकडची....!

**भा**रतीय संस्कृतीतील प्रमुख सणापैकी दिवाळी हा प्रमुख सण आहे. साधारण हा सण पाच ते सहा दिवसांचा असतो. दिवाळसणाची चाहूल ही वसुबारसपासून लागते. दुसरा दिवस म्हणजे धनत्रयोदशी. तिसरा दिवस हा नरक चतुर्दशी म्हणून ओळखला जातो. चौथा दिवस हा लक्ष्मी-कुबेराच्या पूजनाचा असतो. या दिवशी लक्ष्मी कुबेर या देवतेचे पूजन केले जाते. धन हे लक्ष्मीचे प्रतीक मानल्या जाते. अर्थात पैसा केवळ हे गरज भागवण्याचे साधन असले, तरी घरात सुख-समृद्धी नांदो.यासाठी लक्ष्मी-कुबेराचे पूजन केले जाते. दिवाळी सणातील पाचवा दिवस हा दीपावली पाडवा व बलिप्रतिपदा म्हणून साजरा केला जातो. यातील दीपावली पाडवा पती-पत्नीच्या प्रेमाचे प्रतीक आहे, तर बलिप्रतिपदा हा शेतकरी राजांच्या उदार व समर्पण भावाचे प्रतीक आहे. दिवाळी सणातील अंतिम दिवशी भाऊबीज हा सण साजरा केल्या जातो. या दिवशी बहिण भावाला औक्षण करते. त्याच्या सुखा-समाधानासाठी व दीर्घ आयुष्यासाठी प्रार्थना करते. या सर्व पाच ते सहा दिवसांच्या सणांच्या आनंदमय वातावरणामुळे चहूकडे प्रसन्नता असते.

-----------------

या दिवाळी सणाला संपूर्ण महाराष्ट्राबरोबर भारतातील शाळा- महाविद्यालयांना सुट्ट्या असतात.जिल्ह्यानुरूप साधारण दहा ते पंधरा दिवसांच्या या सुट्ट्यांमध्ये मुले खूप धमाल करतात. मात्र गावाकडे आमच्या काळात काही अंशी वेगळी परिस्थिती होती.

प्रथम सत्र परीक्षा झाली की,आम्ही मुलं शेतात कामाला जायचो. हा काळ म्हणजे शेतकऱ्यांच्या सुगीचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात सोयाबीन, मका काढणीवर येतात तर झाडावर पिकलेल्या लाल मिरच्या तोडण्याची वेळ असते. त्याचबरोबर कापूस वेचणीचीही वेळ असते.

खरीप पिक घेऊन शेतकरी राजा हा रब्बी पिक पेरणीच्या तयारीला लागलेला असतो. तर या काळात शेतकरी हे शेतीच्या कामात गुंतलेले असायचे. खरिपातील हंगाम घेऊन रब्बीच्या तयारीला लागलेले असायचे. दिवाळीच्या सुट्ट्या लागलेल्या असायच्या. आमच्याकडे स्वतःची शेती नव्हती.आम्ही भावंडे गल्लीतील मित्रमंडळीसोबत दुसऱ्याच्या शेतात किलो प्रमाणे मिरच्या तोडायला व कापूस वेचला जायचो.

गावाकडील शाळेला दिवाळीला मस्तपैकी पंधरा दिवस सुट्ट्या असायच्या व आमच्या मनाच्या त्यात पाच दिवसअश्या एकूण साधारण वीस दिवसाच्या सुट्ट्या पकडून शाळेला दांडी असायची. सुट्ट्या लागल्याबरोबर दुसऱ्या दिवशी कुणी शेतकऱ्यांने बोलवल्यास शेतात मिरच्या तोडायला व कापूस वेचायला कामावर येण्यास हो म्हणायचो. कारण या कामातून मिळालेल्या पैशातून आम्ही पोरं फटाके, शाळेच्या वस्तू वगैरे घ्यायचो.

मला तर लहानपणापासून शालेय वस्तूंचीच आवड होती.त्यामध्ये विशेषतः छान पेन, चित्रकलेची वही, रंग कामाचे साहित्य, एखादे-दोन छान-छान गोष्टीचे पुस्तके यासाठी हा सर्व खर्च करायचो. कारण मला लहानपणापासून चित्रकला, पुस्तक वाचनाबरोबर शाळेसंबंधी वस्तू खरेदी करण्याची खूप हौस होती. अजूनही आहेच. त्यामध्ये विशेषतः डायरी, पेन पुस्तक रंगकामासाठी साहित्य या गोष्टी मला अजूनही खरेदी करायला आवडतात.

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये सकाळी लवकर उठायचो. ऑक्टोबर-नोव्हेंबरचा काळ असल्यामुळे काही अंशी थंडीची चाहूल लागलेली असायची. त्यातही आई-बाबा आम्हाला सकाळी पाच ते सहा वाजताच झोपेतून उठवायचो. आंघोळ केली की झोप उडवायची. मात्र थंडी जाणवल्यास बाहेर शेकोटी पेटवायचो. शेकोटीतून उब घ्यायचो. तोपर्यंत आई स्वयंपाक बनवायची. आई ववरात नेण्यासाठी पालवामध्ये भाकरी बांधून द्यायची. एक टोपलं घेऊन मिरच्या तोडण्यासाठी ववरात निघायचो.

कापूस वेचायला गेलो तर मात्र, आईच्या जुन्या लुगड्याचा कापड घेऊन जायचो,कारण कापूस वेचण्यासाठी त्याची ओटी बनवावी लागायची. सकाळी-सकाळी सुंदर सूर्यप्रकाशात आम्ही पोरं पंढरीला निघणाऱ्या वारी प्रमाणे पांद-रस्त्याने ववरात जायचो. जातांना मौज-मस्ती करत जायचो. रस्त्याने एखादी विहीर लागली की, लगेच एक डुबकी मारायचो. तशाच ओल्या अंगाने कुडकुडत निघायचो.



**विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ, ता. जि. बुलडाणा.**
**9763282077**

हवेने आणि सूर्यप्रकाशाने अंगावरील कपडे कधी सुकून जायचे हे कळतही नव्हते. खरंच! किती हा रांगडेपणा...! आता आठवण आली तर डोळ्यातून अश्रूंच्या धारा थांबत नाही. या आठवणींच्या साठवणीचं भलं मोठं गाठोड उकलायला लागलो की, गावाकडील जगलेलो सुवर्णक्षण एकामागून बाहेर पडतात व मन आठवणीत रमून जातं.

ववरात पोहोचले की, आंब्याच्या किंवा निंबाच्या झाडाला चटणी,भाजी भाकरी टांगून द्यायचो. कारण खाली ठेवली तर कुत्रे येऊन खाऊन टाकायचे. काम करून थकल्यामुळे अश्यावेळेस कडाडून भूक लागल्यावर पंचायत व्हायची. म्हणून तशी काळजी घ्यावी लागे. ववरातील एक तास म्हणजे एक सरळरेषेत लावलेली मिरचीच्याकिंवा कपाशीच्या झाडांची रांग. तर अश्या दोन रांगा एका-एकाने घेऊन मिरची तोडायला किंवा कापूस वेचायला सुरुवात करायचो.

त्या दोन तासाला वखर म्हणायचे. दिवसभरातून साधारण आम्हां चौदा ते पंधरा वयोगटातील मुलांकडून साधारण तीस ते पस्तीस किलोपर्यंत मिर्च्या तोडून व्हायच्या. संध्याकाळी शेतमालक तोडलेल्या मिरच्यांची पोतडी वजन काट्याला टांगून वजन करायचे. कागदावर नाव लिहून नोंद ठेवायचे. साधारण एक रुपया किलो प्रमाणे प्रमाणे तोडायची मजुरीअसायची. म्हणजेच तीस ते पस्तीस रुपये रोज त्या काळात आम्ही शेतात काम करून कमवायचो.

दिवाळीच्या या पंधरा ते वीस दिवसाच्या सुट्ट्यांमध्ये जवळपास दहा ते बारा दिवस कामाला गेल्यावर साधारण साडेचारशे ते पाचशे रुपये कमवायचो. चारशे ते पाचशे रुपये म्हणजे आमच्यासाठी खूप होते. एका आठवड्याचे किंवा साधारण दोन आठवड्याचे हे बाजाराच्या दिवशी जमा झालेले पैसे आम्ही मुलं एका डब्यात ठेवायचो.

दिवाळी जवळ आली की, आवडीच्या वस्तू खरेदी करायचो. खेड्यातील हे जीवन म्हणजे गोरगरीब लोकांच्या जीवन जगण्याच्या कसोटीतील क्षणांचा चित्रपट असतो.अनेक अडचणी असूनही आनंदाने कसे जगावे? खेड्यातील माणूस यातील एक कलाकार म्हणून महत्त्वाची भूमिका निभावत असतो. जरी त्याची नोंद नसली तरी, मात्र ज्याने हे क्षण अनुभवले तो त्या कथेतील नक्कीच हिरो असतो.

विशेषतः गावाकडील माझा शेतकरी राजा. हा दिवाळसणासारख्या या प्रमुख सणांमध्ये सुद्धा शेतात राब-राब राबत असतो. केवळ सर्वांच्या मुखी घास यावा. यासाठी तो सदैव झटत असतो. येणाऱ्या अस्मानी, सुलतानी संकटांचा सामना करत. तो खंबीर उभा असतो. एखाद्या पर्वतासारखा.ऊन, वारा पाऊस सर्व काही सुख-दुःख सहन करत जगत असतो.

दिवाळसणातील वसुबारसच्या पहिल्या दिवसापासून लागलेली चाहूल ते भाऊबीज या दरम्यान शाळेला लागलेल्या पंधरा ते वीस दिवसाच्या सुट्ट्यात ववरात जाऊन जमवलेल्या पैशातून आवडीच्या वस्तू खरेदी करायचो. काहीजण घरातील गरजेच्या वस्तूसाठी हातभार लावायचे. बाबा आमच्यासाठी कपडेलत्ते घ्यायचे. आई गोडधोड असे फराळाचं बनवायची. त्यामध्ये चकली, चिवडा, शेव बेसनाचे लाडू, रव्याचे लाडू शंकरपाळे, करंजी वगैरे असे पदार्थ असायचे.

मित्रमंडळी एकमेकांना फराळाला बोलवायचे. यातून गाठीभेटी व्हायच्या. परिस्तिथी लक्षात घेऊन काही वडिलधारे मंडळीनी नवीन कपडे खरेदी केले नाही तरी त्यांना स्वच्छ धुऊन प्रेस मारून घालायचे.मात्र कधी त्याचे दुःख मानले नाही. मर्यादित गरजा होत्या.मात्र त्यातही जगण्यात खूप आनंद होता. गावाकडील लोकांचं जगणं व जश्या आहे तश्या परिस्थितीत आनंद मानून सण साजरे करण्यात खूप मोठे गूढ आणि समर्पण सुद्धा होते.

गावाकडील लोक सुखी, समाधानी व आनंदी आहेत. त्यांना डिजिटल लाईफ अजून माहीत नाही. अन जे झगमगाटात जगतात. डिजिटल होऊ पाहतात त्यांना एकमेकांना स्टोरी, स्टेट्स ठेऊन दाखवाव लागतंय कि, आम्ही आनंदी आहोत.

विशेष म्हणजे काहीजण तर, या पण भ्रमात असतात स्टोरी, स्टेट्स न टाकणारे सुखात नसावेत.पण सत्य असं असतं की, ते लोक दाखवण्यापेक्षा प्रत्यक्षात त्या वास्तविक क्षणात त्यांचं सुख साजरं करत असतात. त्यांना या दिखावेपणाच्या मायावी जगाची अनुभूती आधीच आलेली असते.

अशी ही गावाकडील साजरी होणारी ही दिवाळी खरंच! सुवर्णक्षणाचा साठा आहे. गावाकडील लोकांचा सण समारंभ साजरा करण्यात साधेपणा असला तरी मात्र रूढी, परंपरेला व संस्कृतीला धरून सण साजरे होतात. त्याचप्रमाणे निखळ प्रेम, आनंद, प्रसन्नता दिसून येते.अश्या या गावाकडील दिवाळीच्या आठवणी कायम स्मरणात राहतील.

# पीक नुकसानीच्या शासन आदेशाची शेतकरी संघटनेच्या वतीने होळी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २० :

राज्य शासनाने पीक नुकसान, पूरग्रस्तांसाठी जाहीर केलेले ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मदत पॅकेज फसवणूक करणारे आहे, असे म्हणत शरद जोशी स्थापित शेतकरी संघटनेकडून शासन आदेशाची होळी करण्यात आली. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी दीड लाखाची मदत देण्यासह अन्य त्यांच्या हक्कांचे लाभ देण्यात यावेत, यासह अन्य मागण्या करण्यात आल्या. जून ते सप्टेंबर दरम्यान राज्यात अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज व सवलती घोषित करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने ९ व १० ऑक्टोबर रोजी दोन शासन निर्णय जारी केले. मात्र, राज्यात अतिवृष्टी, पूर आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

बाधितांना दिलासा देण्यासाठी शासनाने जाहीर केलेले पॅकेज हे केवळ आकड्यांची हेराफेरी असून, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हाती काहीही पडणार नाही, असा आरोप शेतकरी संघटनेने यापूर्वीच केला होता.

त्यानुसार संघटनेकडून शासन निर्णयाची होळी करून या निर्णयाविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित बहाळे यांच्या उपस्थितीत हे आंदोलन पार पडले. या आंदोलनात संघटनेचे सोशल मीडिया प्रमुख विलास ताथोड, विनोद मोहोकार, कांचन जांभळे, विजय खन्नाडे, विलास पाटील, सुरेश जोगळे, राजाभाऊ देशमुख, सतीश उंबरकर, सुगत भटकर, दादाराव गवई, सुनील दोड आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

पॅकेजमध्ये विजेच्या बिल माफीबाबत अस्पष्टता आहे. ही माफी शेतीचे की घराचे, याचा उल्लेखच नाही, असे ललित बहाळे म्हणाले. आधीच केंद्राने सर्व आयात शुल्क रद्द करून परदेशी शेतीमालाची आयात वाढवली, त्यामुळे बाजारात भाव घसरले आहेत. जीएम बियाण्यांवरील बंदी कायम ठेवून शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग बंद केला आहे. निगेटिव्ह सबसिडायझेशनचा मूलभूत मुद्दा गत अनेक दशकांपासून भारतात कृषी उत्पादनांच्या किंमती येनकेन प्रकारे सरकार ठरवत आली आहे ही लूट आता थांबली पाहिजे एवढेच नव्हे तर लुटवापसी झाली पाहिजे, असे शेतकरी संघटनेचे पदाधिकारी म्हणाले.

पहिल्या शासन निर्णयात सर्वाधिक नुकसान झालेले अकोला व मूर्तिजापूर तालुके वगळण्यात आले होते. शेतकरी संघटनेने मूर्तिजापूर येथे तीव्र आंदोलन केले. हा मुद्दा संबंधित लोकप्रतिनिधींचा मदतीचा नव्हे तर अस्मितेचा बनवला, अशी टीकाही बहाळे यांनी केली. अकोला पूर्व व मूर्तिजापूर हे दोन्ही विधानसभा मतदारसंघ गत दीड पेक्षा जास्त दशकापासून भाजपच्या ताब्यात आहेत.


शेतकऱ्यांची फसवणूक सरकारचा हा निर्णय शेतकऱ्यांची फसवणूक करणारा आहे, अशा शब्दात ललित बहाळे यांनी महायुतीवर टीकास्त्र डागले. कोरडवाहू पिकांसाठीची मदत १३,६०० रुपयांवरून केवळ ८,५०० रुपये प्रति हेक्टरवर आणण्यात आली आहे.

बागायती पिकांसाठीची मदत कमी केली असून विहिरीच्या दुरुस्तीची मदत २०१८ मधील १ लाखावरून केवळ ३०,००० रुपयांवर आणली आहे. शासनाने शेतकऱ्यांची लूट केली असून ती रक्कम शेतकऱ्यांना परत करावी.

तसेच पिकांना योग्य भाव आणि बाजार स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, असे ते म्हणाले.



# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३२० कोटी रुपयांच्या निधीची गरज



**यवतमाळ :** गेल्या काही वर्षांपासून सातत्याने शेतकऱ्यांना अस्मानी आणि सुलतानी संकटांचा सामना करावा लागत आहे. त्यातच भर म्हणून यंदाही खरीपाच्या हंगामात पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले. एकट्या सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचा फटका तब्बल ३ लाख ७५ हजार हेक्टरवरील शेतीपिकांना बसला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत करता यावी यासाठी जिल्हा प्रशासनाने तब्बल ३२० कोटी १५ लाख रुपयांच्या निधीच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात नुकसानीचा ठरला आहे. त्यात एकीकडे सुमारे १ लाख शेतकऱ्यांना यंदा पिककर्जच उपलब्ध झाले नाही, तर दुसरीकडे पावसाळ्यात चारही महिन्यात जोरदार बरसलेल्या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामध्ये सर्वाधीक नुकसान एकट्या सप्टेंबर महिन्यात झाल्याचे दिसून येत आहे. सप्टेंबर महिन्यात बरसलेल्या मुसळधार पावसामुळे ३ लाख ७५ हजार हेक्टरवरील खरीपाच्या पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचा फटका २ लाख ६० हजार शेतकऱ्यांना सहन करावा लागला आहे.

पावसाने उघडीप देताच सप्टेंबर महिन्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे तयार करण्यात आले होते. मात्र शासनाच्या नव्या निकषानुसार मदत मिळणार असल्याने पुन्हा मदतीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये या पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी ३२० कोटी १५ लाख रुपयांच्या निधीची मागणी करणारा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने शासनाकडे पाठवला आहे. नुकसानीच्या मदतीसंदर्भात शासनाकडून काय कारवाई होते याकडे लक्ष लागले आहे. नव्या निकषानुसार मागीतली मदत शासनाच्या निकषानुसार पूर्वी २ हेक्टरपर्यंत नुकसानीची मदत देण्यात येत होती.

# मातींच्या दिव्यांऐवजी चायनीज दिव्यांना पसंती



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २० :

दिवाळीला सुरुवात झाली असून, नागरिकही खरेदीसाठी शहरातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात दाखल झाले. या बाजारपेठेत दिवाळीला आवश्यक अशा विविध साहित्यांची दुकाने सजली आहेत. यात दिवाळीला लागणाऱ्या दिव्यांना चांगलीच मागणी असते. मात्र या वेळी मातीच्या दिव्यासह सेलचे, पाण्यावरील, विजेच्या दिव्यांनाही मागणी वाढल्याचे चित्र दिसत आहे. चीनमधून आयात होणाऱ्या या दिव्यांची रोषणाई नागरिकांना आवडत आहे. त्यामुळे या दिवाळीला तेलाच्या ऐवजी सेल-वरील दिव्यांची रोषणाई पाहायला मिळणार आहे. शहरातील बाजारपेठेतून लाखो दिव्यांची विक्री होत असून, १५ ते २० लाखांपर्यंतची उलाढाल होण्याचा अंदाज आहे. चिनी सेलचे दिवे मुंबई, गुजरात येथून मोठ्या प्रमाणात शहरातील बाजारपेठेत विक्रीस उपलब्ध झाले आहेत. सध्या नागरिकांना या दिव्यांचे आकर्षण असून, खरेदी वाढल्याचे चित्र दिसत आहे. या वेळी बाजारात पाण्यावरील दिवे, सेलचे बटन असलेले दिवे, टी लाइट, वॅक्स दिवे, शाडो दिवे, स्मोकलेस दिवे आदी उपलब्ध आहेत. या दिव्यांसह फॅन्सी कँडल ही उपलब्ध आहेत. हे दिवे व कँडल अनेक रंगात उपलब्ध असून रंगीत दिव्यांचे जास्त आकर्षण आहे. सध्या या दिव्यांची बाजारपेठेत प्रति डझन किंमत १५० रुपयांपासून ८०० रुपयांपर्यंत आहे. हा सेलवरील दिवा ४ दिवस चालतो. या दिव्यांना तेल, वातीची गरज नाही. तसेच हा दिवा हवेतही सुरूच राहतो. त्यामुळे सध्या नागरिकही या दिव्यांची मागणी करत असून, या दिवाळीला अंगणात तेलाच्या ऐवजी चिनी सेलच्या दिव्यांची रोषणाई होणार आहे.

या दिव्यांची विक्री मोठ्या


## कार्यालय नगरपरिषद काटोल, जिल्हा नागपूर

क्रमांक नपका/बांध.वि./१४२/२०२५ दिनांक-२०/१०/२०२५

**निविदा सुचना**

काटोल नगरपरिषदेला (न.प. निधी अंतर्गत) प्रभाग क्रमांक ०१ पंचवटी नबीरा लेआऊट श्री राजा भोज समाजभवनचे बाजुला असलेल्या खुल्या जागेत खालील प्रमाणे ग्रीन जीम साहीत्य खरेदी करून फिटींग करावयाचे आहे, त्याकरिता इच्छुक दुकानदार / कंपनी यांचेकडून ग्रीन जीम साहीत्याचे प्रती नग दर मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पुरवठाधारकांनी (दुकानदार / कंपनी) यांनी दिनांक-२९/१०/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत अनामत रक्कम रुपये २०००/- न.प. कार्यालयात रोखीने भरणा करून ग्रीन जीम साहित्याचे दर निविदा प्रपत्र नाध्ये नमूद करून सादर करावे. या साहीत्याबाबत कोरी निविदा प्रपत्र किंमत रुपये ७५०/- न.प.मध्ये जमा करून दिनांक २८/१०/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत बांधकाम विभागातून कोरी निविदा प्रपत्र प्राप्त करता येईल.

| अ.क्र. | विवरण (ग्रीन जीम साहीत्य) | अ.क्र. | विवरण (ग्रीन जीम साहीत्य) |
|---|---|---|---|
| 1) | Single Air Walker | 2) | Single Chest Press |
| 3) | Rower | 4) | Two Wheel Shoulder Builder |
| 5) | Sky Walker | 6) | Twister Seating & Standing |
| 7) | Single Sit Up Board | 8) | Double Leg Press |
| 9) | Cycle | 10) | Leg Press Post |
| 11) | Surf Board Double | 12) | Horse Rider |

अटी व शर्ती:-

१) वरील साहीत्याकरिता पहिल्या लिफाफामध्ये पुरवठाधारकाने (दुकानदार / कंपनी) अनामत रक्कम रोख भरल्याची पावती, आवश्यक सर्व कागदपत्रे (जसे-आधार कार्ड, पॅन कार्ड, जी.एस.टी. सर्टिफिकेट, दुकानाचा / कंपनीचा नुतनीकरण झालेला व दिनांक ३१ मार्च २०२६ पावेतो वैध असलेला परवाना,MSME, Zed व ISO सर्टिफिकेट, आवश्यक असणारी व लागणारी सर्व कागदपत्रे) संलग्न करणे आवश्यक राहील. दुस-या लिफाफामध्ये दराची सिलबंद निविदा (दर नमुद करून) सादर करावी. नमुद केलेल्या ग्रीन जीम साहीत्याचे दरामध्ये सर्व कर समाविष्ट करून दर सादर करावे. ग्रीन जीम साहीत्य आपणास नमुद स्थळावर स्वखर्चाने पोहचता करून फिटींग करून द्यावे लागेल.

२) सर्व निविदा धारकाकडून / पुरवठा धारकाकडून अनामत रक्कम रोख स्वरूपात किंवा न.प. चे नावे असलेली डी.डी. स्वरूपात स्विकारण्यात येईल. अन्य स्वरूपातील अनामत रक्कम ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३) एक किंवा सर्वच निविदा कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार निम्न हस्ताक्षरकर्ता यांनी राखुन ठेवलेला आहे. इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत बांधकाम विभागात पाहावयास मिळेल.

४) प्राप्त होणा-या दराच्या सिलबंद निविदा दिनांक-२९/१०/२०२५ ला सायंकाळी ५.०० नंतर शक्य झाल्यास उघडण्यात येईल. प्रशासकीय कारणास्तव शक्य न झाल्यास नंतरचे दिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येईल

५) न.प. निधीचे उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. बिलामधुन अनुज्ञेय सर्व कपाती करण्यात येईल.

(धर्मणाय बोरीकर)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
नगर परिषद काटोल


# 'सामर्थ्य'ची 'सामाजिक उपक्रमांची दिवाळी पहाट



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २० :

वंचित, गरजू, निराधारांच्या जीवनात दिवाळसणाचा आनंद पेरुन 'सामाजिक उपक्रमांची दिवाळी पहाट' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम सामर्थ्य फाउंडेशनच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून निरंतर राबवण्यात येत आहे. संस्थेच्या वतीने रविवारी सूर्योदय बालगृहातील बालकांसाठी किराणा, धान्य, जीवनावश्यक वस्तू व फटाक्यांचे वाटप करण्यात आले. दीपोत्सवानिमित्त प्रत्येक घरात चैतन्याचे वातावरण असते. नवीन कपडे, फटाक्यांचे आतषबाजी व खमंग फराळाच्या मेजवानीचा आनंद घेतला जातो. समाजातील गरजू, निराधारांना सुद्धा सणाचा आनंद मिळण्यासाठी सामर्थ्य फाउंडेशनने पुढाकार घेतला. अनेक गरजूंच्या जीवनात दिवाळीचा आनंद पेरण्यासाठी संस्थेच्या वतीने सूर्योदय बालगृहात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. यावेळी सूर्योदय बालगृहाचे अधीक्षक शिवराज पाटील, संस्थेचे अध्यक्ष प्रबोध देशपांडे, वरिष्ठ उपाध्यक्ष विनोद देव, सचिव डॉ. गजानन वाघोडे, सहकोषाध्यक्ष प्रशांत चाळीसगावकर, कायदेविषयक सल्लागार ॲड. संतोष भोरे, कार्यकारिणी सदस्य राजकुमार उखळकर, विजय शिंदे, मिलिंद देव, माधव मुंशी, डॉ. संजय शेंडे, आदी उपस्थित होते. गरजू, निराधारांच्या जीवनात दिवाळीचा आनंद पेरण्याचा 'सामर्थ्य'चा उपक्रम स्तुत्य असल्याची भावना शिवराज पाटील यांनी व्यक्त केली. डॉ. संजय शेंडे यांनी मुलांना शिक्षणाचे महत्व विषद केले. प्रबोध देशपांडे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

# चिमुकल्यांची वर्गणी; २० क्विंटल साहित्य, रोख रक्कम

## पूरग्रस्तांसाठी दिला मदतीचा हात



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २० : पूरग्रस्त गावात मदतीचे वितरण करण्यात आले. पूरग्रस्त गावात मदतीचे वितरण करण्यात आले. अतिवृष्टिग्रस्त शेतकरी, पूरग्रस्तांचीही दिवाळी गोड व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. शालेय जीवनापासून सामाजिक दायित्वाची जाणीव प्रगल्भ व्हावी, यासाठी जेआरडी टाटा स्कूल-एज्युकेशन लॅबच्या व्यवस्थापनाकडून विद्यार्थ्यांना संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या वेदना सांगितल्या. विद्यार्थ्यांनी शेतकरी व पूरग्रस्तांच्या मदतीसाठी परिसरातील नागरिकांकडून वर्गणी केली. स्वतः ही वर्गणी दिली. त्यांना शेतकरी जागर मंच व अकोट तालुक्यातील देवर्डा येथील ग्रामस्थांनी भरीव मदतीचा हात दिला. यातून धान्यासह २० क्विंटल साहित्य गोळा झाले. हे साहित्य मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील बाऊची येथे वितरीत करण्यात आले.

# कॉंग्रेसतर्फे काळी दिवाळी साजरी

**दर्यापूर, दि. २० :** तालुका व शहर कॉंग्रेसच्या वतीने कॉंग्रेस तालुकाध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांच्या नेतृत्वात तर अकोटचे सभापती तथा पक्षनिरीक्षक प्रशांत पाचडे यांचे प्रमुख उपस्थितीत तहसील कार्यालय दर्यापूर येथे शिदोरी आंदोलन केले. यावेळी काळी दिवाळी साजरी करून शासनाचा निषेध व्यक्त केला. जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची झाली आहे. सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मालाला भाव नाही आणि शासनाकडून अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. दिवाळी सारख्या आनंदाच्या सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मात्र निराशेच्या गर्तेत आहेत.


## मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
अभियांत्रिकी कामे

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. अ.क्र.१. निविदा सूचना क्रमांक: ३७-२०२५-एसआरडीईएनसी, तारीख: २०.१०.२०२५. कामाचे नाव: एडीईएन / केडब्ल्यूडी / बीजी उपविभागांतर्गत केडब्ल्यूडी (प्रकार-३ ०४), एनएलएम (प्रकार-११ ०४ युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टरचे बांधकाम. कामाची अंदाजे किंमत: रु. १,७३,२६,९६१.९५. बकाया रक्कम: रु. २३६६००/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: ०६ महिने. देखभाल कालावधी: २४ महिने. अ.क्रमांक: २. निविदा सूचना क्रमांक: ३८-२०२५-एसआरडीईएनसी, तारीख: २०.१०.२०२५. कामाचे नाव: एनएलएम (प्रकार-३ ०४), ओएसए (प्रकार-११ ०४ युनिट्स) आणि डीकेवाय (प्रकार-२ ०२ युनिट्स) येथे एडन / एलयूआर अंतर्गत नवीन क्वार्टरचे बांधकाम. कामाची अंदाजे किंमत: रु. २,१४,१४,२३३.३१. बकाया रक्कम: रु. २५७१००/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: ०६ महिने. देखभाल कालावधी: २४ महिने. अनुक्रमांक: ३. निविदा सूचना क्रमांक: ३९-२०२५-एसआरडीईएनसी, तारीख: २०.१०.२०२५. कामाचे नाव: एसएसई / पी.वे / एमआरजे अंतर्गत एडीईएन / पीव्हीआर उपविभाग अंतर्गत दोन वर्षांच्या कालावधीसाठी विविध पी.वे काम. कामाची अंदाजे किंमत: रु. २,३५,०८,४७४.०७. बकाया रक्कम: रु. २,६७,६००/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: २४ महिने. देखभाल कालावधी: नॅशनल बँक.www.ireps.gov.inवेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १०.११.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: १०.११.२०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार पाहण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदेत कोणतेही बदल/शुद्धीपत्रक जारी केले आहे ते लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम),
मध्य रेल्वे, सोलापूर
DE/Sur-64

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है



## मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
जीएसयू / विद्युत काम (जी)

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सीपीएम, गती शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामासाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. ई-निविदा सूचना क्रमांक: ०७-२०२५-जीएसयू-इलेक्ट-जी, दिनांक: १७.१०.२०२५. कामाचे नाव: इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस काम (अ) येथे पार्सल आणि मुख्य शेड सर्व्हिस सुविधांची तरतूद (१) सोलापूर: सीजीएस कार्यालय आणि पार्सल कार्यालयाची तरतूद (२) कलबुर्गी: पार्सल कार्यालयाची तरतूद (३) कुर्डुवाडी: हमाल खोली आणि सीजीएस संस्थेच्या वतीने सुविधा (४) वाडी: पार्सल कार्यालय आणि स्टोअर रूमची तरतूद (५) पंढरपूर: हमाल खोलीची तरतूद. (ब) वाडी - वाडी स्टेशनच्या पीएफ १/२ आणि ३/४ चे पुनर्बांधणी आणि इतर सुधारणा कामे. कामाची अंदाजे किंमत: रु. १,७०,९५,९२२.४८. बकाया रक्कम: रु. २,३५,५००/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ (बारा) महिने. देखभाल कालावधी: स्थापना सुरू झाल्यापासून / ताब्यात घेतल्यापासून १२ (बारा) महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १०.११.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: १०.११.२०२५ दुपारी ३:३० वाजेनंतर. वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in टीप: संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल: www.ireps.gov.in

मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (जीएसयु),
मध्य रेल्वे, सोलापूर.
DE/Sur-63

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है



## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
E-TENDER NOTICE

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites e- tenders in B-1 form / appropriate form for the following work. These e-tenders can be purchased by the registered contractors from the office of the Executive Engineer (Electrical) N.M.C., Nagpur. Purchase and submission of tenders can be done from the office of the Executive Engineer (Electrical) N.M.C., Nagpur

| Name of the work | Project Cost |
|---|---|
| S and E 6 mtr Poles with LED Fittings Rajnagar, Sankalp Nagar, Gopalkrushan Nagar, New Nandanwan, Chitanvis Nagar, Mitravihar Nagar, Dhanwantari Nagar, Pawansut Nagar and Varios Location in P.No. 26, 27 & 28 Zone No. 5, Neharu Nagar. | Rs. 838527/- |

Notes : (1) Tender Submission end date : 28.10.2025 (2) Date of Opening of Tender (If Possible) : 29.10.2025. (3) Rate are exclusive of G.S.T.

Advt No. 583 PR
Date 20.10.2025

Executive Engineer (Electrical)
N.M.C., Nagpur



## कार्यालय नगर परिषद वाडी
तह जिल्हा नागपूर (ग्रामीण) नागपूर
Email:-comewadi@gmail.com

जा.क्र./नपवा/स्वपापुवि/ २२१४ /२०२५ दि.: २०/१०/२०२५

**जाहीर निविदा सुचना-१/२०२५-२६**

मुख्याधिकारी नगर परिषद वाडी ता. जि. नागपुर यांच्या वतीने नगर परिषद वाडी कडे असलेल्या घंटागाड्या, सायकल रिक्षा, ट्रॅक्टर, स्विपींग मशिन, ई-रिक्षा दुरुस्ती करणे या कामासाठी चालु बाजारभाव मुल्यानुसार स्थानिक पातळीवरील नोंदणीकृत संस्था व कंत्राटदारा मार्फत निविदा मागविण्यात येत आहे. इच्छुक अनुभवी अधिकृत निविदाधारकांनी / नोंदणीकृत संस्था/ एजेन्सीने आपले सिलबंद निविदा पत्रक दि. २१/१०/२०२५ ते २९/१०/२०२५ दुपारी ०५.०० वाजेपर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत निविदा दरपत्रक सादर करावे. उशिरा प्राप्त झालेले निविदा पत्रक स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

टिप :- अटी व शर्ती निविदा फार्म मध्ये नमुद आहेत.

(डॉ. ऋचा धाबर्डे)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी. जि. नागपूर



## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर
(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)
कार्यकारी अभियंता, नागपूर पाटबंधारे विभाग (उत्तर), नागपुर यांचे कार्यालय
Email :eenmpdwrd@gmail.com दुरध्वनी क्र. :- ०७१२-२५६११८५

जावक क्र./५०३८/भा.शा/२०२५ दि.: २०/१०/२०२५

**कोटेशन- नोटीस ३/२०२५-२६ (शुध्दीपत्रक)**

कार्यकारी अभियंता, नागपूर पाटबंधारे विभाग (उत्तर), नागपुर या कार्यालयामध्ये निरक्षिण वाहन भाडेतत्वार वाहन चालकासह लावण्याकरीता पात्र नोंदणीकृत सह.संस्था नागपूर जिल्हा यांच्या कडून त्यांचे लेटर हेडवर दि.२०/१०/२०२५ ते २९/१०/२०२५ पर्यंज दरपत्रक मागविण्यात येत होते. सदर दरपत्रकामध्ये कंत्राटदार यांच्या वर्गामध्ये बदल झालेला असुन नॉदणीकृत सह.संस्था नागपूर जिल्हा या ऐवजी कंत्राटदाराचा प्रवर्ग खुला समजण्यात यावा.

कार्यकारी अभियंता
नागपूर पाटबंधारे विभाग (उत्तर),
नागपुर



## कार्यालय नगर परिषद सावनेर जिल्हा नागपूर

क्रमांक - नपसा / बांध. वि/३८२२/२०२५ दि.: १७/१०/२०२५

**जाहीर ई - निविदा सुचना**

मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर जि. नागपुर यांचे वतीने नागरी दलितेत्तर योजना सन २०२५-२६ योजनेतुन प्रस्तावित कामाच्या बी-१ दोन लिफाफा पद्धतीच्या निविदा सुचना मागविण्यात येत आहे. या कामाच्या निविदा केवळ ई पद्धतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना व अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ www.mahatenders.gov.in दिनांक २० / १० /२०२५ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे. इच्छुक कंत्राटदारांनी वरील साईट वर भेट दयावी.

मुख्य अधिकारी
नगर परिषद सावनेर



कार्यालय
## ग्रामपंचायत बिना
पंचायत समिती कामठी ,ता.कामठी .जि नागपूर

**ई-निवदा सुचना क्र.१/२०२५/२६ (पहिली वेळ)**

जिल्हा परिषद नागपूर ग्रा.पं.बिना अंतर्गत जि.प.वेबसाईटवर www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून सदर संकेतस्थळ खालील नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती उपलब्ध असून शासन स्तरावरील योग्य वर्गातील जि.प.नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील "बि-१" ई-निविदा मांगविण्यात येत आहे.

१) बी-वन दरपत्रक विक्रीचा दिनांक:- १८/१०/२०२५ ला .सां. ६.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.

२) दरपत्रक स्वीकृतीचा अंतिम दिनांक २४/१०/२०२५ सां. ६.०० वा पर्यंत उपलब्ध राहील .

३) दरपत्रक उघडण्याच्या दिनांक:-२५/१०/२०२५ ला सां. ६.०० वाजता किवा सोईनुसार उघडण्यात येईल.

-स्वा-

सरपंच / उपसरपंच/ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत बिना
पं.स.कामठी . जि.पं.नागपूर

# बापू, आम्हाला माफ कराल ना?

बापू, यदा कदाचित स्वर्गातून तुम्ही पृथ्वीवर आलात, तर आम्हाला सगळ्यांना तुम्ही माफ कराच. कारण तुमचं नाव घेण्याची ज्यांची लायकी नाही, त्यांनी उठावं आणि तुमच्याबद्दल काहीही बोलावं. त्यामुळे आम्हालाच आमची लाज वाटते. मूर्खांच्या सानिध्यात राहणाऱ्यांना मूर्खच म्हटलं जातं, मग गाढवाच्या सानिध्यात राहणाऱ्यांना काय म्हणणार? सरकार मुझसे डरती है, दाऊद इब्राहिम मुझसे डरता है, असा दावा करणारा कुणीतरी विद्वान (?) सरकारच्या आशीर्वादाने काहीही बोलतो आणि सरकार त्याला संरक्षण देते, हेच या जनतेचं दुर्भाग्य समजावे लागेल. मी ह्यएन्काऊंटर होण्याच्या टप्प्यावर होतो, असं म्हणणाऱ्याचा खरोखरच 'एन्काऊंटर' झाला असता, तर आज महात्मा गांधींबद्दल इतके वाईट उद्गार कोणी काढलेच नसते. स्वतःचा डीएनए डाकूंच्या खानदानीतला असताना व त्याची कबुली खुलेआम दिल्यानंतर इतरांचा डीएनए तपासायची या विद्वानाला गरजच काय? महात्मा गांधींची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसे, धर्मवीर आनंद दिघे व एकनाथ शिंदे यांचा डीएनए सारखाच असल्याचा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मान्य आहे का? हे त्यांनी एकदा तरी जाहीर करावे. तसं जर नसेल तर कायद्याचं अगाध ज्ञान (?) असलेल्या गुणरत्न सदावर्ते नामक वैचारिक कफल्लकाला सरकार म्हणून शिंदे काय सजा देणार? कुणाची तुलना कुणाबरोबर करावी याची जर अक्कल नसेल तर सरकारने देखील अशा वैचारिक देवळाखोरांना का सांभाळावे? जो माणूस महात्मा गांधींच्या खुन्याला 'पंडित' उपाधी लावून बोलतो, ते भाजपला, संघाला मान्य जरी असले तरी एकनाथ शिंदेंना ते कसे काय मान्य आहे? त्याचा खुलासा त्यांनी केला नाही तर शिंदेंची सेना भाजपमध्ये विलीन करायला काहीही हरकत नाही.स्वर्गवासी आनंद दिघे नथुराम गोडसेला मानत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आनंद दिघे यांना मानतात. याचाच अर्थ या तिघांचाही डीएनए सारखाच आहे, असा दावा गुणरत्न सदावर्ते करतात. पण हा दावा शिंदेंनी अद्यापही खोडलेला नाही. नथुराम गोडसेंना मानणाऱ्या आनंद दिघेंचा आणि एकनाथ शिंदेंचा डीएनए एक असल्याचे सदावर्ते म्हणाले, तरीही कुणीच काहीही प्रतिक्रीया द्यायची नाही? महात्मा गांधींची हत्या करणाऱ्या व्यक्तीला पंडित असं ते कसं म्हणू शकता? पण याबाबत जेव्हा या सदावर्तेंना विचारण्यात येते, त्यावेळी त्यांच्याकडून आलेली उत्तरे डोक्याला हात लावणारीच असतात. दुर्लक्ष करावे तर समाजामध्ये चुकीचा संदेश जातो. त्यामुळे सरकारनेच एकदा या महाशयांचा योग्य तो 'बंदोबस्त' केला तर बरे होईल असे वाटते. अन्यथा अशा लोकांचा बंदोबस्त करणारी यंत्रणा समाजामध्ये असतेच. पण कुणीही कायदा हातात घेऊ नये अशी भूमिका सरकारची असते. एका बाजूला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घ्यायचे व दुसऱ्या बाजूला त्यांच्याच विचारांना तिलांजली द्यायची, असा वकील सरकारी आश्रयाने समाजामध्ये दुही माजवतो. पण सरकार काही करत नाही याचे शल्य जनतेमध्ये मात्र पोहोचले आहे.





थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

गुणरत्न सदावर्ते हे महाराष्ट्रातील विधिज्ञ आहेत. महाराष्ट्र शासनाने २०१८ साली मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातंर्गत आरक्षण दिले होते.

मात्र मराठ्यांना दिलेले आरक्षण हे असंवैधानिक असल्याची याचिका त्यांनी सर्वोच्च न्यायालयात यशस्वीपणे लढवली. तेव्हापासून ते प्रकाश झोतात आले. अर्थात ही सर्व कामे त्यांच्याकडून करून घेतली जातात, त्याबद्दल सर्व माहिती मराठा आंदोलकांकडे आहे. सदावर्ते यांना पुढे करून अनेकांची बदनामीची मोहीम देखील सुरू झाली आहे.

परंतु ताळतंत्र नसलेल्या सदावर्तेंकडून एक दिवस महाराष्ट्रात उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही असे बोलले जाते. भारतीय राज्यघटनेवर पीएच.डी केलेले सदावर्ते ज्या पद्धतीने वर्तन करतात, त्यावरून त्या पीएच.डी बद्दली चर्चा सुरू झाली आहे. मराठवाड्यातील रमेश पाटील नावाच्या एका कार्यकर्त्याने सदावर्तेंना त्यांच्या भाषेत दिलेली उत्तरे समाज माध्यमांमध्ये सतत पसरत असतात. त्यावेळी जो काही संवाद आहे तो ऐकल्यावर सदावर्तेंचे 'स्टॅंडर्ड' लक्षात येते.

महात्मा गांधी बद्दल सतत गरळ ओकणाऱ्या सदावर्तेंकडून नथुराम गोडसे याचे सतत कौतुक केले जाते. त्यामुळे एका विशिष्ट वर्गाचे ते लाडके बनले गेले आहे. परंतु त्यांच्या संगतीत असणाऱ्यांवर कधीही बुमरँग होऊ शकते असे त्यांचे वर्तन असते.

मुंबई एसटी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत काही दिवसांपूर्वी झालेल्या गोंधळानंतर वकिल गुणरत्न सदावर्ते वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. सदावर्ते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटातील कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या वादाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता सदावर्ते यांनी महात्मा गांधी, नथूराम गोडसे, एकनाथ शिंदे व आनंद दिघे यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले आहे.

सतत प्रसिद्धीच्या प्रकाश झोतात राहण्यासाठी ते नेहमी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना बोलावतात व नको त्या स्टाईलने बिभत्स आरडाओरड करतात. त्यांच्या पत्नी देखील त्यांना समर्थन करतानाचे विनोदी चित्र संपूर्ण महाराष्ट्र पाहत असतो. अनेकांना हसू फुटते. परंतु बोलण्याच्या ओघात सदावर्ते कोणत्याही दिशेला जातात. पण सदावर्तेंचे उद्योग फार काळ चालू शकणार नाही. एक ना एक दिवस त्याचा महाराष्ट्रात उद्रेक होईल, त्याचवेळी कदाचित सरकारला जाग येईल असे वाटते!

### गांधीजींची हत्या नेमकी का झाली?

महात्मा गांधी यांची हत्या अत्यंत क्लेशदायक असली तरी भारताबरोबर जगालाही त्यावेळी धक्का बसला होता. कारण संपूर्ण जगाच्या पाठीवर मानवतेचा, शांततेचा व अहिंसेचा मंत्र देणारे ते युगपुरुष ठरले होते. पण अविचारामुळे त्यांची हत्या झाली व त्याचे समर्थन दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांकडून सुरु झाले. महात्मा गांधींनी मुख्यतः अहिंसा, सर्वधर्म समभाव, आणि हिंदू-मुस्लीम एकता यांसारख्या धोरणांवर भर दिला होता. त्यांचे काही निर्णय, जसे की पाकिस्तानला आर्थिक मदत देणे किंवा मुस्लिमांसाठी अधिक सहानुभूती दाखवणे, हे काही हिंदू राष्ट्रवाद्यांना योग्य वाटले नाही. त्यांना वाटायचं की गांधींच्या धोरणांमुळे हिंदू समाजावर अन्याय होत आहे. या कारणांमुळे गोडसेने गांधींच्या हत्या केली आणि त्यामुळं काही लोकांना ते कृत्य योग्य वाटलं. महात्मा गांधींच्या धोरणांमध्ये अहिंसा आणि शांती यांना प्रामुख्याने स्थान होते, पण ते त्यांच्या काळातील हिंदू-मुस्लीम तणावांवर आणि भारताच्या विभागणीच्या प्रश्नांवर एकूणच वेगळ्या दृष्टिकोनातून पाहत होते. गोडसे आणि काही इतर राष्ट्रवादी नेते गांधींच्या या धोरणांवर नाराज होते, कारण त्यांना वाटायचं की गांधींनी हिंदू समाजाच्या हितांचा विचार कमी केला आणि मुस्लिमांसाठी जास्त सहानुभूती दाखवली. यामुळे काही लोकांना गोडसेचं कृत्य समजण्यास मदत झाली आणि त्या दृष्टीकोनातून ते कृत्य उचित वाटलं. पण गांधींना समजून घेण्यास अनेक जण कमी पडले. ज्यांना गांधी पूर्णपणे समजले, ते कधीही त्यांच्या हत्येचे समर्थन करणार नाही. येणारा काळ त्याचे उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही.

### सदावर्तेंना गांभीर्याने घेण्याची गरजच नाही

महात्मा गांधींच्या हत्येचे समर्थन नथुराम गोडसे आणि त्यांच्या काही साथीदारांनी केले होते, ज्यांनी गांधींच्या भारत फाळणीदरम्यान मुस्लिमांबद्दल असलेल्या भूमिकेमुळे असंतोष व्यक्त केला होता. हिंदू महासभा या राजकीय पक्षाचा सदस्य असलेल्या गोडसे आणि त्यांच्या साथीदारांनी गांधींच्या हत्येचा कट रचला होता. गांधींच्या हत्येचा निर्णय या सर्वांच्या विचारांवर आधारित होता आणि त्यांनीच हत्येचे समर्थन केले होते. महात्मा गांधींची हत्या ३० जानेवारी १९४८ रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी बिर्ला हाऊस (आता गांधी स्मृती)च्या कंपाऊंडमध्ये झाली. त्यांचा मारेकरी नथुराम विनायक गोडसे, पुणे येथील हिंदू महासभा या राजकीय पक्षाचा सदस्य होता. फाळणी दरम्यान गांधींनी मुस्लिमांना महत्त्व दिले, याबद्दल गोडसे आणि त्यांच्या साथीदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती, जे त्यांच्या हत्येमागील एक प्रमुख कारण मानले जाते. अनेकदा त्यांना मारण्याचे प्रयत्न झाले होते. पण आता महात्मा गांधींची हत्या होऊन इतके वर्ष झाले तरी त्यांच्या मारेकऱ्यांना आदरार्थी संबोधले जाते. भारताचे पंतप्रधान जगभरात प्रवास करतात. परदेशात ज्या ज्या ठिकाणी महात्मा गांधींचा पुतळा असेल, तेथे ते नतमस्तक होतात. पण अलीकडच्या काळात त्यांच्याच विचारांची माणसे गांधीजींची हत्या करणाऱ्यांना देव मानू लागले. त्यामुळे समाजमन अस्वस्थ होत चालले आहे. गुणरत्न सदावर्ते यांना गांभीर्याने घेण्याची गरज नाही. तेवढी त्यांची लायकी पण नाही. पण म्हणतात ना 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो'.

## एक कोटी झाडे लावणाऱ्या हिरोची कहाणी!

(कालच्या अंकावरून पुढे)

--------------------

पाय दुखावला पण हात तर काम करू शकतात ना! म्हणून रामय्याने घरात रोपं लावायचं काम चालू ठेवलं. त्याचं काम अजिबात थांबलं नाही.

एका व्यक्तीने आपल्या मुलाच्या लग्नाच्या निमित्ताने रामय्यांच्या कामासाठी मदत म्हणून ५००० रुपये देणगी स्वरूपात दिले. तर तेही रामय्याने वृक्ष लागवडीच्या कामात खर्च केले.



उत्तरार्ध

नसा-नसात निसर्ग प्रेम भरलेल्या ह्या रामय्याला लोकांनी सल्ले दिले की, तू लावलेली झाडे तू विकून पैसे मिळव तुला भरपूर पैसे मिळतील. तर रामय्या म्हणाले, या काळ्या आईच्या पोटातून जन्मणाऱ्या झाडांना मी विकण्यासाठी नाही लावलं.

या झाडांमुळे आपल्या सगळ्यांनाच फायदा होणार आहे. शुद्ध हवा, भरपूर पाऊस आणि पर्यावरणाचा समतोल राखला जाईल, म्हणून मी ही झाडं लावलीत.रामय्यांचे म्हणणे आहे की, निसर्ग आपण न मागता आपल्याला उपयोगी पडणाऱ्या सगळ्या झाडांची निर्मिती करतो. आपल्याला चांगली फळे फुले देतो. तर मग आपले कर्तव्य आहे की आपण निसर्गाचे रक्षण केलेच पाहिजे.

पुढे ते असेही म्हणतात की,तुम्ही तुमच्या मुलांना फक्त फळे खायला देऊ नका. त्यांना त्या झाडाचे रोप आणून द्या आणि लावायला सांगा. त्याची निगा राखायला शिकवा. म्हणजे मुले मोठी झाल्यानंतर त्यांना त्याच झाडाची गोड फळे चाखता येतील. त्यातला आनंद काही वेगळाच असेल.

आज जी लहान मुलं आहेत तीच उद्याचे नागरिक होणार आहेत. मग लहानपणीच त्यांना निसर्गाचे ज्ञान द्या म्हणजे मोठेपणी त्यांना आनंद मिळेल. निसर्गाबद्दल प्रेम वाटेल.

ते म्हणाले होते, मी सरकारलाच सांगणार आहे की तुम्ही सरकारी जमिनीत रक्तचंदनाची झाडे लावून ती मोठी झाल्यावर सरकारतर्फेच लिलावाच्या पद्धतीने विका. म्हणजे तुम्हाला भरपूर पैसे मिळतील.

ही रामय्यांची सूचना सरकारने मान्य देखील केली. रामय्याची आपल्या कामावर निष्ठा आहे. त्यांनी केलेल्या कामाचे फळ आता सगळीकडून त्यांना मिळायला लागले आहे. लोक आता त्यांच्या कामाची वाहवा करायला लागले आहेत. त्यांना आपोआपच नावलौकिक मिळायला लागला आहे.

काही राज्यस्तरीय सरकारी पुरस्कारांसोबत त्यांना २०१७ साली भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार ही मिळाला आहे.प्रसिद्धीची आस नसलेल्या, धनाची लालसा नसलेल्या, पण निसर्गाची समृद्धी सतत वाढत राहो या उत्कट इच्छेने काम करणाऱ्या या अवलीयाला शतशः प्रणाम..!

■ ■ ■

## दीपोत्सव स्नेहपूर्ण आनंदाचा !

आधुनिक जीवनशैली मुळे व्यस्त झालेली माणसं ही स्वतःच्या संस्कृतीला पर्यायी मार्ग शोधीत सण उत्सव साजरा करताना पूर्वजांनी लावलेली परंपरा यामागचा शास्त्रीय दृष्टिकोन तसेच महत्त्व विसरून सण साजरा करतांना ट्रेंड प्रमाणे बदलत उत्सव साजरा करतो.

ही भारतीय संस्कृती विसरून पाश्चात्य विचारांचे अनुकरण करणे कितपत योग्य आहे? हा प्रत्येकाचा प्रश्न जरी असला तरी दिवाळी सारख्या प्रकाशमय पर्वाबर एकजूट होऊन त्यातून आनंदाची देवाणघेवाण, एकोपा, सहयोग, प्रेम, वैचारिक फराळ दिवाळी अंकाचं, भेटीघाटीचा उत्साह, सुट्टीचा आनंद, भावंडात असणार प्रेम,खरेदीचा आनंद, ही जगण्याची मज्जा भारतीय संस्कृती आपणास देते.

दिवाळी म्हटलं की आनंद ,उत्साह, ऊर्जा, उमेद, अन दीपोत्सव सर्वत्र आनंद खाण्याची चंगळ , नवीन कपडे खरेदी, व बरच काही ...ज्या सणाची आपण वर्षभर वाट पाहतो, काहीही नवीन योजल किंवा घ्यायचं असेल वर्षभर तरी... आपण दिवाळीतघेऊ म्हणून ती वेळ हाणून नेतो ...थोडक्यांत आपल्या इच्छा पूर्ण करणारा सण म्हणजे दिवाळी....

पूर्वी दिवाळी ची वाट पाहणारी आपण सर्व नियोजन करून दिवाळी साजरी करण्यासाठी वेळ, परिश्रम, यांचा वाटा असायचा. दिवाळीपूर्वी घरातील साफसफाई करतांना अडगळीत पडलेल्या वस्तू आठवणी सांगून व्यवस्थित ठेवत असत. तेव्हा कमी मिळकतीत सर्वांच्या गरजा पूर्ण करून उरलेल्या पैशाची जी बचत व्हायची ती साठवून वर्षांतील दिवाळी व्हायची. मोजक्या पैशात घराची साफसफाई, रंगरंगोटी, कपडे, वस्तू, किराणा सजावटीचे सामान खरेदीची लगबग व्हायची.

कमी पैसा कमी गरजा व काटकसर नियोजनातून मिळालेली प्रत्येक वस्तु आनंद देणारी होती. आज पैसा आहे पण त्या काटकसर दिवाळीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही, खर्चाचा खरा हिशोब ठेवणारी ती रुपयांची किंमत ह्या ऑनलाईन जमान्यात हेत नाही.



खिशात दमडी असल्याशिवाय काही घेण्याची हिम्मत नव्हती. आपण जाणीवपूर्वक रांगोळी पासून तर तोरण, दिवे, झाडू पर्यन्त प्रत्येक गोष्ट ही ऑनलाईन खरेदीतून विकतघेतो आपल्या आसपास ची काही मंडळी छोट्या छोट्या , घरगुती वापरातील गोष्टी फुटपाथ वर विक्रीसाठी बसून सकाळ पासून तर सायंकाळ पर्यंत दोन पैसे कमवून दोन वेळचे पोट भरण्यासाठी धडपड करीत असतात त्यांना काही श्रीमंत होण्याची ओढ नसते फक्त मिळालेली मिळकत व धडपड ही जगण्याचा उद्देश असते



उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्ण विहार, नागपूर
9518571138
ikhe.soil@gmail.com

आता ह्या धावपळीच्या जीवनात वेळेअभावी घरातील साफसफाई ही कामवाली बाई पासून सुरू होऊनकर्त्या घराची मालकीण ऑनलाइन शॉपिंगच्या प्लॅटफर्मवर खरेदी साठी आपला नसणारा वेळ ह्या मोबाईलवर घालवून ऑफरच्या विळख्यात फसलेली असते.

घरात पूर्वी दिवाळी साठी खास घरगुती उटणे तयार करणारी मंडळी आता ऑनलाईन बाजार खरेदी करून घेतात कपडे दिवे, किराणा, सजावट साहित्य, फराळ हे सर्व ऑनलाईन खरेदी करणारे आपण सर्व कधी काळी प्रत्येकाच्या आवडी निवडीप्रमाणे चव जपणारे घरगुती पदार्थ तयार करून प्रेमाने एकमेकांच्या घरी देवाणघेवाण करून आनंदाचा फराळ वर्षभराच्या स्नेहासाठी पुरेसा असतो तोही आता बाजारातील मिठाईच्या बॉक्स ने दुरावला आहे

दिवाळीचा आनंद व्यक्त करताना परिभाषा ही बदलल्या पूर्वी मातीची पणती व त्यांची झगमगाट ही मोहून टाकायची एक पणती जी कुंभाराच्या तालमीत घडलेली व प्रत्येकाच्या आयुष्यात तेजोमय करणारी ती पणती तिमिरातुनी तेजाकडे नेणारी आज कृत्रिम, मेणाच्या, शोभेच्या, चायनिज वस्तूमुळे दबली आहे सर्वत्र झगमगाट फक्त चायनीज लायटिंग व कृत्रिम दिव्यांचाच असतो. तसेच तोरण व फुलेही कृत्रिम, रांगोळी ही स्टिकरचीच, फटाक्यांची आतिषबाजी ही निव्वळ देखाव्याचा भाग. श्रीमंतीचें प्रदर्शन करणारे मात्र झेंडूची फुले, तोरण, रांगोळी, पणत्या, लाह्या बत्ताशे, झाडू , आकाशदिवे घेतांना फुटपाथवर भाव करून वस्तु कवडीमोल मिळाव्यात यासाठी बोली लावतात. हीच का ती श्रीमंती....! ऑनलाईन घरेदी करतांना कुठल्याही मर्यादा न पाळता वस्तु विकत घेऊन स्थनिक विक्रेते छोटे दुकानदार यांना डावलून आपला उद्देश सार्थ जरी करित असलो तरी सामाजिक विषमता निर्माण होत आहे.

दिवाळी प्रकाशपर्व साजरे करताना वर्षभरात जोडलेली माणसं मग रोजचा भाजीवाला पासून तर कचरेवाला पर्यंत, दुकानदार, सहकारी, मित्र, नातेवाईक यांच्य पर्यंत स्नेह वाढविणारा आनंदाचे , प्रेमाचे, सहयोगाचे नाते जोळसणारा खरा आनंद उत्सव आहे.

**दिवाळी साजरा करणारा संकल्प :-**

घरगुती सजावट साहित्य हे फुटपाथवर बसणाऱ्या छोट्या विक्रेत्याकडून घ्यावीत .

आनंदाचा दीप तळागाळातील गरजू लोकांसोबत लावून त्यांना प्रेमाचा सहवास, फराळ, गरजेच्या वस्तु देऊन साजरा करूया.

एक दिवा हा आपल्या अवतीभवती असणाऱ्या अनाथ अपंग, आश्रमात, वृद्धाश्रम येथे भेट देऊन मदतीचा नंदादीप लावून उजळूया.

फटाके फोडण्यापेक्षा त्या पैशाचे गरजु लोकांना मदत करून आनंद प्रकाशित करा.

फराळ विकत घेतांना गृहू उद्योग यांच्या कडून घ्यावा म्हणजे बचतगट, यांचे सक्षमीकरण होईल व जगण्याची उमेद निर्माण होईल इथे ऑफरचा खेळ नसला तरी पैसे कमविण्यासाठी आपण त्यांना ऑफर देऊ शकू.

जुनी कपडे ,साहित्य, पुस्तके हे रद्दीत विकल्या पेक्षा गरजू होतकरू, लोकांना मोफत द्या.

मातीचे दिवे, कागदी आकाश कंदील हे सर्व स्थानिक बाजारातील लहान विक्रेते यांच्या कडून घेतांना अपंग व्यक्तीच्या कडून खरेदीला प्राधान्य द्या खरेदी मॉल शॉपिंग प्लॅटफॉर्म वरून करण्या ऐवजी विविध दुकानातून माल घेऊन त्यांच्या हातांना काम द्यावे.

लख्ख प्रकाश करतांना एक तरी दिवा अंधकार असणाऱ्या जागेवर लाऊन आशेचा किरण प्रज्वलित करा.

सफाई कर्मी, घरातील कामवाली ,गार्ड यांनाही आपल्या आनंदात सामाहून घ्या त्यांना या निमित्ताने यथाशक्ती भेटवस्तू, मदत, सन्मान देऊन आनंद द्विगुणीत करा.

व्यर्थ खचार्चा उधळपट्टी न करता ती पुंजी भविष्यातील नियोजनासाठी ठेवा .

विविध दुकानातून वस्थु खरेदी करताना भाव न करता फुटपाथवर बसणारी मंडळींच्या आनंदाचे भागीदार व्हा.

दोन शब्द प्रेमाचे अन आपुलकीचे देणे हेही प्रकाशमय पवार्ची नांदीच आहे.

दिपपर्व साजरा करताना कुणाला न दुखवता, प्रत्येकाला आपल्या आनंदात सामील करा म्हणजेच खरा स्नेहपूर्ण दीपोत्सव! शुभ दीपावली!

■ ■ ■

वाचक लिहितात

## : भाऊबीज : काळानुसार दिलेली ओवाळणी

कार्तिक शुक्ल द्वितीयेला भाऊबीज साजरी केली जाते. भाऊबहिणीच्या प्रेमळ, निर्मळ नात्याचे प्रतीक म्हणजे भाऊबीज!

या दिवशी मृत्यूची देवता यम आपल्या बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला; म्हणून या दिवसाला यमद्वितीया असेही म्हटले जाते. या दिवशी बहीण भावाला ओवाळते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. भाऊ, बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो. तसेच ओवाळणी म्हणून भेटवस्तू, कपडे, अलंकार देतो.

सहजच मनात विचार येतो की, अशा भेटवस्तूंसोबतच जर भावाने बहिणीला आजच्या काळानुसार आवश्यक असणारी ओवाळणी दिली, तर नक्कीच तिला त्याचा खरा लाभ होईल. कारण आजची स्थिती पाहता कोणतीही स्त्री सुरक्षित नाही. दररोज कुठे ना कुठे स्त्रियांवर बलात्कार, अत्याचार, एकतर्फी प्रेमातून होणारी हत्या अशा घटना घडतच आहेत.

अशा परिस्थितीत भावाचे कर्तव्य आहे की त्याने बहिणीचे रक्षण करावे. तसेच स्वतःचे रक्षण करण्यासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे, याचे महत्त्व बहिणीला पटवून द्यावे. आज हिंदू तरुणींवरील अजून एक संकट म्हणजे लव्ह जिहाद! लव्ह जिहादच्या जाळ्यात न अडकण्यासाठी धर्मशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर लव्ह जिहादविरुद्ध कायदा बनवावा याकरिता महाराष्ट्रात नवरात्रोत्सवाच्या काळात हिंदू जनजागृती समितीने स्वाक्षरी अभियान चालवले. हा अतिशय स्तुत्य उपक्रम होता, ज्याद्वारे व्यापक प्रमाणात समाजात जागृती निर्माण झाली. भाऊबीजेच्या निमित्ताने बहिणीला स्वसंरक्षणार्थ सिद्ध होण्यासाठी प्रोत्साहित व प्रशिक्षित करणे, हीच खऱ्या अर्थाने काळानुसार दिलेली ओवाळणी ठरेल!

■ ॲड. सौ. वैशाली परांजपे, नागपूर.

### लक्ष्मीपूजनाचे महत्व

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी वर्षभरातील जमाखचार्चा हिशेब केला जातो. वर्षभरातील हा जमाखर्चाचा हिशोब लक्ष्मीसमोर ठेवायचा असतो. आपल्या वर्षभरातील जमाखर्चाचा लक्ष्मीसमोर ठेवून प्रार्थना करायची असते की, हे माते तुझ्या कृपेने आणि आशीवार्दाने मिळालेल्या या धनाचा उपयोग आमच्याकडून सत्कायार्साठी आणि ईश्वरीकायार्साठी होऊ देत. आम्ही जो हिशेब तुज्यासमोर ठेवत आहोत त्याला तुझी संमती असू देत. आम्ही तुज्यापासून काहीही लपवून ठेवू शकत नाही. आम्ही जर तुझा योग्य वापर केला नाही तर तू आमच्या जवळून निघून जाशील. याची जाणीव सतत आम्हाला राहू देत. लक्ष्मीदेवीला अशा प्रकारची प्रार्थना केल्यामुळे आपल्यामधील कर्तेपणाची भावना नष्ट होते आपल्याकडे असलेल्या धनामुळे आपल्याला त्याचा उन्मद किंवा गर्व न होता आपल्यामध्ये विनयशीलता येते.

■ शंकर पवार, सातारा.

## स्वयंपाक करताना कोणते तेल वापरणे आरोग्यासाठी चांगले?



सणासुदीच्या काळात, किंवा रोजचा स्वयंपाक बनवण्यासाठी देखील एक गोष्ट आहे ज्याशिवाय जेवण तयार होऊ शकत नाही. ते म्हणजे तेल. भाजी बनवण्यासाठी, काही तळण्यासाठी तेल हे लागतेच.

बहुतेक घरांमध्ये स्वयंपाकासाठी मोहरीचे तेल किंवा रिफाइंड डालडा तेल वापरले जाते. तथापि, हे आरोग्यासाठी खूप हानिकारक मानले जाते. मग आरोग्यासाठी चांगले असणारे स्वयंपाकाचे तेल कोणते जे कोणताही विपरीत परिणाम करत नाही. या तेलांमध्ये बनवलेले अन्न खाल्ल्याने तुमचे हृदय आणि मनही निरोगी राहील आणि वजन वाढण्यासही प्रतिबंध होईल. स्वयंपाकासाठी कोणते तेल वापरले पाहिजेत हे जाणून घेऊयात.

प्रसिद्ध गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टांच्या म्हणण्यानुसार तुम्ही योग्य स्वयंपाक तेल निवडले तर तुमच्या आरोग्याचे कधीही नुकसान होणार नाही. खरं तर, ते तुमचे आरोग्य सुधारेल आणि तुम्हाला तंदुरुस्त ठेवेल.

**नारळाचे तेल** : आपण वर्षानुवर्षे नारळाचे तेल वापरत आहोत, पण तुम्ही कधी ते स्वयंपाकासाठी वापरले आहे का? या तेलात बनवलेले अन्न लवकर खराब होत नाही किंवा जळत नाही. ते कमी तेलकट देखील मानले जाते. नारळाचे तेल शरीराला ऊर्जा प्रदान करते.

**शेंगदाणा तेल** : स्वयंपाकासाठी शेंगदाण्याचे तेल देखील वापरू शकता. शेंगदाण्याच्या तेलात आरोग्यासाठी उपयुक्त असे अनेक पोषक घटक असतात. शिवाय, त्यात शिजवलेले अन्न खराब होत नाही.

**तूप** : शतकानुशतके भारतीय स्वयंपाकघरांमध्ये तूप वापरले जात आहे. तथापि, तूप महाग आहे, म्हणून लोक बहुतेकदा तेल किंवा रिफाइंड तेलाचा वापर करतात. तुम्ही तूप वापरून देखील स्वयंपाक करू शकता. पण नक्कीच प्रमाणातच वापर करा.

**एवोकॅडो तेल** : ॲव्होकॅडो तेल हे देखील सर्वोत्तम तेल मानले जाते. ॲव्होकॅडो तेलाला सुगंध असतो आणि त्यात तयार केलेले पदार्थ चांगले टिकतात .तसेच त्यात तळलेले पदार्थ खाल्ल्याने त्रास होत नाही

दरम्यान या तेलापैकी कोणतेही तेल वापरत असाल तरी ते प्रमाणातच वापर करा. कारण कोणतीही गोष्ट अतिप्रमाणात खाणे हानिकारकच असते. त्यामुळे प्रमाणात वापर केल्यास त्याचे आरोग्याला फायदे नक्की मिळतात.

■ ■ ■

अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## दीपोत्सव...!

मानवतेप्रती हृदयात
व्हावी संवेदनांची निर्मिती
तर भुतलावर नांदेल
भौ सुख समृद्धी शांती..

अज्ञानच तर आहे
मानवी समस्यांचे मुळ
दिपोत्सवाने व्हावा
त्याचा विनाश समुळ ...

अडल्या नडलेल्याच्या
जो येतो कामी
त्यावर कृपा करते
माता महालक्ष्मी ..

# दिवाळी पुराण आणि इतिहास

दिवाळी संदर्भात असलेल्या गमतीदार माहितीने पुराणात तसेच इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच हा सण एखाद्या विशिष्ट समूहाचा न राहता संपूर्ण राष्ट्राचा बनला आहे. दिवाळीविषयी काही रंगतदार व गमतीदार माहिती खालीलप्रमाणे:-

- प्रभू राम रावणाचा पराभव केल्यानंतर अयोध्येला परतत असताना त्यांच्या वाटेवर लोकांनी दिवे लावून स्वागत केल्याचे त्रेतायुगात सांगितले आहे.
- श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध केल्यानंतर गोकुळवासियांनी आपला आनंद दिवे लावून व्यक्त केल्याची कथा प्रचलित आहे.
- देवीने महाकालीचे रूप धारण करून राक्षसांचा वध केला होता. त्याचा वध केल्यानंतरही महाकालीचा क्रोध कमी झाला नव्हता, तेव्हा भगवान शंकराने स्वतः देवीच्या चरणी लोटांगण घातले. शंकराच्या शरीर स्पर्शाने महाकालीचा क्रोध शांत झाला. त्याची आठवण म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाते. या दिवशी तिच्या रौद्ररूपाची पूजा करण्याची प्रथा आहे.
- बळीराजाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर त्रैलोक्यावर विजय मिळविला होता. या विजयाने भयभीत झालेल्या देवांनी भगवान विष्णूंची प्रार्थना केली. त्यांची प्रार्थना ऐकून विष्णूने वामन रूप धारण करून बळी राजाला तीन पायांत दान मागितले. विष्णूने तीन पायाने त्रैलोक्य घेतले. बळीच्या दानशूरपणामुळे प्रसन्न झालेल्या विष्णूने त्याला पाताळाचे राज्य देवून भू-लोकवासी त्याच्या आठवणीनिमित्त प्रत्येक वर्षी दिवाळी साजरी करतील असे आश्वासन दिले.
- शिखांचे सहावे गुरू हरगोविंदसिंग बादशाह जहांगीरच्या कैदेतून सुटून कार्तिक अमावस्येच्या दिवशी अमृतसरला आले होते.
- दिवाळीच्या एक दिवस अगोदर म्हणजे चतुर्थीला श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला होता. यामुळे आनंदी झालेल्या गोकुळवासियांनी दुसऱ्या दिवशी अमावस्येला दिवे लावून आनंद साजरा केला होता.
- इसवी सन पूर्व ५०० वर्षांपूर्वी मोहेंजोदडो येथे सापडलेल्या अवशेषांमध्ये एका मातीच्या मूर्तीनुसार त्याकाळी दिवाळी साजरी केली जात असल्याचे समजते. मूर्तीच्या दोन्ही बाजूला दिवे जळताना दिसून येत होते.
- इसवी सन पूर्व २५०० वर्षांपूर्वी गौतम बुद्धांच्या अनुयायांनी त्यांच्या स्वागतासाठी लाखो दिवे लावून दिवाळी साजरी केली होती.
- सम्राट विक्रमादित्याचा राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्याच दिवशी दिवे लावून जनतेने आनंद साजरा केला होता.
- इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील कौटिल्य अर्थशास्त्रानुसार कार्तिक अमावस्येच्या दिवशी मंदिरात आणि घाटावर (नदी किनारी) मोठ्या प्रमाणात दिवे लावले जात असल्याचे सांगितले आहे.
- अमृतसर येथील सुवर्णमंदिराचे बांधकाम दिवाळीच्या दिवशी सुरू झाले होते.
- जैन धर्माचे चोविसावे तीर्थकर भगवान महावीर यांनी दिवाळीच्या दिवशीच बिहारमधील पावापुरी येथे आपल्या शरीराचा त्याग केला होता. 'महावीर संवत' त्यांच्या दुसऱ्या दिवशी सुरू होते. त्यामुळे अनेक प्रांतातील लोक याला नवीन वर्षाची सुरवात मानतात. प्राचीन जैन ग्रंथात दीपोत्सवाचे वर्णन आहे. महावीर निर्वाणामुळे जी अंर्तज्योती कायमची विझून गेली होती, तिची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण बर्हिज्योतीचे प्रतीक म्हणून दिवे लावू या असे कल्पसूत्रात सांगितले आहे.

१३. पंजाबमध्ये जन्मलेल्या स्वामी रामतीर्थ आणि महाप्रयाण या दोघांचा जन्म दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्यांनी दिवाळीच्या दिवशी गंगाकिनारी स्नान करताना 'ओम' म्हणून समाधी घेतली होती.



# प्रकाशोत्सव दीपावली

दीपोत्सव म्हणजे आनंद, उत्साहाने साजरा करण्यात येणारा प्रकाशाचा उत्सव होय. दीपोत्सव हा केवळ उत्सव नसून उत्सवाचे स्नेहमीलन आहे. दिवाळी, नरकचतुर्थी, धनत्रयोदशी, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज या पाच सांस्कृतिक विचारधारा असलेल्या सणांचा उत्सव आहे.

धनत्रयोदशी म्हणजे लक्ष्मी पूजन! भारतीय संस्कृतीत लक्ष्मीला महत्त्वाचे स्थान आहे. 'सुईला छेदल्यास तिच्यातून उंट निघतो. परंतु, धनवंताला स्वर्ग मिळत नाही. या ख्रिश्चन धर्मातील म्हणीला भारतीय सहमत नाहीत. त्यांच्या दृष्टीकोनातुन श्रीमंत लोकच देवाचे लाडके असतात.

लक्ष्मी चंचल नाही तर मनुष्याची वृत्ती चंचल आहे. पैसा या शक्तीच्या आधारे मनुष्य देव किंवा राक्षस बनू शकतो. लक्ष्मी केवळ उपभोगाचे साधन आहे असे मानणाऱ्या मनुष्याचे लवकरच अधःपतन होते. परंतु, तिची पूजा करून तिला परमेश्वरी प्रसाद मानणारा मनुष्य स्वत: पवित्र आणि सृष्टीलाही पवित्र बनवितो. वाममार्गाने वापरलेल्या लक्ष्मीची अलक्ष्मी होते. स्वार्थ आणि परमार्थासाठी वापरलेल्या लक्ष्मीला वित्त आणि धनलक्ष्मी असे म्हणतात. देवकार्यासाठी वापरलेली लक्ष्मी महालक्ष्मी असते.

महालक्ष्मी हत्तीवर बसून सजून येते. हत्ती औदार्याचे प्रतीक आहे. सांस्कृतिक कार्यात उदारपणे लक्ष्मीचा वापर करणाऱ्यांजवळ पिढ्यान-पिढ्या ती राहते. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रघुवंश होय. ती एक महान शक्ती असल्यामुळे नेहमी चांगल्या लोकांच्या हातात राहिली पाहिजे. कारण तिचा चांगला उपयोग होऊ शकतो.

नरक चतुर्थीला महाकालीची पूजा केली जाते. स्वतःच्या स्वार्थासाठी शक्ती खर्च करणारा दुर्योधन, दुसऱ्याच्या चरणी शक्ती ठेवणारा कर्ण आणि देवकार्यात शक्तीचे हवन करणारा अर्जुन या महाभारतातील तीन पात्रांना महर्षी व्यासांनी उत्कृष्टपणे आपल्यासमोर मांडले आहे. नरकचतुर्थीला कालचतुर्थी असेही म्हणतात. त्यामागे अशी कथा आहे की, नरकासूर नावाच्या राक्षसाने पृथ्वीवर अत्याचाराचे थैमान मांडले होते. त्याच्या अत्याचारापासून स्त्रियांचीदेखील सुटका झाली नव्हती. त्याने सोळा हजार स्त्रियांना बंदी करून ठेवले होते. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने त्याचा वध करण्याचा विचार केला. श्रीकृष्णाच्या मदतीने सत्यभामेने नरकासूराचा वध करून स्त्रियांचा उद्धार केला. अमावस्येच्या त्या रात्री सर्व लोकांनी दिवे लावून आनंदोत्सव साजरा केला होता.



दिवाळी म्हणजे वैश्यांच्या (व्यापाऱ्यांच्या) हिशोब-वही पूजेचा दिवस! संपूर्ण वर्षाचे लेखा परिक्षण करण्याचा दिवस होय. या दिवशी मनुष्यानेही त्याच्या जीवनाचा लेखा-जोखा तयार केला पाहिजे. राग, द्वेष, मत्सर यांना दूर करून नवीन वर्षाच्या दिवशी प्रेम, श्रद्धा आणि उत्साह वाढविण्याचा प्रयत्न करावा.

**बलिप्रतिपदा (पाडवा):**

नवीन वर्षाला बलिप्रतिपदा असेही म्हटले जाते. वैदिक विचारांची उपेक्षा करून वर्णाश्रम व्यवस्थेला उध्वस्त करणाऱ्या बळीचा विष्णूने पराभव केला होता. म्हणून त्याच्या स्मरणार्थ बलिप्रतिपदा साजरी केली जाते. बळी दानशूर राजा होता. या दिवशी त्याच्या आठवणींना उजाळा दिला जातो.

दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीकडे पूज्य दृष्टीने पहावे. भाऊबीजेच्या दिवशी समस्त स्त्रियांकडे आई किंवा बहिणीच्या नजरेने पाहिले पाहिजे. स्त्री ही आदरणीय आहे. मोह म्हणजे अंधकार! दीपोत्सव म्हणजे अज्ञान आणि मोहाच्या खोल अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे प्रयाण करणे होय. दिवाळीला दिवे बाहेर जळतात. परंतु आपल्या मनात योग्य दीप प्रकट झाला पाहिजे. मनात अंधकार असल्यास बाहेर जळणारे दिवे निरर्थक ठरू शकतात. दीपक ज्ञानाचा प्रतीक आहे.

# धनत्रयोदशी आणि धन्वंतरि जयंतीचे महत्त्व

आश्विन वद्य त्रयोदशी या तिथीला धनत्रयोदशी (धनतेरस) हा सण साजरा केला जातो. दीपावलीला जोडून येणाऱ्या या सणाच्या निमित्ताने नवीन सुर्वणालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. व्यापारीवर्ग आपल्या तिजोरीचे पूजनही याच दिवशी करतात. धनत्रयोदशी म्हणजेच देवतांचा वैद्य धन्वंतरी देवता' यांची जयंती. या दिनाचे माहात्म्य या लेखातून जाणून घेऊया.

भावार्थ : ज्यामुळे आपल्या जीवनाचे पोषण सुरळीत चालू आहे, त्या धनाची या दिवशी पूजन करतात. येथे धन म्हणजे शुद्ध लक्ष्मी. श्रीसूक्तात वसू, जल, वायू, अग्नी आणि सूर्य यांना धनच म्हटले आहे. ज्या धनाला खरा अर्थ आहे, तीच खरी लक्ष्मी ! अन्यथा अलक्ष्मीमुळे अनर्थ घडतो.

वैशिष्ट्ये : हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो; कारण धनप्राप्तीसाठी श्री लक्ष्मीदेवीचे पूजन केले जाते. या दिवशी ब्रह्मांडात श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व प्रक्षेपित होत असते. त्यामुळे जिवाला श्री लक्ष्मीदेवी आणि नारायण यांची कृपा संपादन करता येते. ती कृपा जिवाच्या भावावर टिकून राहाते. आताच्या काळात साधकांना शक्तीची आवश्यकता आहे, तसेच व्यावहारिक सुखापेक्षा जगणे आणि आयुष्य टिकवणे महत्वाचे आहे. त्यामुळे साधना करणाऱ्या जिवासाठी हा दिवस महापर्वणी समजला जातो. साधनेसाठी अनुकूलता आणि ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठी या दिवशी धनलक्ष्मीची पूजा करतात. वर्षभर योग्य मार्गाने धन कमवून वार्षिक उत्पन्नाचा १/६ भाग धर्मकार्यासाठी अर्पण करावा.



महत्त्व : या दिवसाला बोलीभाषेत धनतेरस असे म्हटले जाते. या दिवशी व्यापारी तिजोरीचे पूजन करतात. व्यापारी वर्ष दिवाळी ते दिवाळी असे असते. नव्या वर्षाच्या हिशोबाच्या वह्या या दिवशीच आणून त्यांचे पूजन करून वापरात आणल्या जातात.

धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन सुवर्ण विकत घेण्याचा प्रघात आहे. त्यामुळे वर्षभर घरात धनलक्ष्मी वास करते. वास्तविक लक्ष्मीपूजनाच्या वेळी वर्षभराचा आयव्यय (जमाखर्च) द्यायचा असतो. त्या वेळी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेली संपत्ती प्रभुकार्यासाठी व्यय केल्यास सत्कार्यात धन व्यय झाल्यामुळे धनलक्ष्मी शेवटपर्यंत लक्ष्मीरूपाने रहाते. धन म्हणजे पैसा. हा पैसा घामाचा, कष्टाचा, धवलांकित असलेला आणि वर्षभरात पै-पै करून जमा केलेला असावा. या पैशाचा न्यूनतम १/६ भाग प्रभुकार्यासाठी व्यय करावा, असे शास्त्र सांगते. परात्पर गुरु पांडे महाराज

पूर्वी राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्री दान करून खाली करायचे. तेव्हा त्यांना धन्यता वाटायची. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा आहे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता देत असे. त्यामुळे साहजिकच परत खजिना भरत असे. सत्कार्यासाठी धनाचा विनियोग झाल्यामुळे आत्मबलही वाढत असे.

# जीवनांतील अमुल्य तत्वे...!

सुखी जीवनाची खरी गुरूकिल्ली म्हणजे आयुष्यात अमुल्य तत्वांचा अधिक वापर करणे होय. अतिषय महतवाचा घटक म्हणजे आपली स्वतःची वेळ होय. जीवनात वेळे अभावी सर्व अर्थहिन आहे. आपण स्वतः कोणत्याही तत्वाची कधीही टिंगल करू नये, हा स्वतःचा अनादर होईल. आपल्याला ध्यैयपुर्ण, समाधानी जीवन जगावयाचे असेल तर वेळेचा आदर करणे महत्वाचे आहे हिच जीवनाची सफलता आपल्याला टिकविणे गरजेचे आहे. आपण वेळेचे नियोजन व्यवस्थितरित्या केल्यास कधीही त्रास होणार नाही व कामे वेळेवर झाल्यास दुसरे कार्य होण्यास मार्ग सुकर होईल. हेच समाधानी व्यवस्थितकरण होय. वेळेवर कोणतेही कार्य केल्यास आपल्या स्वतःला वेगळेपण प्राप्त होते. आयुष्यात एकदा वेळ गेली की, कधीही परत येत नसते. अर्थातच जीवन जगतांनी माणसाला वेळेचे भान असणे महत्वाचे नाही काय ?

वेळ : आपण कोणतेही कामे करीत असाल तर आपण स्वतः आठवडयातील, महिन्याची कामे कषी करावयाची हि आखणी महत्वाची आहे. या योजनाबध्द आखणीमुळे आपण स्वतः वेळेचा उपयोग केल्यास स्वतःची कामे त्रास न होता वेळेवर होतातच हे मात्र खरे ! वेळेवर कामे केल्यास जीवनाला योग्य असा आकार, स्वतः चे व्यकितमत्वाचा विकास व्हायला सोयीस्तरपणे वाव मिळतो व आनंद निर्माण होतो हे मानवी जीवनाचे खरे गुपीत होय. खाया अर्थाने पाहू जाता क्षमता ही अफाट जरी असली तरीपण आपण वेळेवर कार्य केल्यास हि क्षमता अधिकच कार्यषील राहील व आपल्याला जीवनात वेगळेपण अनुभवयाला मिळेल. षिवाय, आपण स्वतःच आयुष्याचा मालक बनु शकतो हेच आयुष्याचे अमुल्य घटक आहे असे समजावे.

पैसा : जीवन जगतांना आपण स्वतः कमायीचे साधन पाहुन खर्च करणे महत्वाचे आहे. आपण आयुष्यात कुणाबरोबर स्पर्धा करता कामा नये, असे केल्यास स्वतःला पैसे पुरेनासे होऊन निराषा येत असते. आपण विद्यार्थी दक्षेत असतांना किंवा बाहेरगावी षिकत असतांना येणाया पैषाचे खर्च करण्याचे नियोजन केल्यास पैसा बरोबर पुरेल व परिवार सदस्यांना त्रास न होता षिक्षण पूणत्वाकडे जाण्यास मदत होईल व आनंद मिळेल. पैसा खर्च करतांना कोणत्या कामाला किती पैसे खर्च करावे किंवा कोणते कार्य अगोदर करावे, याचे नियोजन करणे महत्वाचे असते, तेव्हा आपल्या जीवनात यषस्वी होण्यास अधिक मदत होते. आपण नियोजन करतांना भविष्याची दूरदृष्टी ठेवुन योग्य आखणीबध्द पध्दतीने खर्चाचे नियोजन केल्यास आपल्याला स्वतःला पुरेनासे होईल व वेळेवर पैसा असल्यामुळे त्रास होणार नाही हे सामान्यातुन षिकण्यासारखे आहे. पैषाची नियोजनबध्द कामे केल्यास जीवनात अतिउत्तम, समाधान मिळाल्याषिवाय राहणार नाही या व्यतिरिक्त आनंदाची दारे आपल्या स्वतःसाठी नेहमी उघडीच राहील व त्यात समाधानाची ज्योत नेहमीच तेवत राहील. जीवनात स्वतः कष्ट करून कामे केल्यास पैसा आपल्याजवळ अखेरपर्यंत टिकुन राहील. अन्यथा वाम मार्गाने किंवा कुण्या व्यक्तिला त्रास देवुन मिळविलेला पैसा आपल्याजवळ टिकुन राहत नाही हे अनुभवाअंती सिध्द झालेले आहे हे मात्र खरे! पैषाचे नियोजन खाया अर्थाने सोयीस्तररित्या करणे अगत्याचे आहे.

संयम : जीवनात, आपल्या वाईट काळात आपली किंमत कमी करण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो, मात्र संयम राखला तर आपले अस्तित्व कोणीच संपवु, हिरावुन शकत नाही. त्यासाठी आपले संयमाला टिकविणे फार महत्वाचे आहे. कोणतीही गोष्ट करतांना थोडाफार संयम राखल्यास मनासारख्या गोष्टी होण्यास स्वतःलाच मदत होत असते व जीवनात आनंद निर्माण होईल संयम बाळगणे हा आपला मानवी जीवन जगण्याचा सर्वोत्तम भाग असला पाहीजे. जीवनात संयम हा गुण व योजनाबध्द सर्व कामाची आखणी केल्यास स्वतः ला समाधान मिळेल. आपण निरर्थक गोष्टींना फार महत्व न देता किंवा सोयीस्कररित्या तिलांजली दिल्यास व स्वतः नाराज न राहता संयम राखल्यास येणारे दिवस आनंदात राहील. स्वतः आपण कार्यक्षम राहा, काही कामात वेळा पाळणे गरजेचे, कोणतेही कार्य मन राहुन केल्यास यषासाठी संयम राखल्यास नवी उर्जा, नवी चेतना प्राप्त होऊन यष संपादन होईल! संयम हे आपल्या जीवनावर परिणाम साधणारी व आयुष्याला खाया अर्थाने आकार व उर्जा देणारी गोष्ट असुन त्याचा उपयोगाला प्राधान्य देणे आवष्यक आहे. हे तत्वज्ञान जीवन आनंदीत होण्याचे खरे मार्गदर्षक ठरू शकतात. चुक नसतांनाही केवळ वाद टाळावा म्हणुन घेतलेली माघार हे संयमाच फार मोठ प्रतिक आहे.

विश्वास : कौत्युक करणाऱ्या शेकडो व्यतिपेक्षा प्रोत्साहीत करणारी एक व्यक्ती सोबत असावी जी आयुष्यात सर्व नकारात्मकतेला पुरून उरेल पण यासाठी स्वतःवर विष्वास, दुसायावर विष्वास असणे महत्वाचे आहे. जीवनात काही गोष्टी संयम बाळगुन करावयाच्या असेल तर स्वतःवर कायम विष्वास ठेवणे फार गरजेचे आहे. आपल्या विचारामध्ये, स्वप्नामध्ये हरवुन गेलेल्या व्यक्तीच्या गर्दीत एकांकी वाटु नये यासाठी स्वतःवर, इतरावर, कुटुंबातील सदस्यावर व स्वतःच्या व्यक्तीवर विष्वास बाळगणे, ठेवणे आदराणे संयमाने वागणे हेच आनंदमय जीवनाचे खरे गणीत आहे. पण, विष्वास हा माणुसकीला धरून असावा त्यामुळे आयुष्यात गुंतागुंत होत नाही. स्वतःच्या मर्जीने केलेल्या कामावर कार्यावर थोडाफार विष्वास ठेवल्यास स्वतःलाच त्याची यष प्राप्ती झाल्याषिवाय राहणार नाही. आपल्याला वैभवाच्या षिखरावर जात असतांना आपल्या स्वतःच्या व्यक्तीवर खाया अर्थाने विष्वास हा ठेवावाच लागेल. भविष्यात संयम आणि विष्वास एकत्र नांदले तर स्वतःच्या व इतरांच्या आयुष्यात आनंदाची पर्वणी यायला वेळ लागणार नाही हे मात्र तेवढेच खरे! यासाठी आपण ईष्वराचे आभार मानायला हवे कि ज्यांनी हा देह पृथ्वीस्थलावर चांगले करण्यासाठी पाठविला ? माणसाचे वागणे नितळ असलं की, त्याच प्रतिबिंब कुठेही आणि कितीही गर्दी असली तरी उठुनच दिसत. पण, यासाठी विष्वास या गोष्टीवर अपार श्रध्दा बाळगल्यास मन आनंदीत होते. अर्थातच, आनंदी राहण्यासाठी पैषाने कमविलेल्या वस्तुपेक्षा स्वभावाने कमावलेली माणसे जास्त सुख देतात हेच विष्वास ठेवल्याचे खरे यष आहे असे म्हणता येईल.

व्यतिमत्व : चांगले व्यतिमत्व, स्वभाव हा आनंदापेक्षाही मोठा असा आनंद आहे. तो त्यालाच मिळतो ..... ही जो स्वतःला विसरून इतरांना आनंदीत करतो हेच व्यतिमत्व विकासासाठी पायाभरणी करून मन यषाकडे नेऊन आनंदाचे दार नेहमी उघडत असतो. पण शरीर सुंदर असेल किंवा नसेल, मात्र शब्द आणि मन, स्वभाव व्यतिमत्व शुध्द असायला हवे. कारण, माणसाची सवय आहे की, तो चेहरा लवकर विसरतो पण शब्द आणि चांगले मन, व्यतिमत्व कधीच विसरत नाही. हाच चांगुलपणाचा मार्ग जिवनात मनाची बाळगल्यास यषाचे क्षेत्रफळाचा प्रवास करता येईल. व्यक्तिमत्वात नेहमी खरेपणा असणे आवष्यक आहे तोच ध्येयापर्यंत आपल्याला खाया अर्थाने पोहचु शकतो यासाठी व्यतिमत्वाचा विकास, सवय, चारित्र्य, सन्मान, हरवेपण, त्याग, संयम या विविधांगी गोष्टीचा संग्रह ठेवणे अत्यंत गरजेचा आहे तरच चांगला विकास साधुन आपण सर्व विकासाच्या दिषेने जाण्यास सक्षम असु. कारण माणुस कळायला माणुसकी लागते. चांगल जगायला सुंदर विचार लागतात. भरभरूण जगायला पैसा नाही, तर आयुष्य लागत हेच सुखी आणि व्यक्तीमत्व विकास आणि चांगल्या विचाराचे खाया अर्थाने एक प्रकारचे आयुष्याचे समीकरण आहे. पाठीवरचा ओझापेक्षा मनावरचं ओझ नेहमी जड असतं... ते हलकं करायचं म्हटलं की, झेलणारा देखील तितकाच आपलासा असावा लागतो. तरच आनंदी सुखी जीवनाचे चाके समांतररित्या पूढे-पूढे चालत राहणार हाच सुखी जीवनाचा प्रवास म्हणता येईल. जीवनांत सुख दुःखाच्या खडतर वाटेवरून जातांना माणसं मिळवायचे असतात, शत्रु वजा करायचे असतात, सुखानी गुणायचे असते दुःखानी भागायचे असते, त्यामधुन उरते, ती बाकी म्हणजे जीवनाचे, आयुष्याचे खरे समाधान हेच जीवन प्रवासाचे खरे सोबती असतात.

जाता जाता.... आपल्याला यषस्वी जीवनाची वाटचाल करतांना वेळ पैसा, संयम, विष्वास आणि व्यतिमत्व, स्वभाव इत्यादी विविधांगी अमुल्य घटकाकडे जातीने लक्ष देणे महत्वाचे आहे. तरच सुखी जीवनाचे स्वप्न साकार करता येईल. जीवन सुंदर आहे त्याची सुंदरता कायम ठेवण्यासाठी स्वतःचा स्वभावाने, व्यतिमत्वाने अधिक सुंदर करू शकतो यासाठी संयम हळवेपण त्याग, मानसिकता, आदर सन्मान, दुसायाच्या विचाराचे समर्थन, स्वतःच्या व्यतिसोबत चर्चा तसेच आचार विचाराचे मंथन या विविध गोष्टी स्वतः सोबत बाळगल्या की, जीवनातील यष आपलेच आहे, असे समजावे. परिस्थिती प्रमाणे बदलणारी माणसे सांभाळण्यापेक्षा, परिस्थिती बदलविणारी माणसे सांभाळा... आयुष्यात कधीही अपयष अनुभवायला मिळणार नाही तसेच जलद गतीने मिळणारे यष अहंकार निर्माण करतात तर उषिरा मिळणारे यष आपलं व्यतिमत्व तयार करतं. स्वतःसोबत जेव्हा दुसायाच्या मनाचा देखील जेथे विचार केला जातो, तिथेच माणुसकीचं सुंदर नात तयार होतं. हेच सुखी व समृध्द जीवनाचे कोड तसेच अमुल्य घटक आहे, असे म्हणणे रास्त ठरावे!



: शब्दांकन :
**विजय सीताराम सोनारघरे**
२४, उदयनगर, नागपूर
मो.नं. ९३२५७३३८३६

# लक्ष्मीपूजन करण्याची पद्धत आणि महत्त्व

आश्विन अमावास्येच्या, म्हणजेच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्व मंदिरांत, दुकानांत, तसेच घराघरांत श्री लक्ष्मीपूजन केले जाते. आश्विन अमावास्येचा हा दिवस दीपावलीचा एक महत्त्वपूर्ण दिवस मानला जातो. सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; परंतु दीपावलीतील ही अमावस्या शरद पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेप्रमाणेच कल्याणकारी आणि समृद्धिदर्शक आहे. या दिवशी श्री लक्ष्मीपूजनासोबत अलक्ष्मी नि:सारणही केले जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करावयाच्या कृतीमागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.




**१. इतिहास**

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे.

**२. सण साजरा करण्याची पद्धत**

प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन् ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी लतापल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे.

लक्ष्मीपूजन करतांना एका चौरंगावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. काही ठिकाणी कलशावर ताम्हण ठेवून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. लक्ष्मीजवळच कलशावर कुबेराची प्रतिमा ठेवतात. त्यानंतर लक्ष्मी आदी देवतांना लवंग, वेलची आणि साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. मग हातातील चुडीने पितृमार्गदर्शन करतात. ब्राह्मणांना आणि अन्य क्षुधापीडितांना भोजन घालतात. रात्री जागरण करतात.

लक्ष्मीपूजनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले नाही, तर जेवढे उपलब्ध आहे, त्या साहित्यात भावपूर्णरित्या पूजाविधी करावा. बत्तासे आदी साहित्य न मिळाल्यास, देवाला घरातील तूपसाखर, गूळसाखर किंवा एखादा गोड पदार्थ यांचा नेवैद्य दाखवावा.

**लक्ष्मी कुणाकडे वास करते ?**

आश्विन अमावास्येच्या रात्री जागरण करतात. पुराणांत असे सांगितले आहे की, आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जिथे स्वच्छता, शोभा आणि रसिकता आढळते, तिथे तर ती आकर्षित होतेच; शिवाय ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त, तसेच क्षमाशील पुरुष आणि गुणवती अन् पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते.

**३. लक्ष्मीपूजनाच्या दिवसाचे महत्त्व**

सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; पण त्याला अपवाद या अमावास्येचा आहे. हा दिवस शुभ मानला आहे; पण तो सर्व कामांना नाही; म्हणून या दिवसाला शुभ म्हणण्यापेक्षा आनंदी दिवस म्हणणे योग्य !

**४. श्री लक्ष्मीदेवीला करावयाची प्रार्थना**

जमा-खर्चाच्या हिशोबाची वही लक्ष्मीसमोर ठेवायची आणि प्रार्थना करायची, हे लक्ष्मी, तुझ्या आशीर्वादाने मिळालेल्या धनाचा उपयोग आम्ही सत्कार्यासाठी आणि ईश्वरी कार्य म्हणून केला आहे. त्याचा ताळमेळ करून तुझ्यासमोर ठेवला आहे. त्याला तुझी संमती असू दे. तुझ्यापासून मी काही लपवून ठेवू शकत नाही. जर मी तुझा विनियोग योग्य प्रकारे केला नाही, तर तू माझ्या जवळून निघून जाशील, याची मी सतत जाणीव ठेवतो. तेव्हा हे लक्ष्मीदेवी, माझ्या खर्चाला संमती देण्यासाठी भगवंताजवळ तू माझी शिफारस कर; कारण तुझ्या शिफारशीशिवाय तो त्याला मान्यता देणार नाही. पुढील वर्षीही आमचे कार्य सुरळीत पार पडू दे.

**५. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री केर का काढतात ?**

अलक्ष्मी नि:सारण

महत्त्व : गुण निर्माण केले तरी दोष नाहीसे झाले, तरच गुणांना महत्त्व येते. येथे लक्ष्मीप्राप्तीचा उपाय झाला, तसेच अलक्ष्मीचा नाशही झाला पाहिजे; म्हणून या दिवशी नवीन केरसुणी विकत घेतात. तिला लक्ष्मी म्हणतात.

कृती : मध्यरात्री नवीन केरसुणीने घरातील केर सुपात भरून तो बाहेर टाकावा, असे सांगितले आहे. याला अलक्ष्मी (कचरा, दारिद्र्य) नि:सारण म्हणतात. एरव्ही कधीही रात्री घर झाडणे वा केर टाकणे करायचे नसते. फक्त या रात्री ते करायचे असते. कचरा काढतांना सुपे आणि दिमडी वाजवूनही अलक्ष्मीला हाकलून लावतात.

**६. लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक का काढावे ?**

आश्विन अमावास्येच्या दिवशी केल्या जाणाऱ्या श्री लक्ष्मीपूजनाच्या वेळी अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यांवरच श्री लक्ष्मीची स्थापना केली जाते. सर्व देवतांची पूजा करतांना त्यांना अक्षतांचे आसन दिले जाते. अन्य देवतांच्या तुलनेत श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व अक्षतांमध्ये ५ टक्के जास्त प्रमाणात आकृष्ट होते; कारण अक्षतांत श्री लक्ष्मीच्या प्रत्यक्ष सगुण गुणात्मक, म्हणजेच संपन्नतेच्या लहरी आकृष्ट करण्याची क्षमता असते. अक्षतांमध्ये तारक आणि मारक लहरी ग्रहण करून त्यांचे संचारण करण्याची क्षमता असल्याने लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढावे. स्वस्तिकामध्ये निर्गुण तत्त्व जागृत करण्याची क्षमता असल्याने श्री लक्ष्मीच्या आसनाच्या स्वरूपात स्वस्तिक काढावे.

**७. लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणण्याचे कारण**

एखाद्या देवतेची उपासना केली की, त्या देवतेचे तत्त्व उपासकाकडे येते आणि त्यानुसार लक्षणे दिसतात, उदा.श्री लक्ष्मीची उपासना केली की, धनप्राप्ती होते. उपासना कमी झाली, अहं जागृत झाला की, देवतेचे तत्त्व उपासकाला सोडून जाते. अशाच कारणांमुळे श्री लक्ष्मी उपासकाला सोडून जाते. तेव्हा स्वतःची चूक मान्य न करता व्यक्ती म्हणते, लक्ष्मी चंचल आहे. येथे लक्षात घेण्यासारखे सूत्र हे की, लक्ष्मी चंचल असती, तर तिने श्रीविष्णूचे चरण केव्हाच सोडून दिले असते.
परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते

संकलन : **सौ. अंजली पाध्ये, नागपूर**
संपर्क : ९९७५५ ३६९०६

# 'रुईपाठा'च्या आदिवासी बांधवांसोबत कस्तुरीचा दीपोत्सव

मुलांना कपडे वाटप ; गावाला मिष्टान्न भोजन



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २० :

माणुसकीची प्रकाशमय ज्योत सातत्याने तेवत ठेवत कस्तुरी चॅरिटेबल सोसायटी या सेवाभावी संस्थेतर्फे दिवाळीचा सण मेळघाट परिक्षेत्रातील रुईपाठा गावातील आदिवासी बांधवांसोबत साजरा करण्यात आला. तेथील लहान मुलांना कपड्यांसह संपूर्ण गावास मिष्टान्न भोजन देण्यात आले. यानिमित्ताने तेथील आदिवासी बांधव-भगिनी, चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. यंदा अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले. पावसाचा फटका मेळघाट परिसरातही बसला. दिवाळीसारख्या सणात त्या भागातील ग्रामस्थांच्याही जीवनात आनंद निर्माण व्हावा, यासाठी नाही कस्तुरी चॅरिटेबल सोसायटी या सामाजिक संस्थेतर्फे सामाजिक दायित्व निभावण्याच्या भावनेतून मेळघाट परिक्षेत्रातील रुईपाठा गावात दिवाळी साजरी करण्यात आली.

यावेळी ग्रामस्थांना साहित्याचे वितरण करण्यात आले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कस्तुरीचे संस्थापक प्रा. किशोर बुटोले यांच्या मार्गदर्शनात प्रकल्प प्रमुख संजय गायकवाड, संजय ठाकरे, अनिल पालवे, चेतना आनंदानी, अपर्णा काळे, ज्योती सुलताने, संगीता जोध, मीरा वानखडे, कांचनमाला डहाके, सुधीर नितनवरे, गोपाल घाटे आदींनी परिश्रम घेतले. कस्तुरीच्या या सेवाभावी उपक्रमात देशमुख समाज महिला मंडळाच्या अध्यक्ष राजश्री देशमुख, कृष्णार्पण प्रतिष्ठानच्या संस्थापक डॉ. छाया देशमुख, स्व. अथर्व अनिल मुळे मल्टिपर्पज फाउंडेशनच्या सीमा मुळे, प्रा. अनिल मुळे, अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सत्यनारायण बाहेती, सचिव एकनाथराव उके सहभागी झाले.

या साहित्याचे वितरण लहान मुलांना फराळाचे पाकिटे, फटाके, महिलांना भाऊबीज भेट म्हणून नवीन साडी व गावास मिष्टान्न भोजन देण्यात आले. या उपक्रमासाठी कस्तुरीला अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन, कृष्णार्पण प्रतिष्ठान, स्व. अथर्व अनिल मुळे मल्टिपर्पज फाऊंडेशन, देशमुख समाज महिला मंडळ या सेवाभावी संस्था व समाजातील अनेक दानशुर मंडळीची साथ मिळाली.

# मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या वतीने दीपावली किटचे वितरण

## गरजूंना घरी जाऊन फराळ व पूजा साहित्य



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २० :

मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे या वर्षीही दीपावली पर्वात २०० गरजूंना घरी जाऊन फराळ व पूजा साहित्य किट वितरीत करण्यात आले. तसेच रस्त्यावर दीपावलीचे साहित्य विक्री करणाऱ्या ग्रामीण भागातील महिला, पुरुष विक्रेत्यांना ब्लँकेट्स, भोजन व दीपावली साहित्य किट देण्यात आले.

ग्रामीण भागातील दीपावली साहित्य करणाऱ्या महिला पुरुष विक्रेत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ब्लँकेट व भोजनाचा लाभ घेतला. मंडळाचे मार्गदर्शक शरद चांडक, ब्रजेश तापडिया यांच्या मार्गदर्शनात व मंडळाचे अध्यक्ष नितीन चांडक, सचिव जतीन राठी यांच्या उपस्थितीत या वितरण उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ब्लँकेट व भोजन पॅकेट गांधी रोड, गांधी चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह, तहसील चौक, गोरक्षण रोड, तुकाराम चौक, जठारपेठ, रेल्वे स्टेशन, जुने कापड बाजार येथे किटचे साहित्य वितरण केले.

# दिवाळी सणानिमित्त बाजारपेठेत नवचैतन्य



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २० :

दिवाळी सणानिमित्त बाजारपेठेत उत्साह वाढला आहे. दिवाळीनिमित्त रविवारी दुकानांमध्ये मोठी गर्दी पाहायला मिळाली. घरे सजवण्यासाठी रंगीबेरंगी लायटिंग, बल्ब, आकाशदिवे, तार आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची बाजारात विक्री वाढली आहे. त्यामुळे थंड पडलेल्या बाजारात दोन दिवसांपासून झळाळी मिळाली आहे.

दिवाळीनिमित्त बाजारपेठ गर्दीने फुलून गेली होती. नागरिकांसह बच्चेकंपनीच्या उत्साहाला उधाण आले आहे. पणती, महालक्ष्मीची मूर्ती, फोटो, कपडे, पूजेचे साहित्य तसेच फटाके घेण्यासाठी नागरिकांची झुंबड पहायला मिळत आहे. दिवाळीच्या तोंडावर बाजारात फारसा उत्साह दिसून येत नव्हता. शनिवारपासून बाजारात नागरिकांची रेलचेल वाढली आहे. रविवारी बाजारात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. शासकीय कार्यालयांना सुट्या असल्याने गर्दी वाढल्याचे चित्र दिसून आले. शहरात खरेदीसाठी लगतच्या तालुका तसेच गावातूनही मोठ्या प्रमाणात नागरिक शहरात आले होते. सोने, वाहन, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू घेण्यासाठी एकच गर्दी दिवाळीच्या मुहुर्तावर सोने खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे शहरातील सराफा बाजारात दागिणे घेण्यासाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केली होती. बहुतांश ग्राहक दागिणे बुक करण्यासाठी बाजारात आले होते. वाहन बाजारात देखील लोकांनी मोठी गर्दी केली होती. वाहन बाजारात दुचाकी बरोबर चारचाकी वाहनांनाही मोठी मागणी आहे.

कागदीसह बुडनचेही कंदिल बाजारात विक्रीसाठी दाखल शहरातील दत्त चौक, मेन लाईन परिसरातील मुख्य बाजारपेठेत आकाश कंदिलसह आवश्यक त्या सर्व साहित्याचे स्टॉल लागले आहेत.

४०० रुपयांपासून ३ हजारांपर्यंत कंदिलाचे दर आहेत. त्यातही वूडन आणि ज्युटचे गोल, त्रिकोणी, चौकोणी, षटकोणी, कागदीसह शंभुराजे, तिरुपती बालाजी, स्वामी समर्थ, राधा कृष्ण, पांडुरंगासह शंकर पार्वतीच्या फोटोचे नवीन कंदिल विक्रिस आले.

# सांस्कृतिक भवनात सोहळा, कलावंत, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

दीपोत्सव, फोटोग्राफी प्रदर्शनाचा शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २० :

महानगरपालिकेतर्फे आयोजित दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी दि. १६ ऑक्टोबर रोजी सांस्कृतिक भवनात मोठ्या उत्साहात व सांस्कृतिक वातावरणात झाले. या उद्घाटन समारंभात शहरातील मान्यवर, अधिकारी, कलाकार, छायाचित्रकार, महिला बचत गट प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर सजवण्यात आलेले सांस्कृतिक भवन दिव्य रोषणाईने उजळून निघाले होते. महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन आ.सुलभा खोडके, आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी फोटोग्राफी प्रदर्शनातील विविध छायाचित्रांचे अवलोकन केले. शहरातील अनेक नामवंत व नवोदित छायाचित्रकारांच्या कलाकृतींनी प्रदर्शनाची शोभा वाढवली आहे. दिवाळी आनंदोत्सवांतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरणे, नृत्य, संगीत, बचत गटांच्या आकर्षक वस्तूंची विक्री आणि स्थानिक उद्योजकांचे स्टॉल लावण्यात आले आहेत. नागरिकांना पारंपरिक कलेचा आणि स्थानिक उत्पादनांचा आस्वाद घेण्याची ही उत्कृष्ट संधी उपलब्ध झाली आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी या प्रसंगी नागरिकांना आवाहन केले की, हा आनंदोत्सव आपल्या शहराच्या संस्कृतीचा, परंपरेचा, सामूहिक ऐक्याचा उत्सव आहे. हा महोत्सव १६ ते २१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान दररोज सायंकाळी विविध कार्यक्रमांसह सुरू राहणार असून, सांस्कृतिक भवन, अमरावती येथे सर्व नागरिकांसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

# नांदगाव पं. स.द्वारा शिक्षकांचा सन्मान



**नांदगाव खंड , दि. २० :** पंचायत समिती नांदगाव खंडेश्वरद्वारा समितीच्या सभागृहात शिक्षक सन्मान सोहळा आयोजित केला होता. गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ यांच्या अध्यक्षतेखालील या सोहळ्यात शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षा, आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार व सहायक गटविकास अधिकारी संजय झंझाळ आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जि. प. शाळा पहूरच्या विद्यार्थ्यांनी स्वागत नृत्य करत सर्वांची मने जिंकली.

या सन्मान सोहळ्यात ५८ शिक्षकांचा मिशन पटसंख्या वाढ, ३ शिक्षकांचा नवोदय पात्रता परीक्षेतील योगदान व २ शिक्षकांचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. तसेच केंद्राच्या पटसंख्येत विशेष वाढ झाल्याबद्दल केंद्रप्रमुख अनिल कोल्हे यांचा विशेष सन्मान केला. सन्मानित शिक्षकांमध्ये सूरज वाघमारे, अनंत राठोड, प्रतिभा पवार, भाग्यश्री पानसरे, सरोज रघुवंशी, इंदिरा पोटेकर, विष्णू आडे, जफर अली गुलाम अली, रंजना मानेकर, ज्योती मंडलकर, वंदना ढगे, बसंत मून, शंकर कवाने, सुनीता जुमळे, दिलीप गुल्हाने, माधवी कहाळे आदींचा समावेश होता.

या वेळी मान्यवरांनी शिक्षकांना प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शालेय पोषण आहार अधीक्षक तथा शिक्षण विस्तार अधिकारी विलास बाबरे यांनी केले. सूत्रसंचालन राधा मोहोड यांनी केले, तर आभार शिक्षण विस्तार अधिकारी वैशाली महाजन यांनी मानले. कार्यक्रमासाठी केंद्रप्रमुख अनिल कोल्हे, विलास राठोड, प्रवीण मेहरे, बाळासाहेब मुंदे, अविनाश आढाव, आदींनी परिश्रम घेतले.

# कुंवरदेव येथील महिलांना साडीचोळी, फराळाचे वाटप



■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २० :

जळगाव जामोद तालुक्यातील कुंवरदेव या आदिवासी पाड्यांवरील आदिवासी माता भगिनींना साडी, चोळी देऊन फराळाचे वितरण करण्यात आले. राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीप शेळके यांनी सहकुटुंब आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केल्याने आदिवासीच्या दिवाळीचा गोडवा अधिकच वाढल्याचे दिसून आले. ही सोहळा १८ ऑक्टोबर रोजी रात्री पार पडला.

राजर्षी शाहू परिवाराने कुंवरदेव हे आदिवासीबहुल गाव दत्तक घेतले आहे. त्यांनी या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्याचे ध्येय आहे. याअनुषंगाने गावात विविध उपक्रम राबवण्यात येतात. संदीप शेळके हे मागील सात वर्षापासून सातत्याने आदिवासी बांधवांसोबत सहकुटुंब दिवाळी साजरी करतात. त्यांच्या आनंदात सहभागी होऊन सणाचा गोडवा वाढवला जातो. यंदा देखील सदर दिपावली साजरी करण्यात आली. यावेळी राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या अध्यक्षा मालती शेळके यांच्या हस्ते गावातील माता-भगिनींना साडी-चोळी,ड्रेस आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या भेटवस्तूंनी त्यांच्या चेहऱ्यावर निरागस आनंद फुलला. याप्रसंगी संस्थेच्या संचालिका छायाताई शेळके, वसंता इंगळे, शैलेश काकडे, शरद मोहिते, संजय लोखंडे, दीपक मानकर, सुभाष मानकर, शिरीष मारोडे, सागर मारोडे, मनोज वाघ, गणेश जाधव, विश्वनाथ गावंडे, शांताराम मुऱ्हेकर, प्रमोद तायडे, सचिन फाळके, श्याम उन्हाळे, अतुल उन्हाळे, योगेश उन्हाळे उपस्थित होते.

# अभाविपची ७ नोव्हेंबरला महाविद्यालय बंदची हाक

१४ नोव्हेंबरला मोर्चा



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २० :

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ढिसाळ कारभाराविरोधात आंदोलन पुकारले आहे. अभाविपने ७ नोव्हेंबर रोजी 'महाविद्यालय बंद'ची हाक दिली असून, त्यानंतर १४ नोव्हेंबरला विद्यापीठावर मोर्चा काढण्याचे नियोजन केले आहे. ही माहिती अभाविपच्या विदर्भ प्रांत मंत्री पायल किनाके यांनी दिली.

किनाके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, विद्यापीठात प्रवेश, परीक्षा आणि निकाल या तिन्ही स्तरांवर अनेक समस्या आहेत. संघटनेने यापूर्वीही प्रशासनाला या त्रुटींबद्दल अवगत केले होते आणि उपाययोजनांची मागणी केली होती, परंतु विद्यापीठाच्या कामकाजात सुधारणा झाली नाही.

यामुळेच विद्यार्थी परिषदेने हे तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रवेश, परीक्षा, निकाल, अभ्यासक्रम आणि पदभरती हे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र, विद्यापीठ प्रशासन यापैकी कोणत्याही आघाडीवर उत्कृष्ट कामगिरी करू शकले नाही, ज्यामुळे विद्यापीठाची प्रतिमा खराब झाली असून विद्यार्थ्यांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) विद्यार्थ्यांना विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असले तरी, विद्यापीठाने त्यातही अडचणी निर्माण केल्या आहेत.

एनईपी लागू करताना महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची नियुक्ती किंवा कुशल विषय शिक्षकांची नेमणूक या दोन्ही मुद्द्यांवर विद्यापीठाला अपयश आले आहे. या सर्व मागण्या घेऊन ७ नोव्हेंबरच्या महाविद्यालय बंदमध्ये आणि १४ नोव्हेंबरच्या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहनही अभाविपने केले आहे. यावेळी विद्यापीठ मोर्चा प्रमुख रिद्देश देशमुख, विदर्भ प्रांत मीडिया सहसंयोजक कैवल्य रुद्रे, महानगर महामंत्री गौरी भारती, ऋषभभाऊ आणि गौरी देशमुख यांच्यासह इतर छात्रनेते उपस्थित होते.

# दिवाळी निमित्त बाजारपेठा गजबजल्या

## खरेदीसाठी नागरिकांची उसळली गर्दी



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २० :

आनंदाची उधळण करणाऱ्या दिवाळी सण उत्साहात साजरा होत आहे. रविवारी शहरातील गांधी चौक, कापड बाजार परिसरात दिवाळीचे साहित्य खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांची मोठी गर्दी उसळली आहे. व्यावसायिकांनी आकर्षक सवलत जाहीर के ल्या आहेत.

त्यामुळे दिवाळीनिमित्त मोठी उलाढाल होण्याचा अंदाज व्यावसायिकांनी वर्तवला आहे. गेले काही दिवस दिवाळी खरेदीसाठी बाजारात होत असलेली गर्दी पाहिल्यानंतर या उत्साहाची नेमकी कल्पना येऊ शकते. सामान्य शेतकऱ्यांपासून गर्भश्रीमंतांपर्यंत सगळ्या थरातल्या लोकांना दिव्यांच्या उजेडात न्हाऊ घालणारा सण म्हणून दिवाळीचे जरा जास्तीच कौतुक असते. या दिव्यांच्या उत्सवात जे अनेक महत्त्वाचे दिवस असतात, त्यातील लक्ष्मीपूजनाचा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

मंगळवारी लक्ष्मीपूजन आहे. व्यापारी लोकांचे हिशेबाचे नवीन वर्ष (विक्रमसंवत्सर) लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. यादिवशी वहीपूजन केले जाते. या लक्ष्मीपूजनाचे साहित्य तसेच दिवाळीच्या पर्वावर विविध गृहपयोगी वस्तूंच्या खरेदीवर नागरिकांनी भर दिल्याने खरेदीसाठी झालेल्या गर्दीने बाजारपेठेत पाय ठेवायलाही जागा नसल्याचे चित्र रविवारी सायंकाळी पहावयास मिळाले.

## मतचोरी होत असल्याचा मला अनुभव
## महादेव जानकरांची स्पष्ट भूमिका



**बुलढाणा :** राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी आज बुलढाणा येथे बोलताना 'देशात मतचोरी होत आहे' या विरोधकांच्या आरोपाला पाठिंबा दिला. या मुद्द्यावर त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भूमिकेशी आपण सहमत असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले. तसेच, शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होत नसल्यास शेतकऱ्यांनी संपावर जावे, असे आवाहनही त्यांनी केले. महादेव जानकर यांनी यावेळी मतचोरी आणि बोगस मतदारांच्या मुद्द्यावरून सरकार व निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला. देशात आणि राज्यात मतचोरी होत असल्याचा विरोधकांचा आरोप सत्य आहे आणि मी त्याच्याशी सहमत आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. मला स्वतःला मतचोरीचा अनुभव आलेला आहे. निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था असूनही या गंभीर विषयावर गप्प का आहे?, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. मतचोरी आणि बोगस मतदारांच्या बाबतीत राज ठाकरे यांच्या भूमिकेशी आपले पूर्ण सहमत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कृषिप्रधान देशात जर शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होत नसतील, तर सर्व शेतकऱ्यांनी संपावर जावे, असे थेट आवाहन जानकर यांनी केले. सध्या राज्यात कर्जमाफीच्या मुद्द्यावरून शेतकरी आक्रमक आहेत. त्याचप्रमाणे, अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकारने दिलेली मदत तुटपुंजी असल्याबद्दल शेतकरी आणि विरोधकांनी टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर जानकर यांनी केलेली ही मागणी महत्त्वाची मानली जात आहे.यावेळी महादेव जानकर यांना पंकजा मुंडे यांच्याबद्दल प्रश्न विचारला असता, त्यांनी राजकीय भूमिका स्पष्ट केली. पंकजा मुंडे या जरी माझ्या बहिणी असल्या तरी त्यांचा पक्ष आणि माझा पक्ष वेगळा आहे. आमचे नाते राजकारणाच्या पलीकडचे आहे. त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करण्याचा प्रश्नच येत नाही, असे स्पष्टीकरण जानकर यांनी दिले.

## ६ कोटी ८१ लाखांचा शासकीय निवास प्रकल्प रखडलेला

**संग्रामपूर , दि. २० :** तालुक्याच्या मुख्यालयी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तब्बल ६ कोटी ८१ लाख रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानाचा ताबा अद्याप अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आला नाही, ही बाब आता स्थानिक पातळीवर चर्चेचा व जनतेचा व अधिकारी कर्मचाऱ्याचा नाराजीचा विषय ठरली आहे. विविध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना तालुक्यातच मुख्यालयी सुसज्ज व हक्काचे निवासस्थान उपलब्ध करून देणे हा या निवासस्थान बांधकामा मागील प्रमुख उद्देश आहे. मागील १५ ऑगस्ट रोजी, बांधकाम करण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानाचा लोकार्पण सोहळा मोठ्या थाटात पार पडला. परंतु उद्घाटन सोहळ्याचा जल्लोष ओसरल्यानंतर वास्तवाचा धक्का बसला. दोन महिने उलटले तरीही निवास स्थानांचा ताबा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळाला नाही.

# उमरखेडचा पेट्रोल पंप अतिक्रमणात नाही

**उमरखेड, दि. २० :** शहरातील स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकातील लीज संपलेला पेट्रोल पंप हटवा, पंपाच्या अतिक्रमण काढण्यावरून कामात हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे नोंदवा आदी मागण्यावरून मागील १७ दिवसांपासून सुरु असलेल्या आमरण उपोषणाची दखल प्रशासनाने दि. १६ ऑक्टोंबरला उपोषणकर्त्यांनी शोले स्टाईल आंदोलन केल्यानंतर घेतली. गुरूवारी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी रस्त्याची मोजणी केली असता पेट्रोल पंप हा अतिक्रमणात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी बुधवारी उपोषण मंडपाला भेट देवून आज रस्ता मोजणी करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार पेट्रोल पंप अतिक्रमणात आहे का, यासाठी सर्व संबंधीत विभागाच्या अभियंते, अधिकारी यांना व उपोषण कर्त्यांना सोबत घेवून शहरात येणाऱ्या २ किलोमिटर पासून रस्त्याची मोजणी केली. यावेळी पेट्रोलपंप व पेट्रोल पंपाची जागा हि २४ मिटरच्या बाहेर निघाल्याने हा पंप व याची जागा अतिक्रमणात येत नसल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी उपोषणकर्ते व पेट्रोलपंप चालका समवेत आमदार किसन वानखेडे, भाजपा नेते नितिन भुतडा, मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांच्या उपस्थितीत नगरपरिषदेत घेतलेल्या बैठकीत सांगीतले.

# निराधारांचे 'आधार' बनले बडनेराचे आधार केंद्र



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २० :

बेघर, बेवारस, निराधारांना आधार देऊन त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्याची काळजी वाहणारे, प्रसंगी इहलोकीची यात्रा करणाऱ्यांच्या अंत्यसंस्कार विधीचीही जबाबदारी स्वीकारणारे राजीव बसवनाथे व ज्योती राठोड यांचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे.

बेघर मायबापाची सेवा करणे हेच पुण्य कर्म असून, त्यासाठी मंदिरात जाण्याची काहीच गरज नसल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी केले. राजीव बसवनाथे आणि ज्योती राठोड या केंद्राचे काळजीवाहक असून राठोड यांच्याकडे व्यवस्थापनाचीही जबाबदारी आहे. महापालिका आणि राष्ट्रीय उपजीविका अभियानांतर्गत पब्लिक एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटीच्या माध्यमातून बडनेरा येथे 'आधार' या नावाने शहरी बेघर लोकांसाठी निवारा केंद्र चालवले जाते. जागतिक बेघर दिनानिमित्त या केंद्राद्वारे नुकतेच आठवडाभर वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले. या सप्ताहाचा समारोप तपोवन येथील विदर्भ महारोगी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. उद्घाटन मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय जैन संघटनेचे माजी अध्यक्ष सुदर्शन गांग (जैन) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोविंद कासट, मनपाचे उपायुक्त योगेश पिठे व नरेंद्र वानखडे, अभियंता श्रीरंग तायडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य गवई पुढे म्हणाले, राजीव बसवनाथे व ज्योती राठोड यांचे कार्य अनुकरणीय आहे. आपल्यापैकी बरेच जण स्वतःला देव कार्यात वाहून घेतात. मात्र या दोघांनी निराधारांची सेवा हेच खरे देवकार्य मानले आहे. अर्थात मानवसेवा हिच ईश्वर सेवा आहे, या सुभाषिताला त्यांनी मूर्त स्वरूप प्रदान केले आहे. या वेळी इतर मान्यवरांनीही आपले विचार मांडले. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SAMIR KRISHNAKUMAR DVIVEDI.** NOW MY NEW NAME IS **SAMIR KRISHNA KUMAR DWIVEDI .**
**ADD** : RAMJI CHOWK AMBEDKAR NAGAR WADI NAGPUR.

MY OLD NAME WAS **SUNDARLAL KATRE.** NOW MY NEW NAME IS **SUNDAR KATRE.**
**ADD** : AT. SILLI POST. GANGLA TA. TIRORA GONDIA

RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३**

# जोश

## मस्त साबुदाणा भेळ

झटपट रेसिपी

दोस्तांनो, उपवासाला साबुदाण्याची खिचडी बनवली जाते. हा झटपट होणारा पदार्थ आहे. पण प्रत्येक वेळी साबुदाणा खिचडी खाऊन खूप कंटाळा येतो. उपवासाचे इतर पदार्थ वेळखाऊ असतात. अशावेळी झटपट होणारी साबुदाणा भेळ ट्राय करून बघा.

**सामग्री:** अर्धा कप साबुदाणा, एक बटाटा, दाण्याचं कूट एक चमचा, थोडे काजू, एक चमचा लिंबाचा रस, सैंधव मीठ, दोन चमचे शेंगदाणा तेल, बटाट्याचा फराळी चिवडा, चिरलेली कोथिंबिर.

**कृती:** साबुदाणा धुवून दोन ते तीन तास भिजवून ठेवा. बटाट्याचे छोटे तुकडे करून घ्या. आता गॅसवर कढई ठेवा. त्यात तेल घाला. तेल थोडं गरम झाल्यावर त्यात बटाटे घालून सोनेरी रंगावर तळून घ्या. काजूचे तुकडे करून घ्या. आता कढईत काजूचे तुकडे आणि शेंगदाणे घालून तळून घ्या. बटाटे, काजू आणि शेंगदाणे एका भांड्यात काढून ठेवा. आता याच तेलात साबुदाणा परतून घ्या. आता हा साबुदाणा भांड्यात काढा. त्यात तळलेले बटाटे, काजू आणि शेंगदाणे घाला. चवीनुसार मीठ घाला. त्यात बटाट्याचा चिवडा घालून हलवून घ्या. वरून कोथिंबिर घाला. आता लिंबाचा रस घालून मिक्स करा. यात डाळिंबाचे दाणेही घालता येतील.



## शेर की जुबानी

एक परवाह ही बताती है कि
ख्याल कितना है,
वरना कोई तराजू नहीं होता,
रिश्तों में।

जिंदगी गुजर जाए, पर
दोस्ती कम ना हो,
याद हमें रखना चाहे
पास हम ना हो।

काश दिल की आवाज में
इतना असर हो जाए,
हम याद करें और उसको
खबर हो जाए।



## ...अन्यथा लवकर म्हातारे व्हाल

फिटनेस फंडा

दोस्तांनो, व्यायामामुळे तुम्ही तंदुरुस्त होता. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. सकाळी छान ताजंतवानं वाटतं. हे जरी खरं असलं तरी काही चुकांमुळे तुम्ही खूप लवकर म्हातारे दिसू लागता. व्यायाम करताना कोणत्या चुका होतात ? जाणून घेऊ.

✲ व्यायाम करताना शारीरिक स्थितीचा विचार करा. जीममध्ये व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने उभं राहिल्याने, वाकल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याला बाक येतो. मग तुम्ही वाकून चालू लागता. हे टाळण्यासाठी व्यायाम करताना शरीराच्या स्थितीकडे लक्ष द्या. चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

✲ कार्डिओ हा खूप चांगला व्यायामप्रकार असला तरी त्याच्या अतिरेकाने शरीराचं नुकसान होऊ शकतं. विशिष्ट वयानंतर हाडं आणि स्नायूंना पुरेसा व्यायाम मिळाला नाही तर त्यांच्या कार्य मंदावतं. तसंच १८ ते ५० या वयोगटातल्या व्यक्तींनी वेट लिफ्टिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करावं, असं एक संशोधन सांगतं. स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे स्नायूंना बळकटी मिळते. शिवाय कॅलरीही खर्च होतात.

✲ 'हाय इंटेंसिटी इंटरवल ट्रेनिंग' गरजेचं आहे. या व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. शारीरिक क्षमताही वाढते. या सगळ्यामुळे आपण बराच काळ तरुण रहातो.

✲ शरीर ताणण्याच्या व्यायामाकडे दुर्लक्ष करू नये. व्यायामाआधी आणि नंतर शरीर ताणायला हवं. शरीर ताणण्याचे व्यायाम केले नाहीत तर स्नायू आणि त्यातल्या टिश्यूंवर अकारण ताण येतो. तसंच या व्यायामामुळे शरीर लवचिक होतं आणि व्यायाम करताना त्रास होत नाही.

✲ सतत जीममध्ये व्यायाम करत राहिल्याने आपण तंदुरुस्त राहू हा समज चुकीचा आहे. व्यायामाप्रमाणेच शरीराला विश्रांतीचीही गरज असते. स्नायूंची झीज भरून काढण्यासाठी शरीराला वेळ देणं गरजेचं आहे. त्यामुळे एखादा दिवस विश्रांती घ्या.

## सुजीतकुमारच्या यशाची सांगीतिक किनार

अचिव्हर

बिहारमधील सुजीत कुमार यांनी फक्त ५० हजार रुपयांमध्ये मेहनतीने आणि आवडीने संगीतजगतात ठसा उमटवला आहे. सुजीतने छोट्या गुंतवणुकीतून स्टुडिओ सुरू केला होता. पुढे धाडसाने आणि समर्पणभावनेतून काम केल्यामुळे त्याचा हाच 'राधिका स्टुडिओ' कोसी प्रदेशातील एक प्रसिद्ध नाव बनले आहे. हा स्टुडिओ सुजीतची यशोगाथाच नाही तर अनेक तरुण प्रतिभावान कलाकारांच्या स्वप्नांना एक व्यासपीठदेखील प्रदान करतो.

सुजीतला लहानपणापासूनच संगीताची आवड आहे. संगीत शिकण्यासाठी त्याने अनेक राज्यांमध्ये प्रवास केला आहे. त्याला नवोदित कलाकारांना शिकवू शकेल अशा एका स्टुडिओच्या उभारणीची आस होती. परंतु निधीअभावी स्टुडिओ उघडण्यात अडचणी आल्या. कसेबसे ५५ हजार रुपये उभे करता आले. मात्र स्थानिक कलाकारांसाठी आज हाच स्टुडिओ वरदान ठरला आहे. सहरसा येथील नया बाजार बायपास रोडवर असणारा हा स्टुडिओ अनेकांना घडवतो. येथे केवळ हजार रुपयांमध्ये गाणे रेकॉर्ड करता येते तर नवीन स्वर तयार करण्यासाठी तीन हजार रुपये खर्च येतो. कोसी प्रदेशात असा परवडणारा स्टुडिओ दुर्मीळ म्हणावा लागेल. जिल्ह्यातील हा पहिलाच असा स्टुडिओ आहे जिथे उच्च दर्जाच्या रेकॉर्डिंगसोबतच नवीन कलाकारांना योग्य दिशा दिली जाते.



आपल्या वाटचालीबद्दल सुजीत म्हणतो, कलाकारांच्या कौशल्यांना चालना देणे आणि त्यांना देशात तसेच परदेशात ओळख मिळवून देणे हेच माझे उद्दिष्ट आहे. या स्टुडिओने अनेक लहान-मोठ्या गायकांना संधी दिली असून ते संगीत जगतात नाव चमकवत आहेत. सुजीत आता कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचा मालक आहे. स्वाभाविकच तो अनेकांसाठी एक उदाहरण बनला आहे. सुरुवातीच्या काळात त्याने अनेक अडचणींचा सामना केला पण धैर्याने व्यवसायात झेप राहिली. आज त्याने अनेक ठिकाणी जमीन खरेदी केली असून एक आलिशान घरदेखील बांधले आहे.

## टेक्नो टॉक



### राऊटरचा वेग वाढवायचाय ?

आजकाल प्रत्येक घरात वाय-फाय राउटर असतो; परंतु इंटरनेट स्पीडबद्दल तक्रारीही बऱ्याच असतात. इंटरनेट स्पीड कमी झाल्यास व्हिडीओ स्ट्रीमिंगमध्ये व्यत्यय येणे, वेबपेज उघडण्यास विलंब आणि वारंवार नेटवर्क डिस्कनेक्ट होणे आदी समस्या सतावतात. बऱ्याचदा लोक कंपनीची सेवा चांगली नाही... असे म्हणत वैतागतात. परंतु यामागील खरे कारण घरात चुकीच्या ठिकाणी राउटर ठेवणे आणि त्याच्या जवळ ठेवलेल्या वस्तूमध्येही दडलेले असू शकते. वाय-फाय रेडिओ वेव्सवर काम करतो. त्यामुळेच राउटरजवळ मोठे आरसे असतील तर सिग्नल रिफ्लेक्ट होऊ शकतात आणि दिशा बदलून कव्हरेज कमी होते. त्याचप्रमाणे लोखंड-स्टीलदेखील रेडिओ वेव्सना ब्लॉक करतात. अशा वस्तू जवळ असल्यास नेटवर्क कमकुवत होते. हे लक्षात घेता राउटर कधीही काचेच्या किंवा धातूच्या वस्तूंजवळ ठेवू नये. स्पीकर्स, माऊस, की बोर्ड सारख्या ब्लूटूथ डिव्हाइसेसचाही वाय-फायवर परिणाम होतो. ब्लूटूथ आणि वाय-फाय दोन्ही २.४ गीगाहर्ट्झ फ्रिक्वेन्सीवर चालतात. त्यामुळे वायफाय स्पीडमध्ये व्यत्यय वाढतो आणि इंटरनेटचा वेग कमी होतो. हे टाळण्यासाठी ब्लूटूथ गॅझेट्सपासून राउटर काही अंतरावर ठेवणे चांगले.

## स्मार्ट टॉक




### ...तरी कॉल करता येणार

'भारत संचार निगम लिमिटेड' (बीएसएनएल) ने ग्राहकांसाठी एक आकर्षक आणि नावीन्यपूर्ण सेवा सुरू केली आहे. 'व्हीओवायफाय कॉलिंग' ने आता 'बीएसएनएल' ग्राहकांना मोबाइल नेटवर्क नसतानाही 'वायफाय' किंवा ब्रॉडबँडच्या मदतीने स्पष्ट आणि अखंडित कॉलिंगचा अनुभव घेता येणार आहे. ही सेवा सध्या दक्षिण आणि पश्चिम भारतातील ग्राहकांसाठी उपलब्ध असून लवकरच देशभरात त्याचा विस्तार होणार आहे. विशेष बाब म्हणजे ही सेवा सर्व बीएसएनएल ग्राहकांसाठी पूर्णपणे मोफत आहे. 'बीएसएनएल'ने २५ व्या वर्धापनदिनानिमित्त ही सेवा सुरू केली आहे. दूरसंचार विभागाचे सचिव नीरज मित्तल यांनी नुकतेच या सेवेचे सॉफ्ट लॉन्च केले. 'व्हीओवायफाय' सेवेमुळे ग्राहकांना घरात किंवा कमी नेटवर्क असणाऱ्या भागातही वायफायद्वारे कॉल करता येणार आहे. यासाठी फक्त 'व्हीओवायफाय' सपोर्ट करणारा स्मार्टफोन आवश्यक आहे जो बहुतांश आधुनिक अँड्रॉइड आणि आयफोनमध्ये आधीपासून उपलब्ध असतो. 'बीएसएनएल'ने याशिवाय देशभरात फोर जी नेटवर्कचा विस्तारही केला आहे. कंपनीने एक लाखांहून अधिक मोबाइल टॉवर्स उभारले असून आणखी ९७ हजार पाचशे टॉवर्स उभारण्याची योजना आहे. मुंबईत फोर जी आणि ई-सीम सेवाही सुरू झाल्या आहेत. या सर्व घडामोडी 'बीएसएनएल'ला जिओ, एअरटेल आणि व्होडाफोन-आयडियासारख्या खासगी कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी तयार करत आहेत.

## करिअरसाठी योग्य कोर्स निवडा

हे लक्षात घ्या

करिअरसाठी किंवा शिक्षणासाठी मुख्य अभ्यासक्रमाबरोबर पूरक प्रमाणपत्र अभ्यासक्रम निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवा.



✲ **स्पष्ट उद्देश ठरवा :** तुम्हाला कोर्स नोकरीसाठी, व्यवसायासाठी की ज्ञानासाठी निवडायचा आहे हे उद्देश स्पष्ट असेल तर योग्य कोर्स निवडणे सोपे जाते.

✲ **संशोधन करा :** तुमच्या इंडस्ट्रीमध्ये सध्या कोणत्या कौशल्यांची मागणी आहे ते पाहा. (उदा., डेटा नालिटिक्स, डिजिटल मार्केटिंग, वेब डेव्हलपमेंट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट, कोडिंग, ग्राफिक डिझाइन इ.). त्यानुरुप प्रसिद्ध आणि विश्वासार्ह संस्थांचे अभ्यासक्रम शोधा.

✲ **आढावा घ्या :** आधीच्या विद्यार्थ्यांचे रिव्ह्यूज वाचून कोर्सची गुणवत्ता समजून घ्या. कोर्समध्ये प्रत्यक्ष काय शिकवले जाणार आहे ते सिलॅबसवरून तपासा.

✲ **वेळेचे व्यवस्थापन :** कोर्ससाठी आठवड्यातून किती तास द्याल ते आधीच ठरवा. एक नियमित वेळापत्रक बनवा आणि त्याच्याशी जुळवून घ्या.

✲ **सक्रिय सहभाग :** फक्त व्हिडिओ पाहून कोर्स पूर्ण करू नका. प्रॅक्टिकल साइनमेंट्स, क्विझेस आणि फोरममध्ये सक्रियपणे भाग घ्या. हे शिकण्याच्या प्रक्रियेसाठी खूप महत्त्वाचे आहे.

✲ **प्रमाणपत्राचा योग्य वापर करा :** अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर मिळालेले सर्टिफिकेट लिंक्डेन प्रोफाइलवर जोडा. इंटरव्ह्यूदरम्यान तुम्ही हे नवीन कौशल्य शिकल्याचा उल्लेख करू शकता.

## इन्स्टाग्रामचे मॅप फीचर

जाणून घ्या

इंस्टाग्रामने भारतीय वापरकर्त्यांसाठी एक नवे आणि रोमांचक मॅप फीचर आणले आहे. ते रिअल टाइम लोकेशन शेअर करण्याची सुविधा देते. हे फीचर ऑगस्टमध्ये जागतिक स्तरावर लॉन्च झाले होते. आता ते भारतातही उपलब्ध आहे. हे फीचर तुम्हाला जवळपासच्या पार्ट्या, कार्यक्रम आणि ट्रेंडिंग ठिकाणांची माहितीही देईल.



या मॅपद्वारे तुम्ही कॅफे, लोकप्रिय ठिकाणे किंवा मित्रांच्या प्रवासाशी संबंधित पोस्ट, रील्स व स्टोरीज पाहू शकता. उदाहरणार्थ, तुमच्या शहरात कोणत्या ठिकाणी खास प्रोग्राम होत आहेत किंवा कोणती जागा ट्रेंडिंग आहे, याची रिअलटाइम माहिती इथे मिळेल. हे फीचर स्नॅपचॅटप्रमाणेच आहे; पण इंस्टाग्रामने यात काही खास वैशिष्ट्ये जोडली आहेत. अर्थात हे गुगल किंवा ॲपल मॅप्ससारखे नेव्हिगेशनसाठी नाही तर इंस्टाग्राम ॲपमधील एक स्वतंत्र फीचर आहे.

गोपनीयतेच्या दृष्टीने इंस्टाग्रामने यात विशेष काळजी घेतली आहे. डीफॉल्ट सेटिंगनुसार लोकेशन शेअरिंग बंद असते. तुम्हाला ते स्वतः चालू करावे लागेल. त्याचबरोबर एक इंडिकेटर तुम्हाला लोकेशन शेअर होत आहे की नाही हे दाखवेल; पण लक्षात ठेवा एकदा लोकेशन शेअरिंग सुरू केले तर ते बंद करेपर्यंत सुरू राहील.

या फीचरमुळे इंस्टाग्रामचा अनुभव मजेदार तर होणारच आहे; पण एक छोटीशी चूकही तुम्हाला महागात पडू शकते हे लक्षात घ्यायला हवे. लोकेशन सेटिंग सुरू करताना चूक झाली तर तुमची माहिती नको त्या कनेक्शनसोबतही शेअर होऊ शकते. त्यामुळे गोपनीयतेची काळजी घेण्यासाठी सेटिंग्ज तपासायला विसरू नका.

## स्टाईल मंत्रा

### दाढी कोरण्याबरोबरच रंगसंगतीलाही प्राधान्य



सणासुदीच्या हंगामात तरुणांचे एकमेव आकर्षण केवळ पोशाख, शूज आणि बाईक नाहीत. सध्या दाढीची फॅशन प्रचलित आहे. विविध सलूनमधील तरुण हेअरस्टाइलसह वेगवेगळ्या दाढीच्या लूकवर लक्ष केंद्रित करत आहेत. आजकाल तरुणांना दाढीचे विंटेज किंवा व्ही-आकार आवडतात.

खरं तर, ही शैली जुन्या काळातील राजे आणि सम्राटांशी जोडली जात आहे. या शैलीमध्ये, दाढी हनुवटीवर अधिक ठळकपणे दिसते तर चेहऱ्याच्या उर्वरित भागावर कमी दिसते. यात बरगंडी आणि सोनेरी कलरिंगला प्राधान्य दिले जात आहे. तरुण दाढीच्या मऊपणावर लक्ष केंद्रित करत आहेत. दाढी मऊ ठेवण्यासाठी तरुणांनी स्मूथिंग आणि स्टायलिंग उत्पादने वापरण्यास सुरुवात केली आहे. यासाठी प्रथिने, सीरम, शॅम्पू, तेल आणि कंडिशनर यासारख्या उत्पादनांचा वापर केला जात आहे. आता दाढीचे विशिष्ट शॅम्पू, कंडिशनर आणि कंगव्यांची मागणीही वाढत आहे. दाढी राखण्यासाठी तरुण स्पाकडे वळत आहेत. दाढीशी जुळणारे हेअरस्टाईलदेखील आकर्षक लूक देण्यास कारक ठरत आहे.

## तिच्या पालकांचा विरोध आहे!



मॅच मेकिंग


मी २८ वर्षांचा तरुण असून गेल्या चार वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये आहे. आमच्या दोघांच्या नात्यात जातीचा अडसर आहे. आमची जात वेगळी असल्यामुळे तिच्या घरच्यांच्या आमच्या नात्याला विरोध आहे. आमच्या नात्याबद्दल कळल्यानंतर तिच्या घरच्यांची तिच्याशी अबोला धरला आहे. माझ्या घरातून वडिलांचा पाठींबा आहे. पण मैत्रिणीचे पालक खूपच जुन्या विचारांचे असल्याने त्यांनी तिला सक्त ताकीद दिली आहे. माझ्याशी संपर्क ठेवला तर ते तिचं बाहेर जाणंच बंद केलं जाणार आहे. त्यामुळे तिनेही हे नातं संपवायचं ठरवलं आहे. पण आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे. एकमेकांपासून दूर जाण्याचा विचार आम्ही करू शकत नाही. अशा परिस्थितीत मी काय करू?

**उत्तर :** तुमचं नातं खूपच गुंतागुंतीचं होऊन बसलं आहे. अशा परिस्थितीत तिच्या पालकांना समजावून सांगणं गरजेचं आहे. यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा. तुझ्या मैत्रिणीला पालकांशी बोलायची भीती वाटत असेल तर नात्यातल्या काही लोकांना याची जबाबदारी देता येईल. नात्याला असणारा विरोध ही बाब फारच नाजूक आहे. मुलीच्या पालकांचं मन वळवण्यासाठी बरीच मेहनत करावी लागेल. तुम्हाला धीर धरावा लागेल. त्यांची समजूत घालणं नक्कीच सोपं नाही.

## हंपीला जाताय, मग दोन दिवस काढाच

भटकंती

हंपी इतिहास, शिल्पकला आणि निसर्ग यांचा संगम असणारं अद्भुत स्थळ आहे. इथे सुमारे ३०० पेक्षा अधिक प्राचीन मंदिरे आहेत. पण तुमच्याकडे केवळ दोन दिवसांचा वेळ असेल तर काही निवडक ठिकाणंच प्लान करा. या स्थळांचे दर्शन तुमचा प्रवास संस्मरणीय बनवतील.



✲ **विरुपाक्ष मंदिर-** दिवसाची सुरुवात हंपीतील सर्वात प्राचीन आणि प्रसिद्ध विरुपाक्ष मंदिरापासून करा. येथे लक्ष्मी नावाची हत्तीण आहे, जी भक्तांना आशीर्वाद देते.

✲ **सास्तीवेकाळू गणेश आणि कडेलिकालू गणेश-** विरुपाक्ष मंदिराच्या जवळच दोन भव्य गणेश मूर्ती असून त्या दगडात कोरलेल्या आहेत. त्यांची शिल्पकला डोळ्यांचं पारणं फेडणारी आहे.

✲ **हंपी बाजार आणि मोनोलिथिक नंदी-** त्याच भागात तुम्ही हंपी बाजाराचे भग्नावशेष पाहू शकता. येथे एक भव्य मोनोलिथिक नंदी (बैल) आहे तो सहज लक्ष वेधून घेतो.

✲ **मातंग हिल (सनसेट पॉईंट)-** जेवणानंतर तुम्ही मातंग डोंगरावर जाऊ शकता. ही १५-२० मिनिटांची चढण आहे. येथून दिसणारा सूर्यास्त म्हणजे स्वर्गीय अनुभव आहे. येथून दिसणारं संपूर्ण हंपी सोनसळी प्रकाशात न्हालेलं पाहणं तुम्ही कधीच विसरणार नाही.

✲ **अंजनाद्री पर्वत-** दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून अंजनाद्री डोंगरावर जा. हे हनुमानाची जन्मभूमी मानला जाते. फक्त १५ मिनिटांत शिखरावर पोहोचता येतं. तिथून दिसणारा सूर्योदय अविस्मरणीय असतो.

✲ **विठ्ठल मंदिर आणि रथ-** नंतर पहा विठ्ठल मंदिर, जे हंपीचं हायलाईट आहे. इथलाच प्रसिद्ध रथ आपल्या ५० रुपयांच्या नोटेवर आहे. मंदिर परिसर विस्तृत आणि सौंदर्यपूर्ण आहे.

✲ **रॉयल सेंटर-** विठ्ठल मंदिराजवळच रॉयल सेंटर असून तिथे राजा वास्तव करत होता. येथे पुष्करणी, म्युटनामी डिब्बा, यासारखी महत्त्वाची ठिकाणं आहेत.

✲ **बडविलिंग आणि उग्र नरसिंह-** पुढे भेट द्या बडविलिंग (शिवलिंग) आणि उग्र नरसिंह मूर्तीला. या दोन्ही अतिशय देखण्या आणि प्रभावी शिल्पकृती आहेत.

✲ **कृष्ण मंदिर-** अतिशय शांत आणि वास्तुशिल्पाने समृद्ध असलेलं हे मंदिर तुम्हाला नक्की आवडेल. इतिहासप्रेमींसाठी ही एक पर्वणी आहे.

✲ **अच्युतराया मंदिर व हेमाकुट डोंगर-** संध्याकाळी जा अच्युतराया मंदिर बघायला. येथे पर्यटकांची गर्दी कमी असते. त्यामुळे शांत वातावरणात मंदिर आणि आजूबाजूचा परिसर अनुभवता येतो. हवं असल्यास येथे एखादी बुलॉक कार्ट राइडसुद्धा करता येते.

## फॅशनविश्वाची वेधक वाट

करिअर

फॅशनच्या दुनियेत करिअर करायचं असेल तर योग्य कॉलेज आणि कोर्स निवडणं गरजेचं आहे. ग्लॅमर, क्रिएटिव्हिटीसोबतच या क्षेत्रात उत्तम संधी आहेत. इथं डिग्री मिळताच उत्तम प्लेसमेंटची शक्यता असते. फॅशनविश्वामध्ये यश मिळवण्यासाठी केवळ कौशल्यच नव्हे, तर योग्य शैक्षणिक आधारही आवश्यक असतो. ही महाविद्यालयं केवळ सर्जनशील कल्पनाच वाढवत नाहीत तर व्यावहारिक ज्ञान आणि उद्योग एक्सपोजरदेखील देतात. यामुळेच या कॉलेजांमधून पदवी मिळविणाऱ्या उमेदवारांना नोकरीच्या उत्तम संधी मिळतात. आज अशाच काही शिक्षणसंस्थांची माहिती घेऊ या.



**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (निफ्ट)**

'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' (निफ्ट) ही भारतातील या क्षेत्राशी संबंधित सर्वात प्रतिष्ठेची संस्था आहे. तिचे देशभरात १८ कॅम्पस असून येथे बॅचलर ऑफ डिझाइन (बी.डी.एस.), मास्टर ऑफ डिझाइन (एम.डी.एस.) आणि फॅशन मॅनेजमेंटसारखे नानाविध अभ्यासक्रम राबवले जातात. या कॉलेजची फी वर्षाला सुमारे तीन ते सहा लाख रुपये असून निफ्ट प्रवेश परीक्षेच्या आधारे येथे प्रवेश दिला जातो.

**एमिटी स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी**

'एमिटी स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' हा एमिटी विद्यापीठाचा एक भाग असून तिथे 'फॅशन डिझाइन' आणि 'फॅशन टेक्नॉलॉजी'चे अभ्यासक्रम राबवले जातात. येथे विद्यार्थ्यांना थिअरी आणि प्रॅक्टिकल या दोन्हीमध्ये प्रावीण्य दिले जाते. या संस्थेची फी वर्षाला सुमारे तीन ते सहा लाख रुपये असून निवड प्रक्रियेत गुणवत्ता आणि मुलाखतीचा समावेश आहे.

**पर्ल अकादमी**

'पर्ल अकादमी' ही एक अग्रगण्य खासगी फॅशन संस्था असून तिथे फॅशन डिझाइन, कम्युनिकेशन डिझाइन आणि स्टायलिंग यासारखे अभ्यासक्रम आहेत. इथे इंडस्ट्री एक्सपोजर आणि एक्स्पर्ट ट्रेनरच्या मदतीने विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल नॉलेज मिळते. दरवर्षी सुमारे चार ते आठ लाख रुपये शुल्कदर असून प्रवेश परीक्षा आणि मुलाखतीच्या माध्यमातून येथे प्रवेश दिला जातो.

या टॉप महाविद्यालयांमध्ये फॅशनशी संबंधित अभ्यासक्रमांचा कालावधी तीन-चार वर्षे (अंडरग्रॅज्युएट) आणि दोन वर्ष (पदव्युत्तर) असा असतो. महाविद्यालयानुसार शुल्काची रेंज वेगवेगळी असते; पण अभ्यासात केलेली ही गुंतवणूक करिअरचा भक्कम पाया रचण्यास मदत करते. पदवी पूर्ण होताच मोठमोठ्या आस्थापनांमध्ये काम करण्याची संधी मिळते. कॉलेजांमध्ये प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पडते. संस्थांच्या अधिकृत संकेतस्थळावर सविस्तर माहिती, अर्ज फॉर्म आणि शुल्करचनेशी संबंधित तपशील उपलब्ध आहेत. तुम्ही थेट या गोष्टी पाहू शकतात.




■ **नागपूर :** *दिवाळी सणाचा आनंद सर्व भारतवासी लुटत असताना नागपूर येथे काही सामाजिक संघटनांनी एकत्र येत अमर जवान स्मारक येथे सोमवारी सायकांळी शेकडो दीप प्रज्वलीत करून देशासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीर जवानांच्या स्मृतींना अभिवादन केले. या कार्यक्रमात शेकडो नागरिकांनी शहीद स्मारकासमोर नतमस्तक होत अभिवादन केले.*

# शैक्षणिक मनुवादामुळे युवकाचे करिअर उध्वस्त

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २० :**



पुण्यातील प्रतिष्ठित मॉडर्न कॉलेजमध्ये दलित तरुणावर अन्याय झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, यामध्ये भाजपशी संबंधित प्राध्यापकांवर गंभीर आरोप झाले आहेत. प्रेम बिऱ्हाडे या दलित विद्यार्थ्याचे करिअर एका चुकीच्या वागणुकीमुळे उद्धवस्त झाले असून, यामागे जातीय मानसिकतेचा गंध असल्याचे आरोप होत आहेत.

यावर विजय वडेट्टीवार यांनीही भाष्य केले असून, ही घटना केवळ एका व्यक्तीच्या आयुष्यावर परिणाम करणारी नसून, संपूर्ण समाजातील दलित, शोषित आणि वंचित वर्गाच्या तरुणांवर अन्याय करणारी आहे.

जातीय अहंकारातून प्रेरित झालेली ही मनुवादी मानसिकता अजूनही शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत असल्याचे ते म्हणाले. ही घटना केवळ एका व्यक्तीच्या आयुष्यावर परिणाम करणारी नसून, संपूर्ण समाजातील दलित, शोषित आणि वंचित वर्गाच्या तरुणांवर अन्याय करणारी आहे. जातीय अहंकारातून प्रेरित झालेली ही मनुवादी मानसिकता अजूनही शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत आहे, हे वास्तव यामुळे समोर आले आहे.

या घटनेविरोधात समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी या प्रकाराचा निषेध केला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यावर एक्स (ट्विट) करत भाजपवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, आजही शिक्षण संस्थांमध्ये जात पाहून वागणूक मिळत असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष व्यर्थ ठरतो. हा अन्याय सहन केला जाणार नाही. प्रेम बिऱ्हाडेच्या भविष्याचे काय होणार? त्याचे नुकसान भरून कसे निघणार? या प्रश्नांची उत्तरं सत्ताधाऱ्यांनी द्यावी, अशी मागणी होत आहे.

ही घटना संपूर्ण व्यवस्थेच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असून, देशातील शैक्षणिक क्षेत्रात असलेला जातीयवाद संपवण्यासाठी कडक उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित करते. जात, धर्म किंवा राजकीय ओळखीच्या आधारे विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असेल, तर अशा व्यवस्थेचा विरोध करण्याची वेळ आली आहे, अशी भावना युवकांमध्ये निर्माण झाली आहे.

# सत्य मांडणाऱ्यांवर अर्बन नक्षलवादाचा ठप्पा

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २० :**



राज्यातील पोलिसांनाच राजकीय प्रशिक्षण देऊन कायदा व सुव्यवस्थेची यंत्रणा भेदभावपूर्ण राबविली जात आहे. सत्य मांडणाऱ्यांवर अर्बन नक्षलवादी असा ठप्पा लावला जातोय. ही बाब लोकशाहीसाठी अत्यंत भयावह आहे, असे स्पष्ट मत विधीज्ञ अँड. असीम सरोदे यांनी मांडले.

यवतमाळात येथे आयोजित औपचारिक वातार्लापादरम्यान ते बोलत होते. कायदा व सुव्यवस्थेची यंत्रणाच भेदभावपूर्ण वागत असल्याचे सरोदे म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गृह खात्याचे प्रमुख आहे. मात्र, त्यांनी आता पोलिसांना राजकीय प्रशिक्षण देऊन सत्तेचा दुरुपयोग चालविला आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणांवर बोलणाऱ्यांचा आवाज दाबायचा, हा प्रकार राज्यात सर्वत्र सुरु असल्याचा आरोप केला. न्यायालयात सरकारविरुध्द लढणाऱ्या वकिलांना सुध्दा अर्बन नक्षलवादी ठरविण्याचे प्रकार सुरु आहे, असे ते म्हणाले.

आज वकिलांमध्येही दोन गट पडले आहे. एक गट कायदा आहे जसा तसा सांगणारा असून, दुसरा गट मात्र, पंतप्रधान मोदींना आवडणारा कायदा सांगतो. त्यांच्या पध्दतीने कायद्याचे अर्थ लावले जात आहे. अलीकडे तर न्यायालयामध्येही विशिष्ट विचारधारेची माणसे बसविली जात असल्याचा गंभीर आरोप सरोदे यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयानेही वायू प्रदूषणासह ध्वनी प्रदूषणाबाबत कठोर निर्देश दिले. मात्र, मोठा आवाज ऐकण्याची आम्हाला सवय पडली आहे. एकंदरीत समाजाच्या वाट्याला आलेला हा बहिरेपणा अत्यंत घातक असल्याचेही ते म्हणाले. धार्मिक अस्मितेचा मुलामा चढवून सत्याला दडपण्याचा प्रकार वर्तमान सत्ताधाऱ्यांकडून चालविला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

देशात सर्वत्र अंबानी व अदाणी या उद्योगपतींना जमिनी दिल्या जात आहे. त्याविरुध्द लढणाऱ्यांना अर्बन नक्षलवादी ठरविले जात आहे. सोनम वांगचूक यांच्या प्रकरणात त्यांच्या वकिलांना अटकेसंदभार्तील कारणेसुध्दा दिली जात नसल्याने, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचेही ते म्हणाले.

# तर एकाला कापायला काय हरकत?

## बच्चू कडूंचे आमदारांबद्दल वादग्रस्त विधान

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. १९ :**



बच्चू कडू यांनी बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा गावात राज्यव्यापी शेतकरी हक्क परिषदेमध्ये आमदारांबद्दल मोठे विधान केले.

त्यांनी थेट म्हटले की, तुम्ही स्वतः आत्महत्या करण्यापेक्षा एखाद्या आमदाराला कापून टाका. बच्चू कडूंच्या विधानावर टीका होत असतानाच त्यांनी आता पुन्हा एकदा यावर भाष्य केले.

रोज जर १२ ते १३ शेतकरी आत्महत्या करत असतील आणि सरकार जागे होत नसेल तर एकाला कापायला काय हरकत आहे? शेतकऱ्यांना तीन हजार रुपयांनी सोयाबीन विकायला लागत आहे, अजूनही एकही खरेदी केंद्र सुरू नाही, देवा भाऊने हमीभावाच्या २०% बोनस देऊ असं सांगितलं होतं पण हमीभाव सुद्धा मिळणार नाही.

सध्या बच्चू कडू हे राज्यभर दौरा करीत आहेत. शेतकरी हक्क परिषदेत बोलताना त्यांनी हे वादग्रस्त वक्तव्य केले आहे. बच्चू कडू म्हणाले, शेतकऱ्यांवर सातत्याने अन्याय होत असताना गप्प आहेत. जाती-पातीच्या राजकारणात शेतकरी अडकून पडले आहेत. ते अन्यायाच्या विरोधात पेटून उठत नाहीत. तुमच्यापेक्षा तुमचा बैल बरा, त्याला लाथ तरी मारता येते. आपण जर शेतकऱ्याला विचारले तर तू काय करतो, तर त्याला काहीच येत नाही. अरे आत्महत्या करण्यापेक्षा एखाद्या आमदाराला कापून टाका. हा कार्यक्रम जर सुरू केला, तर सरकार गुडघ्यावर येईल.

पण हा कार्यक्रम कोणाला द्यायचा. मारण्यापेक्षा लढणे सुरू करा. आमच्या मालाला भाव मिळाला तर आम्ही लोकांना नोकरीला ठेवू. आरक्षणामुळे एखादी परिवार किंवा समाज सुखी होऊ शकतो, मात्र मालाला भाव मिळाला तर अख्खे गाव सुखी होऊ शकेल, असेही बच्चू कडू म्हणाले.

# मुलांमधील पोटाचा फ्लू आजार आणि उपचार



लोकारोग्य

बदलत्या ऋतूनुसार वातावरणात आणि हवामानात बदल होतोच. अर्थातच या बदलत्या वातावरणामुळे अनेक प्रकारच्या विषाणूजन्य, जिवाणूजन्य आणि बुरशीजन्य आजाराची लागण होते आणि हा आजार जर संसर्गजन्य असेल तर तो झपाट्याने पसरतो.

सध्या बालकांमध्ये पोटातील फ्लूचा आजार आणि त्याअनुषंगाने श्वसनाचे आजार लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. या फ्लू ची लक्षण नेमकी काय असतात? फ्लू होऊ नये म्हणून काळजी काय घ्यावी? आणि या आजारावर उपचार काय करायचे? या संधर्भात श्वसनविकारतज्ञ डॉ. छाया वजा यांच्याशी साधलेला संवाद.

**हिवाळ्यात वातावरणात बदल होतो सध्या तापमान प्रचंड कमी आहे या वातावरणात विशेषतः बालकांना कोणते आजार होतात?**

■ प्रौढा प्रमाणेच हिवाळ्याचा लहान बालकांवर खूप परिणाम होतो. लहान मुलांमध्ये हिवाळ्यात पोटाचा फ्लू हा आजार बळावताना दिसतोय. त्याच वेळी सर्दी, खोकला आणि श्वसनविकार देखील वाढतात. कमी तापमानामुळे तीव्र स्वरूपाचा ब्रॉक्रायटयसिस आणि न्यूमोनिया देखील काही मुलांमध्ये दिसतो.

हवामानातील बदलामुळे ज्या मुलांची प्रतिकारशक्ती कमी असते अशा मुलांना दमा,ब्रॉक्रायटसीस सारखे दीर्घकालीन आजार देखील होतात. थंड वातावरणामुळे बालक विषाणूंच्या संपर्कात आल्याने गॅस्ट्रो इंटेरी संधर्भात आजाराची लागण बालकांना लगेच होते.

**बालकांमध्ये पोटाचा फ्लू हा आजार दिसतो त्याची लक्षण काय असतात?**

■ लहान मुलांमध्ये प्रचंड प्रमाणात डोकेदुखी, अंगदुखी, अँसिडिटी यासारख्या लक्षणासह तीव्र स्वरूपाचा ताप असेल तर हा ताप अजिबात अंगावर काढू नये. मुलांना तीन दिवसापेक्षा अधिक काळ जर ताप असेल तर ताबडतोप कोरोना चाचणी करून घेणे गरजेचे आहे. मुलांच्या शरीरात पाणायचे प्रमाण कमी झाल्याने त्यांना उलट्या आणि जुलाब होतात आणि प्रतिकार शक्ती देखील कमी होते. मुलांना पोटात दुखणे,भूक न लागणे अशी लक्षण देखील दिसतात.

**अशा प्रकारच्या विषाणूजन्य आजारापासून मुलांना दूर ठेवण्यासाठी काय काळजी घ्यावी?**

■ मुलांना संसगार्पासून वाचविण्यासाठी पालकांनी त्यांना गर्दीच्या ठिकाणी किंवा मोकळ्या ठिकाणी नेऊ नये .अस्वच्छ अन्न,शिळे अन्न आणि पाणी मुलांना देऊ नये. आजारी मुलांना शाळेत पाठवू नये.जेवणापूर्वी मुलांना हात साबणाने स्वच्छ धुवायला सांगावेत. मुलांच्या आहारात खिचडी,पालेभाजा आणि ताजा फळांचा समावेश करावा आणि साधा ताप किंवा खोकला असेल तर ताबडतोप वैद्यकीय सल्ला घ्यावा.

**पोटाचा फ्लू या आजारावर वैद्यकीय उपचार कोणते आहेत?**

■ जर मुलाला ताप असेल तर सुरवातीला तापावर प्रतिबंधात्मक उपचार म्हणून क्रोसीन गोळी दिली जाते. मात्र,हा ताप तीन दिवसापेक्षा जास्त काळ असेल आणि मुलाला डोकेदुखी, अंगदुखी, उलट्या, जुलाब अशी लक्षण दिसत असतील तर ताबडतोप वैद्यकीय उपचार सुरु करावेत.

मुलाच्या शरीरातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी त्याला व्हायटल झेड पावडर पाण्यातून दर तासाने द्यावी. मुलाला ताजा आणि सकस आहार द्यावा आणि जर परिस्थिती गंभीर असेल तर मुलाला ताबडतोप इस्पितळात दाखल करून पुढील उपचार सूर करावेत. ■ ■

# केअर हॉस्पिटल्सचे टेक महिंद्रासोबत भागीदारीत २४७७ पेशंट कॉल सेंटर सुरू



भारतातील आघाडीच्या आरोग्य सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या केअर हॉस्पिटल्सने जागतिक तंत्रज्ञान सेवा कंपनी टेक महिंद्रासोबत भागीदारीत विकसित केलेल्या त्यांच्या नवीन अत्याधुनिक २४७७ बहुभाषिक कॉल सेंटरच्या लाँचची घोषणा केली.

रुग्णांची उपलब्धता सुधारण्यासाठी, सेवा मानके मजबूत करण्यासाठी आणि व्यापक, किफायतशीर आणि सुलभ दर्जेदार आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या केअरच्या मुख्य नीतिमत्तेला पाठिंबा देण्यासाठी ही सुविधा डिझाइन केली गेली आहे. या लाँच कार्यक्रमाला शलभ डांग, मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी; विनोद रमण, गट मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, आयटी (क्यूसीआयएल); विजय सेठी, मुख्य आदरातिथ्य आणि रुग्ण अनुभव अधिकारी; राजीव चौरे, उपाध्यक्ष गुणवत्ता आणि मान्यता; नामपल्ली येथील एचसीओओ शशिकांत आग्सरे, स्ट्रॅटेजी अँड न्यू इनिशिएटिव्हज प्रमुख नवीन नारायणन आणि कॉल सेंटर ऑपरेशन्स प्रमुख सुश्री सिमरन कौर सेठी. टेक महिंद्राचे प्रतिनिधित्व करताना संजय घुरा, उपाध्यक्ष ऑपरेशन्स; कृष्णन कविक्कल, सहयोगी उपाध्यक्ष ऑपरेशन्स; श्री. कार्तिक, प्रादेशिक प्रकल्प प्रमुख; आणि व्यवसाय विकास आणि संक्रमण संघांचे सदस्य उपस्थित होते.

टेक महिंद्राशी भागीदारी केल्याने प्रगत ग्राहक संबंध व्यवस्थापन प्रणाली, अखंड रिअल-टाइम अपॉइंटमेंट वेळापत्रक आणि प्रशिक्षित कॉल सेंटर व्यावसायिक येतील. या संयोजनामुळे सर्व केअर रुग्णालयांमध्ये जलद प्रतिसाद वेळ, रुग्णांच्या विनंत्यांची कार्यक्षम हाताळणी आणि सातत्यपूर्ण, रुग्ण-प्रथम अनुभव मिळण्याची अपेक्षा आहे.

■ ■ ■

# गुणकारी जर्दाळू



जर्दाळू, त्यांची मखमली त्वचा आणि गोड, किंचित तिखट चव असलेले, हे केवळ एक स्वादिष्ट फळ नाही तर ते पोषक तत्वांचे पॉवरहाऊस देखील आहे. जर्दाळूमध्ये कॅलरीज कमी असतात परंतु फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे जास्त असतात. त्यामध्ये विविध प्रकारचे अँटिऑक्सिडंट असतात आणि ते व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि लोहाचे उत्कृष्ट स्त्रोत आहेत.

वाळलेल्या जर्दाळू हे ताज्या जर्दाळूचे एक केंद्रित स्वरूप आहे आणि त्यामध्ये काही पोषक घटक जास्त प्रमाणात असतात. कोरडे केल्याने व्हिटॅमिन सीचे प्रमाण कमी होते, ते खनिजे आणि फायबरचे प्रमाण वाढवू शकते. तथापि, काही व्यावसायिकरित्या उपलब्ध असलेल्या वाळलेल्या जर्दाळूमध्ये जोडलेल्या साखरेकडे लक्ष देणे देखील महत्त्वाचे आहे, ज्यामुळे त्यांचे आरोग्य फायदे कमी होऊ शकतात.

जर्दाळू विविध प्रकारचे आरोग्य फायदे देतात जे तुमचे एकंदर कल्याण वाढवू शकतात. जर्दाळूमध्ये व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते, जे चांगली दृष्टी राखण्यासाठी आवश्यक असते.

बीटा-कॅरोटीन हे एक अँटिऑक्सिडेंट आहे जे डोळ्यांना मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करण्यास मदत करते आणि वयोमानाशी संबंधित मॅक्युलर डिजनरेशनचा धोका कमी करू शकते, जे वृद्ध प्रौढांमध्ये अंधत्वाचे प्रमुख कारण आहे. जर्दाळूच्या बियापासून काढलेले जर्दाळू तेल बहुतेक वेळा त्याच्या हायड्रेटिंग गुणधर्मासाठी स्किनकेअर उत्पादनांमध्ये वापरले जाते. व्हिटॅमिन ई आणि के समृद्ध, जर्दाळू कर्नल तेल त्वचेचे पोषण आणि मॉइश्चरायझेशन करण्यास मदत करते, निरोगी चमक वाढवते.

जर्दाळूमध्ये आढळणारे अँटिऑक्सिडंट्स त्वचेला पर्यावरणाच्या हानीपासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मनसेची नितेश राणेवर सडकून टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका करून नंतर त्यांचीच चड्डी घालणे हे नीतेश राणे यांना चांगले जमते, अशा शब्दांत मनसेने मंत्री नीतेश राणे यांनी राज ठाकरे यांच्यावर केलेली टीका फेटाळून लावली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. राज्य निवडणूक आयोगाने एकीकडे या निवडणुकांची जोरदार तयारी सुरू केली आहे, पम विरोधकांनी मतदारयाद्या स्वच्छ होईपर्यंत या निवडणुका न घेण्याची भूमिका घेतली आहे. त्यातच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मतदारयाद्यांत तब्बल ९६ लाख खोटे मतदार घुसवण्यात आल्याचा आरोप केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

भाजप नेते तथा मंत्री नीतेश राणे यांनी या प्रकरणी राज ठाकरे यांच्या भूमिकेचा समाचार घेत त्यांना मुस्लिम मोहल्ल्यात जाऊन मतदारयाद्या तपासण्याचे आव्हान दिले आहे. या पार्श्वभूमीवर मनसेने त्यांच्या टीकेचा समाचार घेतला आहे.

मनसेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे याविषयी बोलताना म्हणाले की, हा नीतेश राणे यांच्या मेंदूचा किंवा भाजपचा प्रॉब्लेम आहे. हिंदू मतदार, मुस्लिम मतदार असा भेद नीतेश राणे यांच्याच डोक्यात येऊ शकतो. आम्हाला फक्त बोगस मतदार कळतात. नीतेश राणे उचलली जीभ व लावली टाळ्याला असे करतात. मी त्यांना आचार्य अत्रेंचे पुस्तक पाठवीन, मग त्यांना रेफरन्स लागेल. राज ठाकरे हे दुसऱ्यांच्या नव्हे तर स्वतःच्या विचारांनी चालतात, असे देशपांडे म्हणाले.

# मुंबई, पुणे नागपूरसह प्रमुख शहरे प्रदूषणाच्या विळख्यात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :**

वाऱ्यांची बदललेली स्थिती, आर्द्रता, सुरू असलेली बांधकामे, प्रकल्प आणि दिवाळीनिमित्त उडवले जाणारे फटाके यामुळे मुंबई, पुणे, नागपूरसह राज्यातील प्रमुख शहरांना प्रदूषणाने विळखा घालण्यास सुरुवात केली. मुंबई आणि नागपूरच्या हवेचा दर्जा मध्यम श्रेणीत नोंदला गेला.



पाठोपाठ पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात वाढत्या वायु प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ता अति खराब नोंदवण्यात आली. प्रदूषणात भर पडत असताना, तापमानाचा पाराही ३५ अंशापार गेल्याने दिवाळीत गुलाबी थंडीची आस धरून बसलेल्या नागरिकांचा हिरमोड झाला आहे.

मुंबईतील हवेचा दर्जा रविवारी सकाळी मध्यम श्रेणीत नोंदला गेला. वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथे सकाळी अतिवाईट हवेची नोंद झाली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, पुणे परिसरातील हवा गुणवत्ता निदेशांक दुपारी ३०५ वर पोहोचला. वाकडमधील भूमकर चौकात ही नोंद करण्यात आली.

नागपूर शहरातील हवा गुणवत्ता निर्देशांक १०० च्याही आत असतो. परंतु रविवारी नागपूरचा हवा गुणवत्ता निर्देशांक २०० च्या वर नोंदला गेला. पुढील काही दिवस दिवाळीतील फटाक्यांच्या आतषबाजीमुळे हवेची गुणवत्ता आणखी घसरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पावसाळ्यानंतर वाऱ्यांची स्थिती बदलते, वेग मंदावतो. त्यामुळे हवेत साचलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही.

बाष्पामुळे धुलीकण हवेतच तरंगत राहतात. या नैसर्गिक कारणांबरोबच अनेक मानवनिर्मित कारणेही शहरांच्या प्रदूषणात भर घालत आहेत. पायाभूत सुविधा, रहिवासी व व्यावसायिक संकुल, नवे प्रकल्प यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून, त्यातून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून नोंदवण्यात आले.

वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरांमध्ये अतिसूक्ष्म काजळीसारखे कण एकत्र येऊन शहरे धुरकट करण्यास कारणीभूत ठरत आहेत.




■ **नागपूर :** *दिवाळीच्या सणाचा उत्साह शिगेला पोहचला असून, बाजारात लोकांची गर्दी मावेनाशी झाली आहे. शहराच्या महाल, सिताबर्डी, सदर, ईतवारी अशा सर्वच मार्केटमध्ये विविध प्रकारची खरेदी करण्यासाठी केवळ नागपूरकरच नाहीत तर विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून खरेदीदार येत असून, महाल भागातील हे दृष्य खरेदीदारांचा उत्साहाला आलेले उधाण दर्शवते.*

नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ मंगळवार, दि. २१, ऑक्टोबर २०२५ ■


## महाज्योतीच्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार करू : मुख्यमंत्री
# महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न आज आकारास आले आहे. येत्या काळात ही प्रशासकीय इमारत आधुनिक आणि विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त ठरणार आहे. याला आपण इतर मागासवर्ग विभागाची स्थापना केल्यामुळे गती मिळाली. या विभागाच्या माध्यमातून होतकरू नवीन पिढी आकारास येईल तसेच त्यांच्या स्वप्नांना बळ मिळून गगनभरारी घेता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



सदर येथील जिल्हा नियोजन भवन आवारात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सर्वश्री प्रवीण दटके, परिणय फुके, कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, चरणसिंग ठाकूर, आशिष देशमुख, संजय मेश्राम, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री बोलताना पुढे म्हणाले की, ओबीसी समाजाला पुढे नेण्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. यात प्रशिक्षण, स्वयंरोजगार यांचा समावेश आहे. ओबीसी समाजातील मुलांच्या उज्वल भविष्यासाठी महाज्योतीची निर्मिती केली असून याला पुरेसा निधी उपलब्ध केला आहे. आज ओबीसी मुलासाठी 60 पेक्षा जास्त वसतिगृह सुरू करण्यात आली आहेत. महाज्योतीतून प्रशिक्षण घेऊन मुले विविध स्पर्धा परिक्षेत यश संपादन करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ओबीसी समाजाची नॉन क्रिमिलिअर मर्यादा आपण आठ लाखांपर्यंत नेली आहे. ओबीसी समाजाच्या कल्याणसाठी शासन तत्पर असल्याचे ते म्हणाले.

महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाज्योती संस्थेच्या स्वतंत्र इमारतीची पायाभरणी आज झाली आहे. हा ऐतिहासिक क्षण आहे. नागपूरच्या भूमीवर आता ह्यमहाज्योतीह्नची भव्य 7 मजली प्रशासकीय इमारत तयार होणार आहे. हा केवळ वास्तूचा नव्हे तर शैक्षणिक प्रगतीचा पाया घालणारा क्षण असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

नागपूर येथील महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीत वाचनालय, समुपदेशन कक्ष, प्रशिक्षण कक्ष, भोजन कक्ष आणि 248 विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय अशा सर्व सुविधांचा समावेश असणार आहे. ही वास्तू म्हणजे शिक्षण, संस्कार आणि संशोधनाचा पवित्र संगम राहणार आहे. नाशिक येथे देखील महाज्योती संस्थेचे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी 174 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे मंत्री श्री. सावे यावेळी म्हणाले. महाज्योती संस्थेतून प्रशिक्षण घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक सत्कार व महाज्योतीच्या यशोगाथा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आला. तसेच सात मजली प्रशासकीय इमारत बांधकामाची चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी केले.

### अशी असेल सात मजली प्रशासकीय इमारत

राज्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रशिक्षण आणि संशोधनासाठी उभारली जाणाऱ्या भव्य 7 माळ्याची प्रशासकीय इमारतीचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यास (एनआयटी) मार्फत होत आहे. महाज्योतीच्या कार्यक्षमतेत आणि सेवाक्षमतेत अभूतपूर्व वाढ घडवणारा हा पायाभूत उपक्रम ठरणार आहे. या प्रशासकीय इमारतीत तळघर क्रमांक 1 व 2 मध्ये मुबलक वाहनतळाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तळमजल्यावर 500 लोकांच्या क्षमतेचे ऑडिटोरियम, अभ्यास कक्ष, नियंत्रण कक्ष आणि उपहारगृह असणार आहे. पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यांवर अधिकारी व कर्मचारी यांची बैठक व्यवस्था तसेच प्रशासकीय सभागृह असतील. तिसऱ्या मजल्यावर अभिलेख कक्ष व उपहारगृह, तर 4, 5, 6 आणि 7 व्या मजल्यांवर प्रशिक्षण कक्ष आणि बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. ही इमारत आधुनिक तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक बांधणी आणि कार्यक्षम जागा नियोजनाचा सुंदर संगम ठरणार आहे.

# बंटी शाहूने समाजालाही फसविले

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० : लोखंड चोरी आणि कोट्यवधींच्या जीएसटी चोरी प्रकरणात आरोपी बंटी उर्फ संतोष रामपाल शाहूने आतापर्यंत अनेकांची फसवणूक केली आहे. मात्र यावेळी त्याने स्वतःच्या समाजालाही सोडले नाही. शाहू समाजाच्या एका संघटनेचा अध्यक्ष असल्याची बतावणी करून बंटी आणि त्याच्या भावाने बनावट कागदपत्रांद्वारे कोट्यवधींची जमीन लाटण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार पुढे आल्यानंतर समाजात त्याच्याविरुद्ध तीव्र रोष आहे. दरम्यान सदर पोलिसांनी सोमवारी त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची एक दिवसाच्या पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

### न्यायालयाने सुनावली पोलिस कोठडी

बंटी आणि त्याचा भाऊ जयेश याने समाजाच्या शाहू समाज हेल्थ एज्युकेशन सोसायटीचे बनावट कागदपत्र तयार केले. त्यात स्वतःला अध्यक्ष तर भाऊ जयेश याला सचिव दाखविले. दोघांनीही नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र)कडे बनावट कागदपत्र सादर करून समाज मंदिराच्या नावावर मौजा चिखली (देवस्थान)च्या खसरा क्र. ६, १४/३, १०३/२ आणि १०३/४ येथील १४६३.०४ वर्ग मीटर (जवळपास १५ हजार वर्ग फुट)चा भूखंड लीजवर मागितला. त्यासाठी बनावट लेटरहेडवर कार्यकारिणी समितीच्या बनावट प्रस्तावाची प्रतही नासुप्रला दिली. सुरूवातीला त्यांनी दावा केला होता की, हे समाज मंदिर खासदार किंवा आमदार निधीतून बनणार होते, मात्र निधी नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे ते स्वतःच्या खर्चाने मंदिर बांधणार आहेत. त्यासाठी त्यांनी बनावट लेटरहेडवरून कार्यकारिणी मंडळाच्या बनावट ठरावाची प्रतही प्रन्यासला दिली. या बाबत त्यांनी सामंजस्य कराराची नोंदणीही केली. या करारनाम्यावर संस्था अध्यक्ष म्हणून बंटी शाहू तर सचिव म्हणून जयेश शाहूने स्वाक्षऱ्या केल्या. दरम्यान सुधार प्रन्यासने शाहू समाज हेल्थ एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीची धर्मदाय आयुक्तालयातून पडताळणी केली. यात अध्यक्ष म्हणून बंटी तर सचिव म्हणून जयेश या दोघांची कुठलीही नोंद प्रन्यासला आढळली नाही. या दोघांनी दिलेले लेटरहेड आणि अन्य कागदपत्रे बनावट असल्याचे आढळले. त्यावर प्रन्यासकडून मालमत्ता सचिव प्रविण डेकाटे यांनी सदर ठाण्यात फसवणुकीची तक्रार दाखल केली आणि त्याला अटक करण्यात आली.

सोमवारी पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले. सदर पोलिसांनी प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी ५ दिवसांची पोलिस कोठडी मागितली. न्यायालयाने त्याला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. बंटी शाहू अनेक वर्षांपासून अवैध धंद्यात सक्रीय आहे. जेव्हा-जेव्हा त्याच्यावर कारवाई होते तो पोलिस अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यासाठी खोट्या तक्रारी करतो. यापूर्वीही अनेकदा त्याने असे केले आहे.

# अज्ञात वाहनाने तरुणाला उडवले

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० : हिट ॲन्ड रनच्या घटनांसाठी कुप्रसिद्ध असलेल्या रामझुल्यावर रविवारी रात्री पुन्हा एक अपघाताची घटना घडली. दुचाकीने घरी जात असलेल्या तरुणाला अज्ञात वाहनाने जबर धडक दिली आणि पळून गेला. या अपघातात गंभीर जखमी तरुणाचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. राहुल प्रकाश गुरूपंच (३३) रा. व्हीएचबी कॉलनी, शांतीनगर असे मृताचे नाव आहे. रामझुल्यावर यापूर्वीही अज्ञात वाहनांनी लोकांना उडविल्याच्या घटना अनेकदा पुढे आल्या आहेत. रविवारी रात्री १.१५ वाजताच्या सुमारास राहुल त्याच्या एमएच-४९/सीएन-४४७७ क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने घरी जात होता. रामझुला पुलावरून मेयो रुग्णालयाकडे जाताना अज्ञात वाहनाच्या चालकाने त्याला जबर धडक दिली आणि पळून गेला. राहुल वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाला. रस्त्याने ये-जा करणाऱ्या लोकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. तहसील पोलिस घटनास्थळी पोहोचले. राहुलला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी राहुलचा भाऊ आशिष गुरूपंचच्या तक्रारीवरून अज्ञात वाहनाच्या चालकावर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# अनाथालय येथे भव्य प्रदर्शनाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० : श्री श्रद्धानंद पेठ अनाथालय नागपूर येथे दिवाळी निमित्य भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. अनाथलयातील मुलींनी तयार केलेल्या साहित्यामध्ये दाराचे तोरण, लटकन झुंबर, विविध प्रकारचे मातीचे दिवे, कलर फुल दिवे, मिरर पेंटींग, हॅन्ड पेंटिंग, कॉर्पोरेट पेंटींग, देवाचे वस्त्र तोरण, हाताने बनविले बॅग, वस्तूंची विक्री करण्यासाठी भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉयरेक्टर गितांजली बुट्टे यांनी सांगितले की गेल्या अनेक दिवसापासून वर्षानुवर्षे आम्ही विद्यार्थ वेगवेगळ्या सणानिमित्त प्रदर्शनीचे आयोजन करत असतो.

# ७४९ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० : वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ७४९ वाहन चालकांवर कारवाई करून १,९७,६५० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ५ प्रकरणात ५ आरोपींवर कारवाई करून ६,७०० रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये १ प्रकरणात ४ आरोपींवर कारवाई करून २,४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित.



















# जीवन विकास विद्यालयाच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत चमकदार कामगिरी



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

जीवन शिक्षण मंडळ संचालित जीवन विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या खेळाडूंनी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत एकूण नऊ पदकांची कमाई केली आहे. नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने चंद्रपूर येथे आयोजित शालेय मैदानी स्पर्धेत खेळाडूंनी गती आणि शक्तीचे प्रभावी प्रदर्शन दाखवून प्रशिक्षक उमेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली पाच सुवर्ण, दोन रजत आणि दोन कांस्य पदके मिळवली. या यशामुळे अनेक खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड निश्चित झाली आहे. स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात आदर्श तळेकर १०० मीटर धावणे मध्ये सुवर्णपदक, आर्यन अरविंद खवसे ८०० मीटर धावणे मध्ये कांस्यपदक,विजय किरण समुद्रे तिहेरी उडीत रजत पदक, विशाखा रवींद्र नागपुरे पोल व्हॉल्ट सुवर्णपदक तिहेरी उडीत कांस्यपदक १९ वर्षांखालील गटात ओमकुमार नाशिकेत दिघोरे पोल व्हॉल्ट सुवर्णपदक, आदर्श मनीराम तळेकर, नील चेतन पाटील,आर्यन अरविंद खवसे अमेय संतोष ब्राह्मणे,ओम येसन सुरे ४७४०० मीटर रिलेत सुवर्णपदक, माही राजू मेश्राम पोल व्हॉल्ट माही राजू मेश्राम सुवर्णपदक पटकाविले. आदर्श तळेकर, आर्यन खवसे, नील चेतन पाटील, अमेय संतोष ब्राह्मणे, ओम येसन सुरे, विशाखा रवींद्र नागपुरे, ओमकुमार नाशिकेत दिघोरे आणि माही राजू मेश्राम यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व वस्त्रोद्योग मंत्री श्रावण पराते, उपाध्यक्ष सुरेश झुरमुरे, सचिव प्रशांत सपाटे, सहसचिव बा. रा. बोकडे, अजय घाटे, केशव माणूसमारे, प्रकाश तोवर, नरेंद्र पटेल, मुख्याध्यापक दिनेश चुर्हे, उपमुख्याध्यापिका नलिनी कुंजलवार, उपमुख्याध्यापक सातेलवार, पर्यवेक्षक चौधरी, बंड, गवळी, जगदीश लडके आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले. क्रीडा प्रशिक्षक उमेश मोहोड यांनी सांगितले की, हे यश विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, पालकांचे सहकार्य आणि संस्थेच्या भक्कम पाठिंब्यामुळेच शक्य झाले.

## दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे सुरक्षा दलाची कडक कारवाई

# गॅस सिलिंडर आणि फटाके बाळगल्याप्रकरणी ६ जणांना अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :



नागपूर विभागातील आग्नेय मध्य रेल्वेच्या रेल्वे संरक्षण दलाचे विभागीय सुरक्षा आयुक्त श्री दीप चंद्र आर्य यांच्या नेतृत्वाखाली दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी रेल्वे संरक्षण दलाच्या मार्गदर्शनाखाली विशेष सघन तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रवाशांना ट्रेन किंवा स्टेशनवर थांबण्यास सांगितले जाईल. कॅम्पसमध्ये फटाके, गॅस सिलिंडर, ज्वलनशील आणि स्फोटक पदार्थ न बाळगण्याबाबत सतत जागरूकता. हे केले जात आहे आणि रेल्वे कायद्याच्या कलम १६४, १५३ अंतर्गत उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. १८.१०.२०२५ ते २०.१०.२०२५ दरम्यान इतवारी आणि गोंदिया रेल्वे स्थानकांवरून एकूण ०६ जणांना अटक करण्यात आली. विविध गाड्यांमध्ये बेकायदेशीरपणे गॅस सिलिंडर आणि फटाके वाहतूक करताना पकडले गेले, ज्यांच्याविरुद्ध संबंधित रेल्वे सुरक्षा दलाच्या चौक्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत - (१) ट्रेन क्र. 68806 (गोंदिया-वडसा) 18.10.2025 रोजी गोंदिया स्टेशन प्लॅटफॉर्म क्र. 02 वर डेमूच्या तपासणीदरम्यान, विशाल धाडे या व्यक्तीकडून ५२४०/- रुपये किमतीचे कापसाचे बॉम्ब जप्त करण्यात आले आणि गुन्हा क्रमांक २ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. खटला क्रमांक ३५४८/२०२५, कलम १६४, १५३ रेल्वे कायदा दाखल करण्यात आला. (२) १९.१०.२०२५ रोजी, इतवारी स्टेशनच्या मुख्य गेटवर तपासणी दरम्यान, एक व्यक्ती संतोष राऊत जुना गॅस सिलेंडर घेऊन जाताना पकडला गेला. गुन्हा क्रमांक १४८०/२०२५, कलम १६४ रेल्वे कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. (३) १९/२०.१०.२०२५ रोजी, रेल्वे स्टेशन इतवारी येथे संयुक्त तपासणी दरम्यान, तीन व्यक्ती फरीद खान, संजय रहांगडाले आणि फरदीन घनी खान यांना १५६९९/- रुपयांच्या फटाक्यांसह पकडण्यात आले. या तिघांविरुद्ध रेल्वे कायद्याच्या कलम १६४ अंतर्गत गुन्हे क्रमांक १४८२/२५, १४८३/२५ आणि १४८४/२५ दाखल करण्यात आले आहेत. गुन्हे दाखल झाले. (४) २०.१०.२०२५ रोजी, पोस्ट इन्चार्ज इतवारी यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या तपासणी दरम्यान, एका व्यक्तीला रोशन ब्रिजवानी याला ३६,५५२ रुपयांच्या फटाक्यांसह पकडण्यात आले. त्याच्यावर गुन्हा क्रमांक १४८५/२५, कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. रेल्वे कायद्याच्या कलम १६४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. याआधीही, १३.१०.२०२५ रोजी, एका व्यक्तीला गॅस सिलेंडर घेऊन जाताना पाहिले गेले होते आणि १५.१०.२०२५ रोजी आणि १७.१०.२०२५ रोजी, फटाके वाहून नेणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

रेल्वे सुरक्षा दल प्रवाशांना प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारचे फटाके, गॅस किंवा इतर कोणत्याही प्रकारचे सिगारेट बाळगू नये असे आवाहन करते. सिलिंडर किंवा इतर ज्वलनशील/स्फोटक पदार्थ आणू नका. हा दंडनीय गुन्हा आहे. जर असे काही असेल तर जर काही हालचाल आढळली तर ताबडतोब जवळच्या रेल्वे संरक्षण दलाला आणि सरकारी रेल्वे पोलिसांना किंवा रेल्वेला कळवा. १३९ या हेल्पलाइन क्रमांकावर माहिती द्या, जेणेकरून वेळेत आवश्यक ती कारवाई करता येईल आणि कोणताही अनुचित प्रकार टाळता येईल.

# शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधु माणके पाटील यांच्या उपोषणाची घेतली दखल

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :



वाडी नगर परिषद अंतर्गत मँगोकीया ब्रदर्स प्रा. ली या कंपनीने संपूर्ण वाडीत भूमिगत मल निस्सारण वाहिण्यासाठी शहराचे सर्व चांगले गुळगुळीत पक्के रस्ते खोदून खराब केले. जून -जुलै २०२५ मध्ये रस्त्यावरील खड्डयामुळे सर्व वाडीकरांना ज्या अत्यंत वाईट व तितक्याच लज्यास्पद यातना भोगाव्या लागल्या त्यामुळे शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधु माणके पाटील यांनी उपोषण करण्यासाठी अर्ज सादर केले. १४ जुलै २०२५ रोजी वाडी नगर प्रशासनाला त्यांनी लेखी कळवून वाडीला खड्डयात टाकणाऱ्या त्या मांगोकीया ब्रदर्स वर सात दिवसाच्या आत कार्यवाही करून सर्व रस्ते खड्डे मुक्त करा अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा मधु माणके पाटील यांनी दिला. २३ जुलै २०२५ रोजी पुन्हा स्मरण पत्राद्वारे आम जनतेच्या जीवघेण्या त्रासाची दखल न घेतल्यामुळे आमरण उपोषणाची तयारी सुरु केली असता मुख्याधिकाऱ्यांनी तसे न करण्याची विनंती केली. त्यावेळी शहरातील प्रतिष्ठित जाणकार व्यक्तीच्या उपस्थितीत रस्त्यावरील खड्डयाच्या साक्षीने मुख्याधिकारी व न. प. वाडीच्या प्रशासनाने वाटाघाटी करीत मँगोकीया ब्रदर्स वर कार्यवाही करण्याचे मान्य केले. तेव्हा कुठे थातूर माथुर पणे रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात झाली होती. परंतु या कायार्ने नागरीक समाधानी नसल्यामुळे दत्ता कॉम्प्लेक्स ते हरी ओम सोसायटी व रामकृष्ण सभागृहा पर्यंत २० फूट रुंद कौंक्रिट रस्ता तयार करून देण्याची मागणी त्यांनी लावून धरली. तेव्हा वाडीकरांची दिवाळी खड्डयात जाऊ नये म्हणून दत्ता कॉम्प्लेक्स पासून सत्य साई सोसायटी पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात डांबर रस्त्याच्या घोटाईसाठी रस्ता सफाई चे काम मंगळवार १४ ऑक्टोबर रोजी सुरु झाले आहे. स्त्र या कार्यात प्रशासनाला धारेवार धरण्यासाठी सर्व पक्षीय नेते व पदाधिकारी शिवसेनेचे युवासेना राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्य हर्षल काकडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अश्विन बैस,संतोष केचे, रुपेश झाडे, शैलेश थोराने पाटील, संजय जीवनकर, गौतम तिरपुडे, पंकज फलके बहुजन वंचित आघाडी दिनेश बन्सोड, भाऊराव रेवतकर, उमेश महाजन, राघोजी नागलवाडे, शंकर इखार, चंद्रशेखर येवले, मोहन ठाकरे, अमित हुसनापुरे, राजेश जिरापुरे जेम्स फ्रांसिस आदींनी सहकार्य केले.

## क्रिकेट सामन्याची खायवाडी करताना पकडले

**नागपूर** : गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर धाड टाकून क्रिकेट सट्टयाची खायवाडी करताना एकाला अटक केली. पवन सोहनलाल साकोरे (४५) रा. स्वागतनगर, भांडेवाडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून ४ मोबाइल फोन, टॅब आणि इतर साहित्य असा एकूण ४७,२०५ रुपयांचा माल जप्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास युनिट ३ चे पथक वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान ऑरेंजनगर परिसरात हनुमान मंदिरजवळील एका खोलीमध्ये इंग्लंड आणि न्युझीलॅन्ड दरम्यान सुरू असलेल्या टी-२० सामन्यावर लगवाडी-खायवाडी सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तेथे धाड टाकली असता वरील आरोपी मोबाईल फोनद्वारे ग्राहकांकडून क्रिकेट सामन्यावर सट्टयाची खायवाडी करताना सापडला. आरोपीला अटक करून ४ मोबाईल, टॅब आणि सट्टयाशी संबंधित साहित्य जप्त केले. कार्यवाहीसाठी त्याला वाठोडा पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

# महिला चोरांनी सराफाचे दागिने पळविले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

ई-रिक्षातून प्रवासादरम्यान अज्ञात महिला आरोपींनी एका सराफाच्या बॅगमधून १ लाख ४२ हजार ८०० रुपये किंमतीचे सोन्याचांदीचे दागिने चोरी केले. या प्रकरणी लकडगंज पोलिसांनी सचिन दामोदर तिडके (४४) रा. भिवापूरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. सचिन यांचे भिवापूर येथे तिडके ज्वेलर्स नावाने सराफा दुकान आहे. धनतेरसला दागिन्यांची मागणी लक्षात घेता ते सोन्याचांदीचे दागिने बनविण्यासाठी मंगळवारी इतवारीच्या सराफा बाजारात आले होते. दागिने तयार झाल्यानंतर ते त्यांनी एका प्लॅस्टिकच्या डब्यात ठेवले आणि डबा बॅगमध्ये ठेवून गावी परत जाण्यासाठी निघाले. गांधीबाग चौकातून टेलिफोन चौकात जाण्यासाठी ते एका ई-रिक्षात बसले. रिक्षात आधीच ३ महिला बसलेल्या होत्या. प्रवासादरम्यान त्या महिलांनी सचिन यांची नजर चुकवून बॅगमधील दागिन्यांचा डबा चोरी केला. टेलिफोन चौकात उतरल्यानंतर काही वेळाने बॅगकडे लक्ष गेले असता चैन उघडी दिसली. त्यांनी बॅग तपासली असता दागिन्यांचा डबा गायब होता.

## विर्दभाच्या आयुर्वेद संशोधनाला भारत सरकारचा गौरव

**नागपूर** : दत्ता मेघे आयुर्वेद मेडिकल कॉलेज येथील सहयोगी प्राध्यापक व विश्वकुंभ आयुर्वेद चिकित्सालयचे डॉ. संतोष पुसदकर यांनी आयुर्वेद शास्त्राच्या विविध शाखांवर सखोल संशोधन करून तयार केलेल्या सहा विषयांवरील मौलिक साहित्याला भारत सरकारच्या कॉपीराइट कार्यालयाकडून अधिकृत मान्यता मिळाली आहे. ही मान्यता विदभार्तील आयुर्वेद संशोधनाला राष्ट्रीय स्तरावर मिळालेली एक मोठी पावती मानली जाते. डॉ. पुसदकर यांनी संशोधित केलेले विषय आयुर्वेदातील मूलभूत सिद्धांत, रसशास्त्र आणि भैषज्य कल्पना या प्रमुख अंगांशी संबंधित असून, हे साहित्य शिक्षण, संशोधन आणि वैद्यकीय व्यवहारासाठी उपयुक्त ठरणार आहे.

# संतोष लखोटिया यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २० :



येथील माहेश्वरी समाजाचे एक प्रसिद्ध आणि कष्टाळू नेते. ते नागपूर जिल्हा माहेश्वरी सभेचे संयुक्त सचिव आहेत. त्यांनी सलग दोन वेळा कामठी कन्हान मौदा तहसील माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम केले आहे. ते सेव्ह मेरिट सेव्ह नेशन टीमचे सक्रिय सदस्य आहेत. त्यांनी या मोहिमेत त्यांच्या मुलीसाठी मुंबई उच्च न्यायालयापर्यंत खटला लढवला आहे. ते रामदेव बाबांचे कट्टर भक्त आहेत. ते लायन्स क्लब कामठी सेंट्रलचे माजी अध्यक्ष आणि सक्रिय वरिष्ठ सदस्य आहेत. ते सामाजिक संघटनांना एकत्र करण्यासाठी नेहमीच तत्पर असतात. ते शेअर बाजारातील एक प्रमुख व्यापारी आहेत आणि कामठी येथील आनंद राठी सिक्युरिटीमध्ये त्यांचे टर्मिनल आहे. त्यांचा आवाज खुप गोड आहे, चेहरा हसरा आहे आणि मन शांत आहे. त्यांच्याकडे प्रेम, आपुलकीचे हृदय आहे, आणि सर्वांना आधार देतात. ते अत्यंत मैत्रीपूर्ण, आनंदी, नम्र आणि सेवाभावी आहेत. कामठीचे रहिवासी श्री संतोषजी लखोटिया यांना आज नागपूर जिल्हा माहेश्वरी सभेकडून वाढदिवसानिमित्त खूप खूप अभिनंदन, अभिनंदन आणि शुभेच्छा.

# वंचित बहुजन आघाडी कामठी शहर पक्ष कार्यालयाचे उद्घाटन समारंभ

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २० :

रविवार ला दुपारी ३ :३० वा. कामठी शहर येथिल भिमनगर रमानगर रोड डॉ.संजय सेंदरे यांच्या दवाखानाचे बिल्डिंग मध्ये वंचित बहुजन आघाडी कामठी शहर शाखा कार्यालयाचे उद्घाटन प्रशांत नगरकर पुर्व विदर्भ संयोजक वं ब.आ. यांच्या हस्ते आणि अजय सहारे अध्यक्ष नागपूर जिल्हा वं.ब.आ. यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला

या कार्यक्रमात याप्रसंगी सुरेन्द्र यादव यांच्या सह त्यांचे इतर सहकारी यांनी वंचित बहुजन आघाडी मध्ये पक्ष प्रवेश केला.

सदर प्रसंगी येत्या नगरपरिषद निवडणूक संबंधी चर्चा करण्यात आली वरील कार्यक्रमाला प्रमोद (दादाभाऊ) कांबळे जिल्हा उपाध्यक्ष नागपूर ग्रामीण, सि.सि.वासे जिल्हा महासचिव, राजेश ढोके महासचिव, नरेश वाघमारे माजी,जगदीश रंगारी कामठी तालुका अध्यक्ष, विदेश डोंगरे तालुका महासचिव, दिपक वासनिक कामठी शहर अध्यक्ष,नयन जामगडे बिडगाव अध्यक्ष, डॉ. संजय शेंदरे, शकिलभाई अंसारी, नितेश नागदेवे, अजय मेश्राम, मोहलता मेश्राम, सरोज



गजभिये, राजेश ढोके, भाऊराव मेश्राम, रवि वानखेडे, सुदेश सोमकुंवर सदानंद शेंडे (बिडगाव) अनिकेत वासनिक व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिक्षिकेचे २.४१ लाखांचे दागिने लंपास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात आरोपीने एका शिक्षिकेचे २ लाख ४१ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही घटना नागपूर मध्यवर्ती बसस्थानकावर घडली. या घटनेने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी नेहा सजल विश्वकर्मा (४०) रा. संकल्पनगर, भंडाराच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे. नेहा ह्या संभाजीनगरच्या स्माईलपुरा येथील एका शाळेत शिक्षिका आहेत. दिवाळी साजरी करण्यासाठी त्या भंडारा येथील घरी जात होत्या. शनिवारी सकाळी ८.४५ वाजताच्या सुमारास त्या एसटी बसने नागपूर बसस्थानकावर आल्या. तेथून भंडाराच्या बसमध्ये चढत असताना अज्ञात आरोपीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या हॅण्डबॅगची चैन उघडून त्यातील दागिन्यांची डब्बी लंपास केली.

# दिवाळी आणि छठ सणानिमित्त प्रवाशांना दिलासा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

दिवाळी आणि छठ सणानिमित्त प्रवाशांना दिलासा देणार आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभाग स्टेशनची वाढती संख्या लक्षात घेता, विभागातील सर्व प्रमुख स्टेशनवर जसे की नेताजी सुभाष चंद्र बोस इतवारी, गोंदिया डोंगरगड आणि राजनांदगाव स्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष होल्डिंग प्रवाशांच्या सोयीसाठी आणि गर्दी व्यवस्थापनासाठी रेल्वे प्रशासनाने हे क्षेत्र तयार केले आहेत. स्थानकांवर सर्व आवश्यक सुविधा आणि व्यवस्था सुनिश्चित करण्यात आल्या आहेत. होल्डिंग एरियामध्ये प्रवाशांसाठी पुरेशी बसण्याची व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, जेवणाची व्यवस्था. सुविधा, आणि ट्रेनच्या आगमन आणि प्रस्थानांची रिअल-टाइम माहिती. तिकीट काउंटर, माहिती कियोस्क आणि घोषणा प्रणालींद्वारे सतत आवश्यक माहिती पुरवली जाते. माहिती दिली जात आहे. गर्दी व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक स्थानकावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, रेल्वे संरक्षण दल रेल्वे सुरक्षा कर्मचाऱ्यांनी स्थानक परिसरात गस्त वाढवली आहे. सणांच्या काळात प्रवाशांना सुरक्षा पुरवावी.कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून, सर्व विभागीय नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी २४ तास उपस्थित असतात. आम्ही परिस्थितीवर सक्रियपणे लक्ष ठेवून आहोत. स्टेशन परिसराची स्वच्छता, सुरक्षा आणि सुव्यवस्था यावर विशेष लक्ष दिले जात आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता आणि वरिष्ठ विभागीय व्यावसायिक यांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व तयारी व्यवस्थापक दिलीप सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# ऐतिहासिक किल्ले बांधणी स्पर्धा : ओल्या मातीत रमले शालेय चिमुकले

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :



छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील जाज्वल्य वारशाचे प्रतीक असलेल्या ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा स्थळांचा दर्जा प्राप्त झाला आहे. या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अभिमानाचा गौरव जपत, नव्या पिढीपर्यंत किल्ल्यांचा वारसा पोहोचविण्यासाठी नगरपरिषद वाडी यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक किल्ले बांधणी स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेला वाडीतील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दत्तवाडी येथील क्रीडा मैदानावर सकाळी ७ वाजता मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे, उपमुख्याधिकारी गौरव गाडगे आणि दिनेश बुधे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा शुभारंभ झाला. स्पर्धेत ग्यान विद्या मंदिर, विमलताई तिडके विद्यालय, इंदिरा गांधी लोअर इंग्लिश स्कूल, प्रबोधनकार ठाकरे प्राथमिक शाळा, सुयोग्य ट्युशन क्लासेस, ब्लु बेल्स कॉन्व्हेंट व हायस्कूल या संस्थांतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन ओल्या मातीपासून सुंदर किल्ल्यांची बांधणी केली. मातीचे किल्ले, रंगरंगोटी आणि कल्पकतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट हस्तकलेचे प्रदर्शन सादर केले.

दैनंदिन अभ्यासाचा ताण आणि मोबाईलच्या सवयीपासून मुलांना थोडी मुक्ती मिळावी, तसेच त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा या हेतूने मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

स्पर्धेतील कलाकृतींचे परीक्षण कल्पना सगदेव, नरेशकुमार चव्हाण, सुनील अबचार,अभिजीत येडवे यांनी केले. या दरम्यान सतीश जिंदल, माजी उपनगराध्यक्ष नरेश चरडे, माजी नगरसेविका कल्पना सगदेव, माजी नगरसेवक राकेश मिश्रा, मानसिंग ठाकूर,सुरेश फलके, संजय जीवनकर, किशोर विधळे अजय तायवडे यांनी भेट देऊन आयोजक व स्पर्धकांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वच्छता अभियंता सुषमा भालेकर, स्वच्छता निरीक्षक धनंजय गोतमारे, मुकेश महातो, शहर समन्वयक आशिष गुंडुकवार व सर्व नगरपरिषद कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. वाडी नगरपरिषदच्या हौशी अधिकाऱ्यांनीही आपल्या हस्तकलेद्वारे स्पर्धेत रंगत आणली. स्पर्धेतील उत्कृष्ट किल्ल्यांना विशेष कार्यक्रमात तीन प्रमुख आणि प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येणार आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची आढावा बैठक



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १९ :

दि. १९ ऑक्टोबर ला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रामटेक तालुकाच्या वतीने दीप होटल रामटेक येथे नागपूर जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे यांच्या अध्यक्षतेखाली व नागपूर जिल्हा उपाध्यक्ष खेमराज कोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत रामटेक तालुका कार्यकारणी आढावा बैठक घेण्यात आली.

याप्रसंगी रामटेक तालुका अध्यक्ष मनीष भाऊ खोब्रागडे, महिला पदाधिकारी अलका बघेल, शीला मोहोड, वीणा वंजारी, भारती गजभिये, दीपक सहारे, रवींद्र मेश्राम, मुकेश मेश्राम, प्रेमानंद गजघाटे, आभास कळंबे, अनिकेत कराडे, अमर सहारे, भगवान कावळे, नेहान धमगाये, अतुल गजभिये, हेमंत जगदल, अनिकेत खोटे, भीमा खोब्रागडे व शेकडोच्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठक प्रमुख्याने जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, नगरपंचायत निवडणुकी संबंधी घेण्यात आली व शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला.

या सर्वांचा मान सन्मान ठेवून त्यांना प्रथम प्राधान्य देऊन येणाऱ्या निवडणुकीमध्ये त्यांचा मोठा सहभाग ठेवावा अशी सूचना जिल्हाध्यक्षांकडून सर्वांना देण्यात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सम्पूर्ण ताकतीन निवडणुकीला समोर जात आहे.

# गृहोपयोगी साहित्य निर्मितीने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवर फुलला आनंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

घरोघरी दिवाळीत लावण्यात येणाऱ्या रंगबिरंगी आकाश कंदील, शोभेच्या वस्तू, तोरण आदी वस्तू तयार करण्याचा स्वतः अनुभव घेत मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांनी दिवाळीतील गृहोपयोगी साहित्य निर्माण केले. निमित्त होते ते, मनपाच्या स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळीचे अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आयोजित विविध उपक्रमांचे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले व त्यांच्या चेहरा आनंदाने फुलला.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., यांच्या मार्गदर्शनात, शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्या नेतृत्वात मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता दिवाळीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. उपक्रमांतर्गत मनपाच्या गांधीनगर हिंदी प्राथमिक शाळा आणि नेताजी नगर मार्केट हिंदी माध्यमिक शाळा येथे कार्यानुभव उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गृहोपयोगी वस्तू तयार केल्या. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिवाळी सणाची माहिती दिली.

दिवाळीच्या सुट्या पूर्वी नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात दिवाळी साजरी केली. दिवाळीनिमित्त मनपाच्या शाळांना येत्या ४ नोव्हेंबरपर्यंत सुट्या जाहिर करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यात यावी, याकरिता शाळेत दिवाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नेताजी मार्केटच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांकरिता रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक मातीचे दिवे आणि आकाश दिवे तयार केले. तसेच शुभेच्छा देण्याकरिता सुंदर ग्रिटिंग कार्ड सुद्धा तयार केले. त्याचबरोबर नेताजी मार्केट माध्यमिक हिंदी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा आकाश दिवे तयार केले. शाळेचे शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांना 'पर्यावरणपूरक दिवाळी' साजरी करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शाळेच्या माध्यमिक मुख्याध्यापिका छाया कौरासे, प्राथमिकच्या मुख्याध्यापक शारदा मिश्रा, शाळेचे शिक्षक विनायक भोयर, संगिता गावंडे यावेळी उपस्थित होते. गांधीनगर हिंदी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरण पुरक दिवाळी साजरी केली. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी वेशभूषा धारण केली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका बिना करोसिया यांच्यासह इतर शिक्षक वर्ग उपस्थित होते.


विविध उपक्रमांद्वारे मनपा शाळांमध्ये दिवाळी उत्साहात

## नेहरूनगर येथे दिवाळी पहाट व बळीराजा महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २० :

नंदनवन परिसरातील नेहरूनगर गार्डन येथे समाजसेविका रोमा चिराग चौधरी यांच्या पुढाकाराने व सत्यशोधक कला महासंघ, नेहरूनगर योगा वर्ग, आणि स्त्री नमन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आलेला महासम्राट बळीराजा महोत्सव व दिवाळी पहाट हा सुमधुर गीतांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपन्न झाला. यावेळी नेहरूनगर व नंदनवन परिसरातील नागरिकांची कार्यक्रमाला उपस्थिती होती.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सेवादल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय केशवराव शेंडे, निर्मल को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्षा पूजा मानमोडे, ओबीसी युवा अधिकार मंचेचे अध्यक्ष उमेश कोरम, बळीराजा महोत्सवाचे आयोजक तथा प्राध्यापक डॉ. अभिविलास नखाते, डॉ. अमृता पिसे, रमना मारोती येथील सामाजिक कार्यकर्ता राहुल अभंग, युवक काँग्रेसचे निलेश खोरगडे, तिरळे कुणबी संस्थेचे सचिव सुरेशराव जिचकार यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## वाडीत बहि:श्रवण-दृष्टीहीन तसेच बहुविकलांग विद्यार्थ्यांची दिवाळी उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

दत्तवाडीतील मानव विकास फाउंडेशन मधील बहि:श्रवण-दृष्टीहीन तसेच बहुविकलांग विद्यार्थ्यांची दिवाळी सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

यानंतर संस्थेतील बहि:श्रवण-दृष्टीहीन तसेच बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी विविध आनंददायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांत उत्साहाने सहभाग घेतला. उपक्रमांनंतर सर्वांनी एकत्र येऊन लक्ष्मीपूजन केले. पूजनानंतर विद्यार्थ्यांना गोडधोड पदार्थ आणि भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात संस्थेच्या सर्व प्रकल्पांतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि सर्वांनी मिळून सणाचा आनंद लुटला. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व देखरेख संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ जोध यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या वेळी चंद्रशेखर निघोट, नारायण पाचपोर, आंबेकर, निर्मला निघोट, मल्टी डिसेबिलिटी प्रकल्प संचालक श्रुतिका अंजनकर, विहान प्रकल्प संचालक आशा मेनन, टी. आय. प्रकल्पाच्या मानसी रहांगडाले, रिहॅबिलिटेशन सेंटरचे प्रकल्प संचालक निखिल बागडे आदी उपस्थित होते.मानव विकास फाउंडेशनतर्फे दरवर्षी सण-उत्सव साजरे करून विशेष मुलांमध्ये आनंद, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभाग वाढविण्याचा उपक्रम राबविण्यात येतो.



## रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) आणि विदर्भ राज्य आंदोलन समितीची संयुक्त बैठक



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) आणि विदर्भ राज्य आंदोलन समितीची संयुक्त बैठक दिनांक 19 ऑक्टोबर 2025 रोजी पाटणकर चौक येथील पक्ष कार्यालयात पार पडली. या बैठकीत विदर्भवादी नेते अरुण केदार आणि सुनील चोखारे यांनी सहभागी होत रिपब्लिकन पक्षाकडून विदर्भ राज्य आंदोलनाला पाठिंबा देण्याची विनंती केली. या प्रसंगी रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) चे विदर्भ अध्यक्ष चंद्रकांत रामटेके, शहर अध्यक्ष डॉ. विनायक गणवीर, तसेच शहर महासचिव प्रा. अजय बोरकर उपस्थित होते. पक्षाच्या वतीने आंदोलनाला तात्त्विक पाठिंबा दर्शवित समितीने रीतसर प्रस्तावपत्र सादर करावे, असे मत व्यक्त करण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक राजू गजभिये (कार्याध्यक्ष, नागपूर शहर) यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुदर्शन मून (संघटन सचिव, विदर्भ प्रदेश) यांनी केले. बैठकीला विजय मेश्राम, कमलेश मेश्राम, प्रा. किशोर शेंडे, चंद्रमणी गजभिये, विनोद सूर्यवंशी, पांडुरंग अंबादे, अरविंद मेश्राम, रवी पाटील (सिने कलावंत), संजय कांबळे, रणधीर सिंग डुलत यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## कळमेश्वर नगरीत दिवाळी पहाट उत्साहात साजरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

कळमेश्वर येथे श्री गुरुदेव सेवा मंडळच्या वतीने दिवाळी पहाट सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन विजयराव नागपूरे व डॉ. महात्मे यांनी केले, तर राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. सचीन काळे महाराज यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम रंगलो. सोहळ्यात निलेश झोड आणि जिवन कला सुसंस्कार कला मंडळातील विद्यार्थी यांनी सुमधूर आवाजात अभंग, भजन, देशभक्ती गीत आणि लोकगीत सादर केले. तसेच विश्वव्यापी गुरुदेव सेवा मंडळच्या वतीने ढोल ताश्याच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली गेली. कार्यक्रमात स्वच्छता दुतांचा सन्मान करून भेटवस्तू दिल्या गेल्या. कार्यक्रमात मक्कासरे, अरुण रत्नपारखी, अंजली रत्नपारखी, तसेच पाटील, बिरजू रघूवंशी, ईखार साहेब, दटके व इतर मान्यवर उपस्थित होते.

## शिक्षिकेचे २.४१ लाखांचे दागिने लंपास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात आरोपीने एका शिक्षिकेचे २ लाख ४१ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही घटना नागपूर मध्यवर्ती बसस्थानकावर घडली. या घटनेने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी नेहा सजल विश्वकर्मा (४०) रा. संकल्पनगर, भंडाराच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे.

नेहा ह्या संभाजीनगरच्या स्माईलपुरा येथील एका शाळेत शिक्षिका आहेत. दिवाळी साजरी करण्यासाठी त्या भंडारा येथील घरी जात होत्या. शनिवारी सकाळी ८.४५ वाजताच्या सुमारास त्या एसटी बसने नागपूर बसस्थानकावर आल्या. तेथून भंडाराच्या बसमध्ये चढत असताना अज्ञात आरोपीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या हॅण्डबॅगची चैन उघडून त्यातील दागिन्यांची डब्बी लंपास केली. डब्बीमध्ये २.४१ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने होते. बसमध्ये चढल्यावर त्यांना बॅगची चैन उघडी दिसली. बॅग तपासली असता दागिन्यांची डब्बी गायब होती. त्यांनी तत्काळ बसमधून उतरत गणेशपेठ पोलिस स्टेशन गाठले आणि तक्रार दाखल केली.

# इंदोरा मैदान झाले रैनबसेरा
## २५ कुटुंबांचा उघड्यावर विसावा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

इंदोरा प्रभाग क्रमांक ७ मधील इंदोरा मैदान परिसरात मागील महिन्याभरापासून राजस्थानातील अलवर, मंडावर, बिजवार, चव्हाण या भागांतील तब्बल २५ कुटुंबांनी तात्पुरत्या झोपड्या उभारून वास्तव्यास सुरुवात केली आहे. प्लास्टिकच्या झोपड्यांमध्ये ही कुटुंबे उघड्यावर दिवस काढत असून, सणासुदीच्या काळातही त्यांच्या परिस्थितीत काहीही फरक पडलेला नाही.

या ठिकाणी राहणारे आजादसिंग नटवर सांगतात,आम्ही येथे गुजरान करण्यासाठी आलो आहोत.गावात कंट्रोलचे धान्य देखील मिळत नाही. शिक्षणासाठी पैसे लागतात त्यामुळे आमची मुले शिकत नाही. सरकारने आमच्याकडे लक्ष दिले तर आम्ही इतक्या दूर येणार नाही.

ही मंडळी छोट्या मुलांसह खेळणी, पटाख्यांच्या बंदुका, प्लास्टिकची फुले विकून आपल्या संसाराचा गाडा चालवित आहेत. दिवाळीसारख्या सणात जेव्हा सगळीकडे उजळण आहे, तेव्हा इंदोरा मैदानावर मात्र ही कुटुंबे अंधारातच दिवस काढत आहेत.

स्थानिक नागरिक हेमराज जांभूळकर म्हणाले, ही लोकं कुठून आली याची नोंद प्रशासनाने घ्यावी. ही कुटुंबे उघड्यावर जीवन यापन करत आहेत. येथे लहान मुले, महिला आहेत.

साप, विंचू, किडे यांचा धोका कायम असतो. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यायला हवे.या ठिकाणी समाजकार्यकर्ते प्रमोद लोखंडे, राजन शेंडे, प्रभु गजभिए, रविंद्र जनबंधु, मनोज गजभिए, अमोल गजभिए, शैलेंद्र बेहरे, अजय सहारे, विवेक देशपांडे, राजेश वासनिक, राजेश जांभूळकर आणि राजेश राऊत यांनी भेट देऊन प्रशासनाकडे तातडीने या कुटुंबांना आवश्यक सुविधा – पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि निवाऱ्याची व्यवस्था – उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

## विज्ञान शिक्षकांचा रेझ कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २० :

प्रो. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरी (पीआरएसएसई), नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक इंडक्शन कार्यक्रम - रेझ (रेनफोर्समेंट ऑफ ॲकॅडमिक इंस्ट्रक्शन ॲंड सायन्स एज्युकेशन)च्या दुसऱ्या टप्प्यातील दोन दिवसीय कार्यशाळेला माध्यमिक शाळांतील विज्ञान शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विद्या भारती - विदर्भ प्रांत यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत 15 शाळांमधील 19 शिक्षकांनी सहभाग नोंदवला. माध्यमिक शिक्षण मंडळ महाराष्ट्र राज्यचे जीवशास्त्र अभ्यास मंडळ माजी संयोजक डॉ. विष्णू वझे, वरिष्ठ विज्ञान संवादक धनंजय रावल, धरमपेठ सायन्स कॉलेजचे भौतिकशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. गोविंद लखोटिया, पीआरएसएसईचे सल्लागार वासुदेव मोहाडीकर आणि शैक्षणिक प्रमुख शिखा व्यास यांचे शिक्षकांना मार्गदर्शन लाभले. शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 प्रभावीपणे राबविण्याच्या मुख्य उद्देशाने आयोजन या कार्यशाळेत विज्ञान आणि गणित विषयांच्या अध्यापनासाठी नव्या पद्धती आणि अनुभवाधारित शिक्षणावर भर देण्यात आला. या दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमाला विद्या भारतीचे महानगर मंत्री श्रीकांत देशपांडे, धरमपेठ शिक्षण संस्थेचे सचिव सुरेश देव, पीआरएसएसईचे अध्यक्ष हेमंत चापले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



## नागपूर विभागात यूटीएस ॲप वापरात वाढ

**नागपूर :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने प्रवाशांना डिजिटल तिकीट प्रणाली आणि सुलभ प्रवास अनुभव देण्याच्या आपल्या वचनबद्धतेत सातत्य राखत यूटीएस (अनारक्षित तिकीट प्रणाली) मोबाईल ऐपच्या वापरामध्ये लक्षणीय वाढ नोंदवली आहे. या ऐपच्या माध्यमातून प्रवासी आता कागदरहित पद्धतीने सहजपणे अनारक्षित तिकिटे खरेदी करत आहेत. सप्टेंबर महिन्यात नागपूर विभागात एकूण 34,298 अनारक्षित तिकिटे यूटीएस मोबाईल ऐपद्वारे बुक करण्यात आली, ज्याचा लाभ 1,86,208 प्रवाशांना झाला. या डिजिटल उपक्रमातून विभागास 43,18,210 इतके उत्पन्न प्राप्त झाले असून हे प्रवाशांच्या या मोबाईल तिकीट प्रणालीवरील वाढत्या विश्वासाचे प्रतीक आहे.

# आधी मतदारयादी दुरुस्ती, नंतरच निवडणूक
## न्यायालयात जाण्याची काँग्रेसची भूमिका; वाडीत मतदारयाद्यांमध्ये घोळ



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २० :

नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी आरक्षण निश्चित झाल्यानंतर मतदार याद्यांची सखोल चौकशी करण्याचे काम स्थानिक पातळीवर राजकीय पदाधिकार्यांन कडून जोमाने सुरू आहे.

याच धरतीवर वाडी शहर काँग्रेस समितीने प्रभाग १ ते १३ च्या मतदार याद्यांची सखोल तपासणी केली असता यादीत मोठ्या प्रमाणात घोळ असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्या अनुषंगाने शनिवारी वाडी येथील काँग्रेस कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करून या सर्व बाबी पुराव्यासह सादर केल्या. सत्ताधारी पक्षाने स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी हा घोळ मुद्दाम केला असून यामुळे निवडणूक पारदर्शक होणार नसल्याचा आरोप ही यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला. प्रभागानुसार मतदार यादी तयार केली असताना सर्वच प्रभागातील हजारो मतदारांची नावे ही त्या प्रभागाच्या सीमांकनात नाहीत. तर ती वेगवेगळ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहेत.

प्रशासनाच्या चुकीमुळे जवळपास ३० हजार पेक्षा जास्त मतदारांचे स्थानांतरण झाल्याने मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता बळावली आहे. यादीत एकाच मतदाराचे नाव तीन-तीन प्रभागात असून मतदान ओळखपत्राचा यु.आर.सी. व जी.एस.एफ. नंबर मात्र सर्वच ठिकाणी वेगवेगळा दिसून येत आहे.

यादीनुसार एकूण मतदारांपैकी जवळपास साडेचार हजार दुबार मतदारांची नोंद झालेली आहे.मोठ्या प्रमाणात मतदार यादीत झालेला घोळ लक्षात घेऊन वाडी शहर काँग्रेसच्या वतीने मतदारांची नावे त्याचे स्वतःचे निवासी क्षेत्रातच असावे याकरिता आक्षेप सादर केलेला आहे. घेतलेल्या आक्षेपावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी निवडणूक निर्णय अधिकारी मार्फत निवडणूक आयोग यांच्याकडे करण्यात आली असून या मतदार याद्यांचा घोळ दुरुस्त न झाल्यास उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचेही यावेळेस काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# सणासुदीच्या काळात जरीपटका बाजारात कचऱ्याचा अंबार

महासागर
प्रभाग वार्ता




■ प्रमोद जांभूळकर,
नागपूर, दि. २० :

प्रभाग ७, इंदोरा, जरीपटका बाजार मेन रोड परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात कचऱ्याचा अंबार साचलेला असून, परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. ऐन सणासुदीच्या काळात बाजारपेठेत गर्दी वाढलेली असताना या अस्वच्छतेमुळे नागरिक, दुकानदार आणि ग्राहक यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

मनपा प्रशासनाने नियमितपणे स्वच्छता न केल्याने रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढिगारे पडून राहिले आहेत. यामुळे डास, माशा वाढून रोगराई पसरू शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

शैलेंद्र बेहेरे, प्रमोद खोब्रागडे, पद्माकर पाटील, प्रभू गजभिये, देवानंद पानतावणे, सत्यजीत लांजेवार, अतीम नेवारे, अभय शेंडे, अजय सहारे, युवराज सोनारे, प्रशांत खोब्रागडे आणि प्रशांत साखरे यांनी तातडीने स्वच्छता मोहिम राबवून परिसर स्वच्छ करण्याची मागणी मनपा प्रशासनाकडे केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, सणासुदीच्या काळात बाजारपेठेत येणाऱ्या गर्दीमुळे स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, अन्यथा अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

# महात्मा गांधी शाळेसमोर बेवारस कुत्र्यांचा हैदोस




■ प्रमोद जांभूळकर,
नागपूर, दि. २० :

प्रभाग ७ इंदोरा येथील जरीपटका परिसरातील महात्मा गांधी शाळेसमोर बेवारस कुत्र्यांचा हैदोस सुरू असून परिसरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शाळेत दररोज हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळा सुटल्यावर पालकांची मोठी गर्दी होत असते. या वेळी रस्त्यावर फिरणारे कुत्रे विद्यार्थ्यांवर व नागरिकांवर भुंकत असून काही वेळा पाठलागदेखील करतात. त्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी मनपाकडे तातडीने या बेवारस कुत्र्यांना पकडून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात हेमराज जांभूळकर, संजय रामटेके, सत्यजीत लांजेवार, अतीम नेवारे, प्रमोद लोखंडे, राजन शेंडे, राजेश राऊत, राजरत्न टेंभुर्णे, पवन टेंभुर्णे, पद्माकर पाटील, शैलेंद्र बेहेरे, प्रवीण शेंडे, प्रशांत साखरे, अनुप रहाटे, अंबरीश रामटेके, परेश गजभिये, युवराज सोनारे, सुधीर खोब्रागडे आदी नागरिकांनी मनपाने त्वरित उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

## मनपाच्या आशा स्वयंसेविकांना मुख्यमंत्री महोदयांकडून दिवाळी भेट

# मनपाच्या १०९९ आशा सेविकांना सायकलचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० :

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचा कणा असलेल्या १०९९ आशा स्वयंसेविकांना राज्याचे मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी (ता.१९) दिवाळी भेट म्हणून सायकलचे वाटप करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस यांनी सायकलमुळे कामात गती येईल आणि सेवा करण्याची ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

रविवारी (ता.१९) शहरातील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री बोलत होते. मंचावर राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण - दुग्ध्व्यावसाय - अपारंपरिक उर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार श्याम कुमार बर्वे, आमदार डॉ. परिणय फुले, आमदार आशिष देशमुख, आमदार कृपाल तुमाने, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदारमोहन मते, आमदार संजय मेश्राम, सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांच्यासह सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, मनपाचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त



वसुमना पंत, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., सामाजिक न्याय विभागाच्या सुकेशनी तेलगोटे,मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष आंबुलकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ.गजेंद्र महल्ले यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सायकलमुळे आशा स्वयंसेविकांना त्यांचे दैनंदिन आरोग्यविषयक कार्य अधिक जलद आणि प्रभावीपणे करणे शक्य होणार आहे. वेळेची बचत, कामाची गुणवत्ता वाढणार आहे. आशा स्वयंसेविकांना त्यांच्या कार्यक्षेत्रात दररोज अनेक महत्त्वाची कामे करावी लागतात. यामध्ये घरोघरी जाऊन माहिती संकलित करणे, वस्ती रजिस्टर, जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे, गर्भवती महिलांची यादी तयार करणे, लसीकरणास पात्र बालकांची माहिती घेणे तसेच नागरी पोषण दिवस आयोजित करणे यांचा समावेश असतो. ही कामे करताना प्रवासामध्ये बराच वेळ जातो. ही समस्या लक्षात घेऊन सायकलची मागणी करण्यात आली होती, ज्यामुळे त्यांचा जाण्या-येण्याचा वेळ वाचेल आणि कामाच्या वेळेचा प्रभावी वापर होईल.

या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना - जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत निधी मंजूर करण्यात आला आहे. मंजूर अनुदानाच्या अनुषंगाने सायकल खरेदीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून नागपूर शहरातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कार्यरत १०९९ आशा स्वयंसेविकांना सायकल पुरवण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहे. यामुळे आता लवकरच आशा स्वयंसेविका आपल्या कामाच्या क्षेत्रात अधिक उत्साहाने आणि गतीने आरोग्य सेवा देऊ शकतील. रविवारी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते प्रतिकात्मक स्वरूपात १० आशा स्वयंसेविकांना सायकल वाटप करण्यात आल्या. तसेच उर्वरित आशा स्वयंसेविकांना त्या कार्यरत असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते सोमवार (ता. २०) पासून सायकल वाटप करण्यात येत आहे.

# १० वर्षांपासून फरार आरोपी गजाआड

## चेन स्नॅचिंगमध्ये गुन्हे शाखेने पकडले, प्रेयसी आणि सराफाही अडकला

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० :

गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने धंतोली ठाण्यात नोंद चेन स्नॅचिंगच्या प्रकरणात एका सराईत गुन्हेगाराला पकडले. चौकशीत त्याने इतर ४ आरोपीही यात सामील असल्याची माहिती दिली. त्याचा अभिलेख तपासला असता तो खुनाचा प्रयत्नात १० वर्षांपासून फरार असून त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याचे समोर आले. वैभव उर्फ पिंटू उर्फ लकी धनराज बिजेवार (३४) रा. लेंड्रा पार्क, रामदासपेठ, अंकित राजेंद्र जयस्वाल (३६) रा. अजयनगर, अंबाझरी, अतुल मोहन पटेल (२३) रा. रामदासपेठ, काचीपुरा, गायत्री देवेंद्र बेजलवार (२१) आणि आरएस ज्वेलर्स, इतवारीचा संचालक रफीक मुजम्मल मंडल (४५) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.



जनता चौकात राहणाऱ्या फियादी प्रभावती मेहाडिया (८०) ह्या गत ५ ऑक्टोबरच्या सकाळी मॉर्निंग वॉक करून घरी जात होत्या. इमारतीच्या लिफ्टजवळ असताना वैभवने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकली आणि पळून गेला. त्यांच्या तक्रारीवरून धंतोली पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला होता. या घटनेचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट २ चे पथकही करीत होते. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता वैभवचा सुगावा लागला. त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. अंकित, अतुल आणि गायत्रीच्या मदतीने त्याने लुटलेला माल आरोपी सराफा रफीक याला विकल्याची माहिती दिली. त्यामुळे पोलिसांनी त्या चौघांनाही या प्रकरणात आरोपी बनवून अटक केली.

पोलिसांनी वैभवचा गुन्हे अभिलेख तपासला असता २०१५ मध्ये सोनेगाव ठाण्यात खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणात तो फरार होता. तसेच पुणेच्या तळेगाव एमआयडीसीतही त्याच्याविरुद्ध दरोडा आणि खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणात सतत गैरहजर राहात असल्यामुळे न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केला होता. वर्धाच्या कारंजा घाडगे पोलिस ठाण्यात नोंद दरोडा आणि गुन्हेगारी कट प्रकरणातही तो आरोपी आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपपत्रही दाखल केले होते आणि न्यायालयाने १६ आरोपींना दोषी ठरविले होते, मात्र वैभव फरार होता.









# ऑपरेशन यू टर्नमध्ये ८३ हजार वाहन चालकांची झाडाझडती

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २० :

शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि वाहतूक व्यवस्था अबाधित राहावी आणि अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी नागपूर पोलिसांनी गेल्या चार महिन्यांपूर्वी ऑपरेशन यू टर्न या उपक्रम सुरु केला. या उपक्रमात आतापर्यंत 83 हजार 924 जणांची झाडाझडती घेण्यात आली असून चक्क 3 हजार 29 मद्यपी वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम पडला असून अजुनही हा उपक्रम सुरु आहे. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या संकल्पनेतून आणि वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांच्या नेतृत्वात गेल्या जुलै पासून ऑपरेशन यू टर्न हा उपक्रम राबविणे सुरु केले. मद्य प्राशन करुन रात्रीच्या सुमारास वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली होती. परिणामतः रस्ते अपघात आणि अपघातांमध्ये बळींची संख्या वाढली होती. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा उपक्रम सुरु करण्यात आला. या उपक्रमात मद्यपान करून गाडी चालवणाऱ्यांवर कडक कारवाई होत आहे. अल्पवयीन आणि ट्रीपल सीट वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर, वाहतूक पोलिसांनी ऑपरेशन यू-टर्न मोहिमेअंतर्गत दररोज जवळपास 3 हजार वाहनचालकांची तपासणी केली जात आहे. यामुळे अपघात कमी होतील आणि लोकांचे प्राण वाचतील. गत वर्षाच्या तुलनेत 65 अपघाती मृत्यू कमी केले आहेत.

महासागर Diwali special 2025 महासागर

















